नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २५३ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई...
AVP NEWS
समर्थ गांवकरी NEWS
|| जय भगवान ||
समर्थ गांवकरी
संपादक : डॉ.विश्वास आनंदराव आरोटे
मा.नानजीभाई खेमजीभाई ठक्कर
न्याय, निष्पक्ष आणि निर्भीड पत्रकारिता... हीच आमची ओळख!

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासून २००० के व्ही ए
जनरेटर विक्री | दुरुस्ती व देखभाल | तज्ज्ञ तंत्रज्ञ | विश्वासाई सेवा वेळेत काम
संपर्क
+91-8286562340 / 9004511593
8652653990 / 8286562350
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053, Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com | Website: www.adarshengineering.net

शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### पर्यटकांसाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष सज्ज

मुंबई (स. गांवकरी) : नेपाळ-तिबेट परिसरात भूकंप, पूर आणि भूस्खलनामुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील अडकलेल्या पर्यटकांचा शोध घेण्यासाठी राज्य सरकारने हालचाली सुरू केल्या आहेत. केंद्र सरकारशी सातत्याने संपर्क साधला जात आहे. राज्यातील नागरिकांना आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी राज्याची आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा २४ तास सतर्क असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. संपर्कासाठी १०७० हा टोल फ्री क्रमांक उपलब्ध आहे. प्रशासनाकडे नेपाळला गेलेल्या सुमारे ८० नागरिकांची माहिती प्राप्त झाली आहे. त्यापैकी आतापर्यंत चार पर्यटकांशी संपर्क झाला आहे. ते सुखरूप असल्याचे स्पष्ट झाले आहे. पूर आणि भूस्खलनामुळे नेपाळमधील दळणवळण व्यवस्था मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली आहे. मोबाईल नेटवर्क आणि दूरध्वनी सेवा खंडित झाल्याने अनेक पर्यटकांशी संपर्क साधण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे नातेवाईकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन महाजन यांनी केले.

### पुरस्काराच्या मानकऱ्यांची घोषणा

मुंबई (स. गांवकरी) : महिला व बाल विकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजसेविका आणि स्वयंसेवी संस्थांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी देण्यात येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कारांच्या मानकऱ्यांची घोषणा राज्य सरकारने केली आहे. २०२० ते २०२४ अशा चार वर्षांसाठी राज्यस्तरीय आणि विभागस्तरीय पुरस्कार जाहीर केले. महिला व बाल विकास क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या कार्याची दखल घेणे आणि समाजासमोर त्यांच्या कार्याचा आदर्श ठेवणे, या उद्देशाने हे पुरस्कार दिले जातात. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या सामाजिक कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून या पुरस्कारांची योजना राबविण्यात येते. २०२०-२१ च्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती येथील विनिता गजानन घुमे यांची निवड करण्यात आली आहे. २०२१-२२ साठी बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील वढव येथील तारामती बद्रीनाथ जायभाये, २०२२-२३ साठी नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा येथील वंदना रामदास तोरवणे, तर २०२३-२४ साठी लातूर येथील सुजाता यशवंत माने यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

### दोनशे वर्षे कायदे डिजिटल स्वरुपात

मुंबई (स. गांवकरी) : राज्याची राजभाषा असलेल्या मराठीतील दोनशे वर्षांचा कायदेविषयक वारसा आता डिजिटल स्वरूपात जतन केला जाणार आहे. भाषा संचालनालयाकडे उपलब्ध असलेल्या १८२७ पासून आजपर्यंतच्या विविध कायदे, अधिनियम, नियम, अधिसूचना आणि विधिविषयक साहित्याचे डिजिटलायझेशन करण्यास राज्य सरकारने प्रशासकीय आणि वित्तीय मान्यता दिली आहे. या प्रकल्पासाठी १ कोटी ५१ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७' या संकल्पनेअंतर्गत मराठी भाषेला आधुनिक आणि सर्वसमावेशक भाषा बनविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. छापील साहित्याचे स्कॅनिंग, ओसीआरद्वारे संगणकीय मजकूरनिर्मिती आणि त्यानंतर मुद्रितशोधन व गुणवत्ता तपासणी करून प्रमाणित मराठी विधिविषयक संग्रह तयार केला जाणार आहे. या संग्रहाचा वापर कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'महाशब्दकोश' तयार करण्यासाठी केला जाणार आहे.

# भाजप-शिवसेना श्रेयवादात मराठीची गळचेपी

## उत्तर भारतीयांच्या दबावापुढे सरकार झुकले

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यात रिक्षा, टॅक्सी चालकांसाठी मराठीची सक्ती करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी सुरू होऊन आठवडा झाला तोच हा निर्णय स्थगित करण्याची नामुष्की महायुती सरकारसमोर आली. हिंदी भाषकांच्या दबावापुढे माघार घेत या कारवाईला वर्षभर स्थगिती देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. सत्ताधारी भाजप- शिवसेनेच्या मतांच्या राजकारणात मराठीची पुन्हा गळचेपी झाली आहे.



राज्यातील हिंदी व अन्य भाषिक रिक्षा, टॅक्सी आणि ॲप आधारित गाडी चालविणाऱ्या चालकांसाठी राज्य सरकारने मराठीचे व्यावहारिक ज्ञान असणे बंधनकारक केले आहे. २० ऑगस्टपासून या निर्णयाची राज्यभरात अंमलबजावणी सुरू करण्यात आली होती.

एकीकडे मराठी सक्तीच्या मुद्यावरुन शिवसेना आक्रमक होत असतानाच भाजपाने मात्र हिंदी भाषिकांच्या दबावापुढे नमते घेत कारवाईस विरोध केला. त्यातच मराठीच्या मुद्यावरुन हिंदी भाषिक टॅक्सी. रिक्षा चालकांवर सुरु झालेल्या कारवाईचे उत्तर प्रदेश, बिहार आदी हिंदी भाषक राज्यांत राजकीय पडसाद उमटू लागले होते. या कारवाईवरुन विशेषत: येत्या काळात उत्तर प्रदेशात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विरोधकांनी भाजपला घेरताच दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदी भाषिक आमचे बांधव असल्याचे सांगत मराठी सक्तीवरुन कोणत्याही रिक्षा- टॅक्सी चालकावर कारवाई केली जाणार नाही, असा दिलासा दिला होता. त्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी शिकण्यास चार महिन्याचा कालावधी देत भाजपावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला होता. मुख्यमंत्री फडणवीस यांनी मात्र हिंदी सक्तीला तब्बल वर्षभर स्थगिती देत शिवसेनेला मोठा धक्का दिला.

भाजप ट्रान्सपोर्ट सेलचे अध्यक्ष हाजी अरफात यांच्या नेतृत्वाखाली रिक्षा आणि टॅक्सी चालकांच्या संघटनांच्या प्रतिनिधींनी आज मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन मराठी सक्तीला एक वर्ष मुदतवाढ देण्याची मागणी केली. मुख्यमंत्र्यांनी ही मागणी मान्य करीत वर्षभर मराठी सक्तीवरुन कोणावरही कारवाई होणार नाही, असे जाहीर केले. राज्यात मोडकी तोडकी तरी मराठी बोलता आली पाहिजे अशी शिष्टमंडळाचीही भूमिका होती.

मराठीच्या अंमलबजावणीस त्यांचे पूर्ण समर्थन आहे आणि ते शिकण्याचा प्रयत्नही करीत आहेत. पण विविध वयोगटातील चालकांना कमी कालावधीत मराठी शिकणे कठीत जात असून वेळ काढून द्यावी मागणी शिष्टमंडळाने केली.त्यानुसार मराठी सक्तीला एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा आणि या कालावधीत कोणतीही कारवाई केली जाणार नाही, असा निर्णय घेतल्याची माहिती फडणवीस यांनी दिली.

## उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या पाच दिवस आधी बदलता येणार ठराव

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी जाहीर करण्यात आली असली तरी तसेच अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतरही सहकार संस्था निवडणूक नियमातील तरतूदीनुसार उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी पाच दिवस आधी नव्याने ठराव करण्याची संधी देण्यात आली आहे. त्यामुळे १० वर्षाची मर्यादा राज्य शासनाने मागे घेतल्याने, ठराव नसल्याने रिंगणातून बाहेर पडलेल्यांना आता या नियमाच्या आधारे निवडणूक लढवण्याची संधी मिळू शकते. जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी मतदारांची प्रारूप यादी तयार करण्यासाठी सभासद संस्थांचे ठराव मागविण्याचे आदेश जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधकांनी काढले. त्यासोबत सहकारी संस्था निवडणूक नियमावली देण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी १७ जून ते २६ जुलैपर्यंत सदस्य संस्थांचे प्रतिनिधींचे ठराव देण्याची मुदत होती. त्यानुसार संस्थांनी सहकार विभागाकडे ठराव पाठविले. त्यानंतर जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक संभाजी निकम यांनी १९ ऑगस्टला निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली. दि. ३१ ऑगस्टपर्यंत हरकती व सुचना करण्याची मुदत देण्यात आली आहे. अंतिम मतदार यादी १५ सप्टेंबरला प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर बँकेच्या २१ संचालकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होईल. दरम्यान, निवडणुकीच्या प्रारूप यादीसाठी ३ हजार ६४७ संस्था प्रतिनिधीचे ठराव आले. त्यात ३६६ संस्थेचे ठराव अपात्र ठरले. २३३ संस्थांनी ठराव सादर केले नाहीत. मतदार यादी प्रसिद्ध होईपर्यंत १० वर्षांचे बंधन कायम होते. त्यामुळे सहकारातील अनेक दिग्गजांचे ठराव त्यामुळे यादीत समाविष्ट होऊ शकलेले नव्हते. आता ३१ ऑगस्टपर्यंत प्रारूप मतदार यादीवर हरकती घेण्याची मुदत दिली असतांनाच राज्य शासनाने २२ ऑगस्टला विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानंतर १० वर्षांच्या कार्यकाळानंतर निवडणूक लढवण्याची बंदी मागे घेतली. सहकारी बँकांच्या संचालकांना १० वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाला म्हणून निवडणूक लढविण्यास अपात्र ठरवू नये, या आदेशाने आता बँकेच्या ज्येष्ठ संचालकांना दिलास मिळाला आहे.




■ अहिल्यानगर जिल्हा बँक निवडणुकीसाठी मातब्बरांच्या आशा पुन्हा पल्लवीत

## राज्यातील ५३ हजार लाडक्या बहीणींची ओवाळणी हुकली

पुणे : (स. गांवकरी)

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी यादीची पडताळणी तसेच ई-केवायसी प्रक्रियेनंतर लाखो महिलांची नावे यादीतून वगळण्यात आली. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर जुलै महिन्याचे अनुदान 'ओवाळणी' म्हणून सरकारच्या वतीने तीन दिवसापासून वितरित केले जात आहे. यात अनेक कारणास्तव सुमारे ५३ हजार ६३७ लाडक्या बहीणींना सरकारची १५०० रुपये 'ओवाळणी' मिळालेली नाही. त्या अपात्र ठरल्या आहेत. यात ६५ पेक्षा जास्त वय झालेल्या बहीणींची संख्या जास्त आहे. गुरुवार संध्याकाळ पर्यंत एक कोटी ४१ लाख लाडक्या बहीणींना सरकारने दोन हजार ९५ कोटी रुपये 'ओवाळणी'दिली. राज्य सरकारने जून २०२४ मध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली. सुरुवातीला लाभार्थ्यांची संख्या मोठी होती. आधार, ई-केवायसी, उत्पन्न, कुटुंबातील शासकीय कर्मचारी अथवा इतर योजनांचा लाभ तसेच अन्य पात्रता निकषांची पडताळणी केल्यानंतर मोठ्या प्रमाणावर नावे कमी झाली. अर्ज दाखल केलेल्या एकूण दोन कोटी ४८ लाख लाडक्या बहीणीमधून एप्रिल अखेर पर्यंत सुमारे ९२ लाख नोंदी अपात्र ठरवण्यात आल्य आहेत. त्यामुळे लाडक्या बहीणींची लाभार्थी संख्या १.६५ कोटींवर आली आहे. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर २५ ऑगस्टपासून जुलै महिन्याच्या हप्त्याचे वितरण सुरू करण्यात आले. सामाजिक न्याय विभाग, वित्त विभागाकडून मिळालेल्या निधीतून रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येपर्यंत १ कोटी ४१ लाख ८५ हजार महिलांच्या खात्यांमध्ये सुमारे २ हजार ९५ कोटी रुपये जमा करण्यात आले. लाडक्या बहीणींच्या खात्यात थेट अनुदान वर्ग करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरु होती.

## तहानलेल्या गावांच्या निधी वापरावर सरकारची नजर

मुंबई : (स. गांवकरी)

केंद्र सरकार, जागतिक बँक, सीएसआर अशा विविध माध्यमातून भूजलाची पातळी वाढविण्याकरिता येणार निधी आता राज्यात पाणीटंचाईग्रस्त तहानलेल्या गावांमध्ये प्राधान्याने वापरला जाणार आहे. त्यामुळे भूजलाची पातळी वाढवण्यासाठी मिळणारा पैसा आता कुठेही मनमानी पद्धतीने खर्च करता येणार नाही. त्यातही ज्यांच्या घरी केंद्र सरकारच्या जल जीवन मोहिमेतून नळ पोहोचले आहेत, त्याला वर्षभर पाणी राहावे, या करिता निधी प्राधान्याने वापरण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे या मोहिमेला बळकटी मिळणार आहे. केंद्र सरकारच्या हल घर जल म्हणजेच जल जीवन मोहिमेतून घरोघरी नळ पोहोचले. परंतु, पाण्याचे स्त्रोत उन्हाळ्यात आटल्याने गावोगावी पाण्याकरिता वणवण करावी लागते. अशावेळी पाणीपुरवठा करणाऱ्या स्त्रोतांचे भूजल पुनर्भरण करणे आवश्यक असते. याला सर्वाधिक प्राधान्य देण्यात आले आहे.



दुसरे प्राधान्य अतिशोषित, शोषित आणि अंशतः शोषित म्हणजेच अतिटंचाईग्रस्त (ओसीएस) क्षेत्रांपैकी १६ टक्के क्षेत्र सुरक्षित करण्याला असेल. त्यासाठी आलेल्या निधीचा वापर केला जाईल. त्यानंतर उन्हाळ्यात पाण्याचे स्रोत आटल्याने किंवा भूजल पातळी खालावल्याने अनेक गावांना टँकरवर अवलंबून राहावे लागते. अशी गावे टँकरमुक्त करण्यासाठी भूजलविषयक उपाययोजनांना तिसरे प्राधान्य देण्यात आले आहे. ज्याठिकाणी बाराही महिने पाणीटंचाई नसते असे सुरक्षित भूजल क्षेत्र भविष्यात अतिउपशामुळे अतिटंचाईग्रस्त होऊ नयेत, यासाठी अशा क्षेत्रांतील भूजल पातळी टिकविण्याला चौथे प्राधान्य देण्यात आले आहे. राज्याला भूजल योजनेतून केंद्राकडून मोठ्या प्रमाणावर निधी येतो. या शिवाय जागतिक बँकही जलसंधारणाच्या कामाकरिता हजारो कोटींचा निधी देते. अनेकदा भूजल पातळी वाढविण्याकरिता येणारा हा निधी राजकीय प्रभावामुळे ज्या गावात पाणीटंचाई नाही,अशा ठिकाणी वळवला जातो. पाणीप्रश्नावरून महाराष्ट्रात वर्षानुवर्षे विदर्भ-मराठवाडा विरूद्ध पश्चिम महाराष्ट्र असा संघर्ष पेटत राहिला आहे.

### समितीवर जबाबदारी

भूजल वाढविण्याकरिता राज्याला केंद्र सरकार, विविध सरकारी विभाग, जिल्हा नियोजन समित्या, महापालिका, नगरपालिका, ग्रामपंचायती यांच्यासह सीएसआर, जागतिक बँक आणि युनिसेफ कडूनही कोट्यवधींचा निधी मिळत असतो. हा पैसा नेमका कुठे आणि कसा खर्च होतो, यावर यापुढे नियमित लक्ष ठेवले जाणार आहे. त्याकरिता वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे.

### पाणी स्त्रोतांचे संरक्षण

भूजलाचा अतिप्रमाणात उपसा झालेल्या भागांमध्ये परिस्थिती आणखी गंभीर होऊ नये, यासाठी अशा भागांचे संरक्षण करण्यासाठीही निधी वापरला जाणार आहे. बदलते हवामान, पावसाचे बदलते प्रमाण, शेतीसाठी होणारा पाण्याचा वापर आणि उद्योगांमुळे होणारा भूजल उपसा लक्षात घेऊन भविष्यातील पाण्याची गरजही विचारात घेतली जाणार आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची पिडीत कुटूंबाला सांत्वन भेट

## न्याय मिळवून देण्यासाठी शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे

आळेफाटा : (स. गांवकरी)

पिंपळवंडी येथे साडेनऊ वर्षाच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिची हत्या झाल्याच्या संतापजनक घटनेने संपूर्ण जुन्नर तालुका हादरला असताना, राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी गुरुवार (दि. २७) पिंपळवंडी येथे भेट देऊन पीडित कुटुंबाचे सांत्वन केले. या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त करताना, "ही घटना अत्यंत दुर्दैवी असून समाजाच्या माथी कळंक लावणारी आहे. पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे," अशी ग्वाही त्यांनी दिली.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचेसमवेत आमदार शरद सोनवणे यावेळेस उपस्थित होते. घटना घडल्याच्या दिवशीच पोलिसांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या असून, पोलिसांकडून योग्य दिशेने तपास सुरू असल्याचे सुनेत्रा पवार यांनी सांगितले. आरोपीविरुद्ध कठोरात कठोर कारवाई व्हावी, यासाठी शासनस्तरावर आवश्यक ती पावले तातडीने उचलण्यात आली आहेत असेही त्यांनी स्पष्ट केले.

पीडित कुटुंबीय तसेच ग्रामस्थांशी संवाद साधताना त्यांनी त्यांच्या समस्या व मागण्या जाणून घेतल्या. शबरी घरकुल योजनेंतर्गत तात्पुरत करून पीडित कुटुंबाला घरकुल उपलब्ध करून देण्यात येईल, अशी घोषणा त्यांनी केली. तसेच मनोधैर्य योजनेंतर्गत १० लाख रुपयांची आर्थिक मदत आजच पीडित कुटुंबाच्या खात्यात जमा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीनेही कुटुंबाला पाच लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे.

"पीडित कुटुंबाच्या मुलांच्या भविष्याची काळजी शासन घेणार असून, त्यांच्या भावंडाच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारणार," असे आश्वासनही सुनेत्रा पवार यांनी यावेळी दिले. ग्रामस्थांच्या मागण्या मुख्यमंत्री यांच्यापर्यंत पोहोचवून त्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी सांगितले. पिंपळवंडी परिसरात भविष्यात अशी घटना घडू नये यासाठी सुरक्षेच्या उपाययोजना करण्याचे आश्वासन देताना, गावात तातडीने हायमॅक्स दिवे



बसविण्यासह सीसीटीव्ही व आवश्यक विद्युत व्यवस्था करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

बिबट्याच्या हल्ल्यातील पीडितांना शासनाकडून मोठ्या प्रमाणावर मदत दिली जाते; त्याच धर्तीवर अशा गंभीर गुन्ह्यातील पीडित कुटुंबांनाही आर्थिक मदत मिळावी, यासाठी मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, आरोपीला कठोरातील कठोर शिक्षा मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

यावेळी जुन्नर तालुक्याचे आमदार शरददादा सोनवणे,जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शरद लेंडे, माजी अध्यक्ष देवराम लांडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अमित बेनके, जिल्हा परिषद सदस्य मंगेश काकडे,सामाजिक कार्यकर्ते सुरज वाजगे,सरपंच मेघाताई काकडे, बाजार समितीचे माजी सभापती रघुनाथ लेंडे, बाजार समिती संचालिका प्रियंकाताई शेळके, माजी पंचायत समिती सदस्य श्याम माळी, माजी सरपंच सोमनाथ माळी, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, उपविभागीय अधिकारी अर्चना तांबे, तहसीलदार रंणजीत भोसले, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील, आळेफाटा पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अहिल्यानगर महापालिका कर्ज काढून व्यापारी संकुल उभारणार

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

महिनाभराच्या प्रतीक्षेनंतर आणि सत्ताधारी नगरसेवकांचा विरोध डावलून अखेर महापौरांनी एक व्यापारी संकुल उभारण्यासाठी कर्ज घेण्यास मान्यता दिली आहे तर आणखी एक व्यापारी संकुलाचा उभारणी सार्वजनिक-खाजगी- भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर करण्यास मान्यता दिली. गंज बाजार, प्रोफेसर कॉलनी चौक व रंगभवन या तीन संकुलांचे निर्णय मात्र अद्याप प्रलंबित ठेवले आहेत. शहरातील चितळे रस्त्यावरील नेहरू मार्केट प्रकल्पासाठी केंद्र सरकारच्या अर्बन चॅलेंज फंड अंतर्गत २५ टक्के अनुदान मिळवण्याच्या उद्देशाने वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्यात येणार आहे तर मनमाड रस्त्यावरील सावेडी व्यापार संकुल 'पीपीपी' तत्त्वावर उभारण्यात येणार आहे. या व्यतिरिक्तचे तीन संकुलांचे ठराव अद्याप महापौरांनी प्रलंबित ठेवले आहेत. या पाच ठिकाणच्या व्यापारी संकुल उभारणीसाठी कर्ज घेण्याचा प्रस्ताव १५ मेच्या महासभेपुढे ठेवण्यात आला होता. मात्र सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) व भाजप यांच्यातील बेबनावामुळे सभा ऐनवेळी तहकूब करण्यात आली. अखेर ही सभा २४ जुलैला ठेवण्यात आली. या सभेत सत्ताधारी राष्ट्रवादी व भाजपच्या नगरसेवकांनी कर्ज प्रस्तावास विरोध केला. शहरातील इतर संस्था व विरोधी पक्षांनीही कर्ज घेण्यास विरोध दर्शवला होता. या पार्श्वभूमीवर महापौर ज्योती गाडे यांनी सभागृहात निर्णय जाहीर केला नव्हता.

महापौर कोणत्या स्वरूपाचा ठराव पाठवणार याची मनपा प्रशासनाला प्रतीक्षा होती. अखेर दोन व्यावसायिक प्रकल्पांच्या उभारणीसाठी धोरणात्मक निर्णय घेऊन ठराव प्रशासनाकडे महापौरांनी पाठवले. केंद्र शासनाच्या अर्बन चॅलेंज फंड अंतर्गत २५ टक्के अनुदान मिळवण्यासाठी चितळे रस्त्यावरील नेहरू मार्केट उभारणीसाठी वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्यात येणार आहे तर मनमाड रस्त्यावरील सावेडी व्यापारी संकुल 'पीपीपी' तत्त्वावर उभारण्यात येणार आहे.



■ विरोधानंतरही महापौरांकडून ठरावाला मान्यता

## थोडक्यात पण महत्वाचे



### रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला लाडक्या बहिणींचा शहापूर तालुक्यात मोर्चा !!

शहापूर (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासनाच्या 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत पात्र असूनही तांत्रिक अडचणींमुळे लाभापासून वंचित राहिलेल्या शहापूर तालुक्यातील आदिवासी, कातकरी व गरीब महिलांना त्यांचा हक्काचा सन्मान निधी तात्काळ मिळावा, या मागणीसाठी ठाणे जिल्हा श्रमजीवी संघटनेच्या वतीने येत्या २७ ऑगस्ट २०२६ रोजी एकात्मिक महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयावर धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते . यासंदर्भात संघटनेतर्फे आज प्रकल्प अधिकाऱ्यांना अधिकृत निवेदन देऊन मोर्चाचा इशारा देण्यात आला. निवेदन देताना श्रमजीवी संघटनेच्या शहापूर तालुका महिला अध्यक्ष श्रीमती लक्ष्मी वाघ आणि तालुका महिला सचिव श्रीमती दर्शना आगीवले यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुक्यातील इतर महिला पदाधिकारी व बहुसंख्येने महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या. तांत्रिक अडचणींमुळे हजारो महिला लाभापासून वंचित शहापूर तालुका हा १०० टक्के अनुसूचित क्षेत्र असून येथे दुर्गम वाड्या-वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर आदिवासी व कातकरी कुटुंबे वास्तव्यास आहेत. शासनाने २८ जून २०२४ रोजी 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजना सुरू केली व ३ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांचा यात समावेश केला. मात्र, शहापूर तालुक्यातील दुर्गम भागात इंटरनेट, मोबाईल व बँकिंग सुविधांचा अभाव असल्याने आणि e-KYC, आधार लिंक, बँक खात्यातील त्रुटी अशा तांत्रिक अडचणींमुळे अनेक अशिक्षित व गरीब महिलांचा सन्मान निधी प्रलंबित राहिला आहे.

### ९५ व्या वर्षीही पुन्हा चालण्याची आशा

पुणे (स. गांवकरी) : ९५ वर्षीय ज्येष्ठ नागरिक महिलेवर गुंतागुंतीच्या फिमर फ्रॅक्चरसाठी मिनीमली इन्व्हेसिव्ह पद्धतीने यशस्वी शस्त्रक्रिया कराड येथील सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये करण्यात आली. कराडमधील अशा प्रकारची ही पहिलीच शस्त्रक्रिया असून, केवळ ३० मिनिटात ती पार पडल्याचे डॉक्टरांनी सांगितले. घरात पडल्याने महिलेच्या गुडघ्याजवळील मांडीचे हाड अनेक तुकड्यांत मोडले होते. हृदयविकार, उच्च रक्तदाब आणि मधुमेहासारख्या आजारांमुळे शस्त्रक्रिया मोठे आव्हान होती. मात्र, इंट्रामेड्युलरी नेलिंगद्वारे मिनीमली इन्व्हेसिव्ह फिक्सेशन शस्त्रक्रिया करण्यात आली. ही प्रक्रिया अवघ्या ३० मिनिटांत पूर्ण झाली. कन्सल्टंट ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. जयदीप पाटील यांनी सांगितले की, कमीत-कमी छेदामुळे शस्त्रक्रियेचा ताण कमी ठेवून फ्रॅक्चर स्थिर करणे शक्य झाले. ॲनेस्थेटिस्ट डॉ. जमीर कामठे आणि डॉ. शिवेश ठाकुर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. शस्त्रक्रियेनंतर महिलेची प्रकृती सुधारत असून, त्या पुन्हा हालचाल करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

### राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या नांदेड युवा जिल्हाध्यक्षपदी विजय खटके



नवीन नांदेड (स. गांवकरी) : सामाजिक कार्यकर्ते,युवा नेतृत्व समाजातील केलेल्या कार्याची दखल घेत नांदेड तालुक्यातील गोपाळचावडी येथील विजय खटके यांची नागपूर येथे संपन्न झालेल्या बैठकीत राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या नांदेड युवा जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून या निवडीबद्दल मित्र मंडळ यांनी अभिनंदन केले आहे. नागपूर येथील धनवंटे नॅशनल कॉलेज येथे 26 ऑगस्ट रोजी जातनिहाय जनगणनेत ओबीसीचा कॉलम ठेवावा यासाठी दिल्ली येथे हिवाळी अधिवेशन दरम्यान राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे ठिय्या आंदोलनाची दिशा ठरवण्या साठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या सर्व विंगच्या पदाधिकाऱ्याची बैठक संपन्न झाली,या बैठकीत विजय खटके यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.बबनराव तायवाडे यांच्या हस्ते नांदेड युवा जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. महासचिव सचिन राजूरकर, कार्याध्यक्ष शरद वानखेडे, राष्ट्रीय युवा अध्यक्ष सुभाष घाटे,राष्ट्रीय महिला अध्यक्षा श्रीमती रत्नमाला पिसे,राज्य युवा अध्यक्ष सुरज बेलोकार आणि राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष शाम लेडे,राज्यसरचिटणीस विजयकुमार पिनाटे पदाधिकारी उपस्थित होते या निवडी बद्दल विजय खटके यांचे मित्र परिवार मंडळी यांनी अभिनंदन केले आहे.

### सुभाष देशमुख अन् सचिनदादा कल्याणशेट्टी यांची भाजपच्या कोर कमिटीत एन्ट्री



■ विजयकुमार देशमुख अन् देवेंद्र कोठे नाहीत यांना डावलले

सोलापूर (स. गांवकरी) : भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार सोलापूर जिल्ह्याची कोअर कमिटी घोषित करण्यात आली आहे. प्रदेश सरचिटणीस निरंजन डावखरे यांनी ती यादी जाहीर केली आहे. त्यामध्ये जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, जिल्हा प्रभारी म्हणून आमदार गोपीचंद पडळकर, जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे, प्रदीप पाटील, संतोष मोगले, केंद्र व राज्यातील मंत्री म्हणून ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार आमदार यादीत ज्येष्ठ आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार समाधान अवताडे, ज्येष्ठ नेत्यांमध्ये आजी माजी पदाधिकारी यांच्यात माजी आमदार प्रशांत परिचारक, डॉ जयसिद्धेश्वर स्वामी यांचा सहभाग आहे. ही ग्रामीण भागाची कोअर कमिटी असल्याने यात शहरी भागातील विजयकुमार देशमुख आणि देवेंद्र कोठे या आमदारांचा सहभाग नसल्याचे दिसून येते.

### शिक्षक मतदारसंघाची उमेदवारी पुणे शिवसेनेला मिळावी - सुदर्शना त्रिगुणाईत



ठाणे (स. गांवकरी) : सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेल्या सौ. सुदर्शना त्रिगुणाईत यांनी आगामी पुणे शिक्षक मतदारसंघाची उमेदवारी शिवसेनेला मिळावी, अशी मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. शिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ कार्य करताना विद्यार्थ्यांच्या विविध अडचणी, शिक्षकांचे प्रश्न तसेच शिक्षण संस्थांच्या विकासाशी संबंधित अनेक विषयांचा जवळून अनुभव घेतला असल्याचे सौ. त्रिगुणाईत यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे.

# रक्षाबंधन : धागा मायेचा, नातं विश्वासाचं



(स. गांवकरी)

ह.भ.प. श्री. विशाल रघुनाथ गडगे, आळेफाटा

श्रावणाच्या सरींनी धरती हिरवीगार होत असताना मनाच्या अंगणातही आठवणींची पालवी फुटते. नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधनाने सजलेली श्रावण पौर्णिमा ही केवळ सणांची पर्वणी नसून निसर्ग, संस्कृती आणि नात्यांशी असलेले आपले अतूट नाते पुन्हा जागवणारी वेळ आहे. नारळी पौर्णिमा आपल्याला निसर्गाचा आदर, समुद्राबद्दल कृतज्ञता आणि परंपरांचे जतन करण्याचा संदेश देते; तर रक्षाबंधन माणसामाणसांतील प्रेम, विश्वास आणि जबाबदारीची जाणीव करून देते.

बालपणीच्या किरकोळ भांडणांपासून आयुष्याच्या कठीण प्रसंगांत एकमेकांच्या पाठीशी उभे राहण्यापर्यंतचा प्रवास म्हणजे भाऊ-बहिणीचे नाते. या नात्यात मायेची सावली असते, हक्काचा राग असतो आणि शब्दांविना व्यक्त होणारी काळजीही असते. या भावनांना एका नाजूक धाग्यात गुंफणारा दिवस म्हणजे रक्षाबंधन. राखी दिसायला साधा धागा असला, तरी त्यात बहिणीच्या ममत्वाची ऊब आणि भावाच्या जबाबदारीची जाणीव सामावलेली असते.



श्रावण पौर्णिमेला बहिण भावाच्या मनगटावर राखी बांधते, तेव्हा ती केवळ संरक्षणाची अपेक्षा व्यक्त करत नाही; तर 'तू सुखी राहा, तुझ्या आयुष्यात आनंद नांदो,' अशी मनापासून प्रार्थना करते. भाऊही भेटवस्तू देण्यापुरता हा सोहळा मर्यादित ठेवत नाही, तर 'तुझ्या सुख-दुःखात मी सदैव तुझ्या सोबत आहे,' असा भावबंध स्वीकारतो. म्हणून रक्षाबंधन हा केवळ सण नाही; तो प्रेम, विश्वास, जबाबदारी आणि माणुसकीचा संस्कार आहे.

भारतीय संस्कृतीत रक्षाबंधनाला मोठे सांस्कृतिक अधिष्ठान लाभले आहे. भगवान श्रीकृष्ण आणि द्रौपदीच्या कथेतून संकटाच्या वेळी धावून जाण्याची भावना दिसते. भाऊ-बहिणीच्या नात्याचा विचार करताना संत ज्ञानेश्वर महाराज आणि मुक्ताईचे नाते विशेषत्वाने आठवते. मुक्ताई केवळ ज्ञानदेवांची बहीण नव्हती; ती त्यांच्या जीवनातील मायेची सावली, प्रसंगी मार्गदर्शक आणि आत्मविश्वास देणारी शक्ती होती. 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' या प्रसंगातून तिच्या भावाच्या अंतर्मनाची जाण आणि त्याच्यावरील आत्मीयता प्रत्ययास येते. त्यामुळे रक्षाबंधनाचा अर्थ केवळ 'बहिणीचे रक्षण' एवढाच नसून एकमेकांच्या मनाचे रक्षण, भावनांची जपणूक आणि संकटात खंबीर साथ हा त्याचा व्यापक अर्थ आहे.

बालपणात भाऊ-बहिणीच्या नात्याची श्रीमंती वेगळीच असते. खेळण्यावरून झालेले भांडण, आईकडे केलेली चुगली आणि काही क्षणांत पुन्हा एकत्र खेळणे या छोट्या आठवणी आयुष्यभर मनात राहतात. काळ पुढे सरकतो. शिक्षण, नोकरी, विवाह आणि संसाराच्या जबाबदाऱ्यांमुळे वाटा वेगळ्या होतात. भेटी कमी होतात, अंतर वाढते; मात्र बालपणीचा जिव्हाळा मनाच्या एका कोपऱ्यात कायम जिवंत असतो. म्हणून राखीचा दिवस दूर गेलेल्या नात्यांना पुन्हा जवळ आणण्याची संधी ठरतो.

आजच्या काळात बहिणीचे रक्षण म्हणजे तिच्या स्वातंत्र्यावर पहारा देणे नव्हे, तर तिच्या स्वाभिमानाला बळ देणे होय. तिच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, करिअरच्या वाटेवर साथ देणे, तिच्या निर्णयांचा आदर करणे आणि अन्यायाविरुद्ध ती उभी राहिली तर तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हीच खरी 'रक्षा' आहे. त्याचप्रमाणे बहिणीनेही भावाच्या संघर्षाची जाणीव ठेवून त्याला भावनिक आधार देणे, त्याच्या यशात आनंद मानणे आणि अडचणीच्या काळात त्याचा हात धरून उभे राहणे हीच नात्याची खरी ताकद आहे.

सोशल मीडियावरील डिजिटल शुभेच्छांपेक्षा बहिणीला फोन करून 'कशी आहेस?' असे विचारणे, प्रत्यक्ष भेटणे, तिच्या मनातले ऐकून घेणे किंवा गरजेच्या वेळी तिच्यासाठी धावून जाणे यातच नात्याचे खरे सौंदर्य आहे. राखी मनगटावर बांधली जाते; पण तिची गाठ मनाशी बांधली गेली पाहिजे. संतपरंपरेने दिलेली 'हे विश्वचि माझे घर' ही व्यापक दृष्टीही प्रेम, आपुलकी आणि परस्पर सहजीवनाचीच शिकवण देते.

नारळी पौर्णिमा आपल्याला निसर्गाशी नाते जपण्याची आठवण करून देते, तर रक्षाबंधन माणसामाणसांतील नाते जपण्याची. काळ बदलला, जीवनशैली बदलली, सण साजरा करण्याच्या पद्धती बदलल्या; तरी या सणांमागची मूल्ये बदलता कामा नयेत. निसर्गाचा आदर, परंपरांचे जतन, कुटुंबातील प्रेम आणि माणुसकीची जपणूक हीच आपल्या संस्कृतीची खरी ओळख आहे. रक्षाबंधनाचा धागा काही दिवसांनी मनगटावरून निघून जाईल; राखीचा धागाही तुटेल. पण त्या धाग्याने बांधलेले प्रेम, विश्वास आणि आपुलकी तुटता कामा नये. म्हणून या रक्षाबंधनाला केवळ राखी बांधू नका; एखादा जुना अबोला संपवा, दूर गेलेले नाते जवळ आणा, बहिणीच्या स्वप्नांना बळ द्या आणि भावाच्या संघर्षात त्याचा हात धरा.

राखीचा धागा नाजूक असला, तरी त्यात भावनांचे बळ असते. तो मनगटाभोवती बांधला जातो; पण त्याची खरी गाठ दोन हृदयांना जोडते. नाती रक्ताने जन्माला येतात; पण प्रेम, विश्वास, त्याग आणि माणुसकीने ती आयुष्यभर जपावी लागतात. हाच रक्षाबंधनाचा खरा संदेश आहे.

■ ■ ■

## उषा मुंडे यांना 'मातृगौरव पुरस्कार'

ठाणे : (स. गांवकरी)

सामाजिक सेवा, निस्वार्थी भावनेतून लोककल्याण आणि समाजातील विविध घटकांसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या माता-भगिनींच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने शांतीनगर शिक्षण प्रसारक मंडळ, पाथर्ली, डोंबिवली यांच्या वतीने गेल्या अठरा वर्षांपासून 'मातृगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात येत आहे. समाजसेवेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिलांचा आदर्श नव्या पिढीसमोर राहावा, तसेच त्यांच्या कार्याची जाणीव समाजाला कायम राहावी, या उद्देशाने हा पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याची दखल घेतली जाते. सन २०२६ च्या मातृगौरव पुरस्कारासाठी दिव्यातील आगरी महिला शक्ती प्रतिष्ठानच्या कुमारी उषा बाळाराम मुंडे यांची निवड निवड समितीने




केली होती. त्यानुसार दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित विशेष कार्यक्रमात उषा मुंडे यांना 'मातृगौरव पुरस्कार' व सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती निर्मलाताई श्रीधर म्हात्रे होत्या. विद्यालयाच्या तळमजल्यावरील सभागृहात आयोजित या कार्यक्रमास डॉ. नितीन के. जाधव, श्री समर्थ कृपा संजीवन चिकित्सालय यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

## दुर्गा फाऊंडेशन किनवट तर्फे विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप

किनवट : (स. गांवकरी)

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देण्यासोबतच गरजू विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने दुर्गा फाऊंडेशन, किनवट यांच्या वतीने रामनगर येथील गुरुकुल आश्रम प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. दुर्गा फाऊंडेशनच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांसाठी सामाजिक उपक्रम राबविले जात असून, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधनसामग्री मिळावी आणि आर्थिक अडचणींमुळे त्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत, या उद्देशाने हा उपक्रम



आयोजित करण्यात आला. शालेय साहित्य मिळाल्याने विद्यार्थिनींना अभ्यासासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध झाले असून, त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला यामुळे निश्चितच प्रोत्साहन मिळणार आहे. या कार्यक्रमाला नगरसेविका सौ. प्रिती धीरज नेम्मानिवार, दुर्गा फाऊंडेशन, किनवट चे अध्यक्ष अक्षय भोयर, समन्वयक दुर्गा भोयर यांची प्रमुख उपस्थिती होती. तर यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका मंगला सुकळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला.

यावेळी सपना ताडपेलीवार, अनुजा तिरमनवार, अनिल राठोड, राजेश्वर पोचानीवार, कुमरे आणि दिलीप घोडे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप करताना त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, नियमित अभ्यासाची सवय लावणे आणि भविष्यात विविध क्षेत्रांत यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वास निर्माण करणे, हा या उपक्रमामागील सामाजिक संदेश असल्याचे उपस्थितांनी सांगितले.


दुर्गा फाऊंडेशनच्या या उपक्रमाचे शाळा प्रशासन, शिक्षकवर्ग तसेच पालकांकडून कौतुक करण्यात आले. सामाजिक संस्थांनी शिक्षण क्षेत्रात पुढाकार घेऊन गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात दिल्यास त्याचा विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर सकारात्मक परिणाम होतो, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. सामाजिक बांधिलकीतून शिक्षणाला बळ देण्याचा दुर्गा फाऊंडेशनचा हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरला.

## रक्षा बंधाना निमित्य आकर्षक व विविध राख्या सिडकोच्या बाजार पेठेत दाखल

■ ग्रामीण भागातील युवकांनी दहा दुकाने थाटली

नवीन नांदेड : (स. गांवकरी)

भारतीय संस्कृती मध्ये बहिण भाऊ नातेसंबंध असलेल्या रक्षा बंधन नारळी पौर्णिमा सणांचा निमित्ताने सिडको हडको परिसरातील बाजार पेठेत विविध राख्या अनेक व्यापाऱ्यांनी व जवाहर नगर तुप्पा येथील दहा युवकांनी सिडको मुख्य रोडवर आकर्षक व विघुत रोषणाई करून थाटली असुन सयारा, पुष्पा , विराट,राधा, कृष्ण,ओम स्वास्तीक, महाकाल,मैरे भैय्या, गणपती कमल,एपप्ल,मोटू पतलु यासह राखी



ब्रासलेट ,राखी मेंटल,राखी स्वास्तीक विविध आकर्षक अशा राखी महाराष्ट्र राज्यातील मुंबई पुण्यासह, गुजरात मधील सुरत ,अहमदाबाद दिल्ली , हैद्राबाद येथून आकर्षक व नवीन स्वरूपातील विविध कलाकृती असलेल्या राख्या बाजारपेठेत उपलब्ध झाल्याने बाजार पेठेत महिलांसह युवतींची मोठ्या प्रमाणात गर्दी पाहावयास मिळत असुन महागाईच्या फटका राख्या ना बसला असून 10 ते 500 रूपये पर्यंत आकर्षक राख्या उपलब्ध झाल्या आहेत. 28 ऑगस्ट नारळी पौर्णिमा रक्षा बंधन निमित्य सिडको सिडको हडको परिसरातील बाजार पेठेत अनेक आकर्षक अशी दुकानांची सजावट करण्यात आली आहे रक्षा बंधन निमित्ताने अनेक कलाकृती तून नवीन स्वरूपातील तिरंगा राखी, कुंदन, मारवाड़ी ,रेशीम, सोनेरी , कोल्हापुरी चांदीची, रुद्राक्ष तर लहान मुलांसाठी ,बेनटेन , कार्टून, म्यूजिकल ,लाईट, गोंडा,अशा अनेक प्रकारच्या राख्या बाजार पेठेत महाराष्ट्र, गुजरात ,हैद्राबाद, जयपूर ,कोलकता, दिल्ली, मुंबई या राज्यातील अनेक जिल्ह्यातून आणल्या आहेत , विशेषता मेरे भैय्या ,पारंपरिक राख्या गोंडा यासह चांदीच्या व अन्य आकर्षक राख्या बाजारपेठेत उपलब्ध झाल्यामुळे महिलांसह मुलीनी खरेदी साठी गर्दी केली आहे ,तर सराफा बाजारपेठ मध्ये सोन्या चांदीच्या दुकानात ही चांदीच्या आकर्षक असलेल्या राख्या विक्रीसाठी आल्या आहेत. या वर्षी सिडको सिडको हडको परिसरातील बाजार पेठेत ग्रामीण भागातील जवाहर नगर तुप्पा येथील दहा युवकांनी मुख्य रस्त्या लगत विघुत रोषणाई करून आकर्षक सजावट करून दुकाने लावली आहेत राख्या खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात महिलांसह युवती यांनी गर्दी केली आहे.

## ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉनसाठी महापालिका सज्ज

ठाणे : (स. गांवकरी)

येत्या 30 ऑगस्ट 2026 रोजी होत असलेली 32 वी ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन यशस्वी आणि सुरक्षितपणे पार पाडण्यासाठी महापालिका, पोलीस प्रशासन व सर्व विभाग सज्ज झाले आहे. विविध विभागांची संयुक्त पूर्वतयारी अंतिम टप्प्यात असून, आज यासंदर्भात महत्त्वाची बैठक महापौर शर्मिला पिंपळोलकर व आयुक्त सौरभ राव यांनी घेवून मॅरेथॉनच्या संपूर्ण नियोजनाचा सविस्तर आढावा घेत असतानाच आतापर्यंत 30 हजार



स्पर्धकांची नोंदणी झाली असल्याचे आयुक्तांनी नमूद केले. ठाणे महानगरपालिका व ठाणे जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या विद्यमाने होत असलेल्या ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉनची अंतिम बैठक आज महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात पार पडली. महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.

# थकीत हप्ते भरण्यासाठी तगादा लावल्याने युवकाचा गळफास

## संबंधित अधिकाऱ्यांविरूद्ध गुन्हा दाखल करा, वडीलांची फिर्याद

नवीन नांदेड : (स. गांवकरी)

संभाजी चौक सिडको परिसरातील प्रबुद्ध अशोक मगरे यांनी आपल्या निवासस्थानी श्रीराम फायनान्स वाकड पुणे येथुन चारचाकी वाहनांसाठी कर्ज घेतले होते, जवळपास 26 महिने हप्ते माहेवारी भरल्यानंतर गाडीचा अपघात झाल्याने आठ महिन्यांपासून हप्ते थकीत असल्याने संबंधित कार्यालयातुन हप्ते भरण्यासाठी वारंवार मोबाईल वर तगादा लावल्याने प्रबुद्ध यांनी परिवाराला माहिती दिली व सायंकाळी 26 ऑगस्ट रोजी निवासस्थानी गळफास घेऊन आत्महत्या केली असुन या प्रकरणी संबंधित अधिकारी



विरूद्ध कार्यवाही करण्याची मागणी वडील अशोक मगरे यांनी ग्रामीण पोलीस स्टेशन येथे केली आहे. शोकाकुल वातावरणात 27 ऑगस्ट रोजी दुपारी सिडको स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. परिवार यांनी दिलेल्या माहिती नुसार 26 ऑगस्ट रोजी रात्री 11वाजता राहत्या घरी प्रबुद्ध मगरे वय 28 वर्षे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच नांदेड ग्रामीण पोलिसांनी घटना स्थळाचा पंचनामा केला.

प्रबुद्ध मगरे याने सन २०२३ मध्ये पुणे येथील श्रीराम फायनान्स कंपनीच्या भूमकर चौक, वाकड शाखेतून कर्ज घेऊन एक चारचाकी वाहन खरेदी केले होते. सुरुवातीच्या काळात त्याने जवळपास दोन वर्षे सहा महिने कंपनीचे नियमित हप्तेही भरले. 2025 मध्ये मुंबई-पुणे मार्गावर त्याच्या गाडीला अपघात झाला होता. यात तो बचावला, पण गाडीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. अपघातास कारणीभूत असलेल्या वाहन धारका विरुद्ध पोलिसात तक्रार देऊन गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर गाडीचे इन्शुरन्स क्लेम केल्याने 2026 मध्ये ही गाडी दुरुस्त करण्यात आली. यासाठी जवळपास 9महिन्याचा कालावधी लागल्याने गाडी पुणे येथे गॅरेजमध्येच होती. त्यामुळे उत्पन्न शून्य झाले होते. तरी देखील नियमित हप्ते भरून, थकीत हप्त्यांची रक्कम भरणा करण्यासाठी काही दिवसांचा अवधी देण्याची विनंती, प्रबुद्धने बाणेर, पुणे येथील श्रीराम फायनान्स कंपनीच्या शाखाधिकाऱ्यांना केली होती. तडजोडीअंती किमान 2 लाख रुपये भरावेच लागतील. अन्यथा वाहन रस्त्यावर गाठून ओढून नेण्यात येईल, अशी धमकी कंपनीने दिली. इतकेच नव्हे तर, गेल्या आठवडा भरापासून सतत मोबाईल कॉल करून पैसे भरण्यासाठी तगादा लावला जात होता. बुधवारी 26 ऑगस्ट रोजीही सायंकाळी श्रीराम फायनान्स कंपनीच्या प्रतिनिधीने प्रबुद्धला मोबाईल कॉल केला. यावेळी त्याने प्रतिनिधीला गुरुवारी २७ रोजी पुण्यात येऊन कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष भेटून व पैसे भरून गाडी फ्री करणार असल्याचे सांगितले. तरीही प्रतिनिधीने ऐकले नाही. त्यामुळे प्रबुद्धने घरातच गळफास घेऊन आत्महत्या केली. तात्काळ उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते उपचार चालू असताना मृत्यू पावला , शवविच्छेदन झाल्यानंतर दुपारी 3 वाजता शौकाकुल वातावरण मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले,या प्रकरणी ग्रामीण पोलीस स्टेशन येथे वडील अशोक मगरे यांनी आत्महत्येस प्रवृत्त असणाऱ्या संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यां विरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा अशी फिर्याद दिली आहे.



# नेपाळमध्ये महापुराचा हाहाकार

## मृतांची संख्या ३५० पार, ९१० जण बेपत्ता!

## भोटेकोशी नदीला आलेल्या महापुरानंतर नवे संकट; नदी अडल्याने तयार झालेला तलाव फुटण्याची भीती, भारतीय भाविकांचाही शोध सुरू!



डॉ. विश्वासराव आरोटे
कळसुबाई शिखरावरून

काठमांडू : (स. गांवकरी)

नेपाळमध्ये भोटेकोशी नदीला अचानक आलेल्या महापुराने आणि त्यानंतर झालेल्या भूस्खलनाने मोठ्या प्रमाणावर हाहाकार माजवला आहे. रसुवा जिल्ह्यातील चीन-नेपाळ सीमेजवळ घडलेल्या या नैसर्गिक आपत्तीमध्ये मृतांची संख्या ३५० हून अधिक झाल्याची माहिती समोर आली आहे. शेकडो नागरिक बेपत्ता असून, अनेक कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. नेपाळच्या राष्ट्रीय आपत्ती जोखीम न्यूनीकरण व व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माहितीनुसार, आतापर्यंत ९१० जण बेपत्ता असून त्यांच्याशी संपर्क होऊ शकलेला नाही. बेपत्ता व्यक्तींमध्ये ५१७ परदेशी नागरिक, नेपाळ लष्कराचे ४४ जवान आणि नेपाळ पोलिसांचे २८ अधिकारी यांचा समावेश आहे. आतापर्यंत २५८ मृतदेह सापडले असून ३५१ जणांची सुटका करण्यात बचाव पथकांना यश आले आहे.

**भोटेकोशी नदीच्या पुराचा तडाखा :** रसुवा जिल्ह्यातील भोटेकोशी नदीला सकाळच्या सुमारास अचानक आलेल्या पुरामुळे नदीकाठच्या अनेक भागांना मोठा फटका बसला. तिमुरे, रसुवागढी, स्याफ्रुबेसी, मैलुंग, बेत्रावती, त्रिशूली, बत्तर आणि देवीघाट परिसरात पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले. अनेक ठिकाणी रस्ते वाहून गेले, पूल उद्ध्वस्त झाले, वाहतूक व्यवस्था ठप्प झाली आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले. नेपाळ-चीन व्यापारासाठी महत्त्वाच्या असलेल्या मार्गांनाही या पुराचा फटका बसला आहे. या भागातील जलविद्युत प्रकल्प, महामार्ग, पूल आणि इतर बांधकामांचे नुकसान झाल्याने बचावकार्य करताना प्रशासनाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या पुरामागील नेमके कारण काय, याबाबत सुरुवातीला वेगवेगळ्या शक्यता व्यक्त करण्यात आल्या. नेपाळच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने चीनकडून मिळालेल्या उपग्रह माहितीच्या आधारे तिबेटमधील हिमनदी परिसरातील भूस्खलनामुळे नदीचा प्रवाह अडल्याचे सांगितले आहे. दुसरीकडे नेपाळचे परराष्ट्रमंत्री शिशिर खनाल यांनी प्रतिनिधी सभेला माहिती देताना भूकंप आणि त्यानंतर झालेल्या हिमस्खलनामुळे परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगितले. त्यामुळे आपत्तीमागील घटनाक्रमाचा अधिक तपास सुरू आहे.

**नदी अडल्याने तयार झाला मोठा तलाव :** महापुराचे संकट अद्याप संपलेले नसतानाच आता आणखी एका धोक्याची भर पडली आहे. भूस्खलनामुळे नदीचा प्रवाह अडल्याने चीन-नेपाळ सीमेजवळ मोठ्या प्रमाणात पाणी साचून तलाव तयार झाला आहे. या तलावातील पाण्याची पातळी वाढत असल्याने तो फुटण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तलाव फुटल्यास भोटेकोशी नदीच्या खालच्या प्रवाहातील भागांमध्ये पुन्हा मोठ्या प्रमाणावर पूर येण्याची शक्यता आहे.

चीनच्या शोध व बचाव पथकांनी ग्यिरोंग परिसरात परिस्थितीचा आढावा घेतला आहे. मदतकार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत जलसाठ्याच्या स्थितीवर सतत लक्ष ठेवले जात आहे. चीनच्या जलसंपदा विभागाने विविध नमुने आणि तांत्रिक पद्धतींच्या आधारे तलावातील पाण्याचे प्रमाण तपासले आहे. पाऊस सुरू राहिल्यास पुढील तीन दिवसांत हा तलाव फुटण्याचा धोका वाढू शकतो, असा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे संभाव्य धरणफुटीसदृश परिस्थितीचा सामना करण्यासाठी आपत्कालीन उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत.

**दुसऱ्या आणि तिसऱ्या पुराच्या लाटेची भीती :** नेपाळमधील त्रिभुवन विद्यापीठाच्या आपत्ती अभ्यास केंद्राचे संचालक बसंत राज अधिकारी यांनी परिस्थिती अद्याप पूर्णपणे नियंत्रणात नसल्याचे स्पष्ट केले आहे. आज किंवा उद्या दुसरी अथवा तिसरी मोठी पुराची लाट येण्याचा धोका असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या मोठ्या प्रमाणावर पाऊस नसला तरी डोंगराळ भागात पुन्हा भूस्खलन होण्याची शक्यता कायम असल्याने नागरिकांनी अत्यंत सावध राहण्याची गरज आहे.

आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने नदीच्या खालच्या प्रवाहातील नागरिकांना नदीकाठापासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः नुवाकोट, धाडिंग, गोरखा आणि चितवन जिल्ह्यांतील नदीकाठच्या वस्त्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पाण्याची पातळी अचानक वाढण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी सुरक्षित आणि उंच ठिकाणी स्थलांतर करण्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात येत आहेत.

**१३० हून अधिक भारतीय बेपत्ता :** नेपाळमधील या भीषण आपत्तीचा फटका भारतीय नागरिकांनाही बसला आहे. १३० हून अधिक भारतीय नागरिक बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये कैलास मानसरोवर यात्रेसाठी नेपाळमध्ये गेलेल्या भाविकांची संख्या मोठी आहे. नेपाळमधील संपर्क व्यवस्था मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाल्याने अनेक नागरिकांशी संपर्क साधणे शक्य झालेले नाही.

कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेल्या भारतीयांपैकी किमान ५९ जण बेपत्ता असल्याची माहिती एका प्रवास संस्थेकडून देण्यात आली आहे. मात्र बाधित भागातील दूरध्वनी आणि संदेशवहन व्यवस्था बंद असल्यामुळे बेपत्ता नागरिकांची नेमकी संख्या आणि त्यांची स्थिती अद्याप स्पष्ट झालेली नाही. भारतीय दूतावास आणि विविध राज्य सरकारे नेपाळमधील प्रशासनाच्या संपर्कात असून, बेपत्ता भारतीयांचा शोध घेण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

**तामिळनाडूचे ३७ पर्यटक बेपत्ता :** तामिळनाडू सरकारच्या माहितीनुसार, राज्यातून नेपाळमध्ये गेलेल्या ५७ पर्यटकांपैकी ३७ जणांशी अद्याप संपर्क झालेला नाही. त्यापैकी २० जणांचा शोध लागला असून त्यांची सुरक्षितता निश्चित करण्यात आली आहे. हे पर्यटक हिमालयातील एका मंदिराकडे जात असल्याची माहिती आहे.

कोइम्बतूर येथील ईशा संस्थेचेही ८० सदस्य नेपाळमधील एका स्थलांतर तपासणी केंद्रात असल्याचे सांगण्यात आले आहे. पुरानंतर त्यांच्याशी संपर्क तुटला आहे. संस्थेचे प्रमुख सद्गुरू यांनी संबंधित प्रशासनाकडे घटनास्थळी जाण्यासाठी परवानगी मागितली आहे. दरम्यान, संस्थेचे ४९५ सदस्य सुरक्षितपणे परतल्याची माहिती देण्यात आली आहे.

**पश्चिम बंगालमधील यात्रेकरूंचाही शोध :** पश्चिम बंगालमधून कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेल्या ३२ जणांच्या गटाचाही पुरानंतर संपर्क तुटला आहे. या गटात ३० भाविक आणि दोन प्रवास व्यवस्थापकांचा समावेश आहे. पुरानंतर या गटातील कोणाशीही संपर्क होऊ शकलेला नसल्याने त्यांच्या कुटुंबीयांमध्ये चिंता वाढली आहे. बचाव पथकांकडून बाधित भागात त्यांचा शोध घेतला जात आहे.

**भारताकडून मदतीचा हात :** नेपाळमधील परिस्थितीची माहिती मिळताच भारताने मदतीची तयारी दर्शविली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांच्याशी चर्चा करून या नैसर्गिक आपत्तीतील जीवितहानीबद्दल दुःख व्यक्त केले. संकटाच्या काळात भारत नेपाळच्या नागरिकांसोबत ठामपणे उभा असल्याचे त्यांनी सांगितले. बचाव आणि मदतकार्यासाठी नेपाळच्या अधिकाऱ्यांसोबत समन्वय साधून आवश्यक ती मदत देण्याची तयारी भारताने दर्शविली आहे.

नेपाळमधील भारतीय दूतावासाने अडचणीत सापडलेल्या भारतीय नागरिकांसाठी आपत्कालीन दूरध्वनी क्रमांक जारी केले आहेत. मदतीसाठी +९७७ ९८५ १३१ ६८०७ आणि +९७७ ९७० ९१० ७५०० या क्रमांकांवर संपर्क साधता येणार आहे. बेपत्ता भारतीय नागरिकांच्या नातेवाईकांनी उपलब्ध माहितीसह दूतावासाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

■ ■ ■









## बचावकार्य युद्धपातळीवर

पूरग्रस्त भागात नेपाळचे लष्कर, सशस्त्र पोलीस दल, पोलीस आणि स्थानिक प्रशासनाच्या पथकांकडून बचावकार्य सुरू आहे. हेलिकॉप्टरच्या माध्यमातून दुर्गम भागात अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्याचे काम सुरू आहे. २६ ऑगस्ट रोजी १२ जणांची सुटका करण्यात आली होती. मात्र, सशस्त्र पोलीस दलातील काही जवानांचाही संपर्क तुटल्याने त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविली जात आहे. बचावकार्यादरम्यान खराब हवामान, वाहून गेलेले रस्ते, उद्ध्वस्त पूल आणि खंडित संपर्क व्यवस्था ही मोठी आव्हाने ठरत आहेत. काठमांडूतील बालंबू येथील शंभर खाटांचे रुग्णालयही आपत्कालीन परिस्थितीसाठी सज्ज ठेवण्यात आले आहे. जखमी आणि बचावलेल्या नागरिकांवर उपचार करण्यासाठी वैद्यकीय पथके तैनात करण्यात आली आहेत.

## नागरिकांना अत्यंत सतर्क राहण्याचे आवाहन

नदीचा प्रवाह पुन्हा अडण्याची, पाण्याची पातळी वाढण्याची किंवा तयार झालेला तलाव अचानक फुटण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी कोणतीही जोखीम घेऊ नये, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नदीकाठच्या भागातील नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे, अफवांवर विश्वास ठेवू नये आणि प्रशासनाकडून मिळणाऱ्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, बचाव पथके बेपत्ता नागरिकांचा शोध घेत असून, मृतदेहांची ओळख पटविण्याचे कामही सुरू आहे. संपर्क यंत्रणा पूर्ववत झाल्यानंतर बेपत्ता नागरिकांची स्थिती आणि आपत्तीतील एकूण नुकसानीचे अधिक स्पष्ट चित्र समोर येण्याची शक्यता आहे. मात्र, पुढील काही दिवसांत पुन्हा मोठा पूर किंवा भूस्खलन होण्याची शक्यता असल्याने नेपाळमधील परिस्थितीवर भारतासह संपूर्ण दक्षिण आशियाचे लक्ष लागले आहे.

## महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान

भोटेकोशी नदीकाठचा परिसर नेपाळ आणि चीनमधील व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या मार्गावरील रस्ते, पूल आणि इतर वाहतूक सुविधा पुरामुळे उद्ध्वस्त झाल्याने व्यापारावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. याशिवाय जलविद्युत प्रकल्प आणि स्थानिक पायाभूत सुविधांचे नुकसान झाले आहे. गेल्या वर्षी याच परिसरात अचानक आलेल्या पुरामुळे १८ जणांचा मृत्यू झाला होता आणि सहा अब्ज नेपाळी रुपयांपेक्षा अधिक आर्थिक नुकसान झाले होते. यंदाची परिस्थिती त्यापेक्षा अधिक गंभीर असल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

## नेपाळमध्ये राष्ट्रीय आपत्तीची परिस्थिती

रसुवा जिल्ह्यातील आपत्तीला नेपाळ सरकारने राष्ट्रीय आपत्तीची परिस्थिती मानले आहे. बाधित जिल्ह्यांना तीन महिन्यांसाठी आपत्तीग्रस्त क्षेत्र घोषित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनीही भोटेकोशी आणि त्रिशूली नद्यांच्या पुरामुळे झालेल्या जीवित व वित्तीय हानीबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. नेपाळमध्ये २०१५ मध्ये झालेल्या विनाशकारी भूकंपानंतरची ही सर्वांत गंभीर नैसर्गिक आपत्ती मानली जात आहे. २०१५ च्या भूकंपात सुमारे नऊ हजार नागरिकांचा मृत्यू झाला होता. आता पुन्हा मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाल्याने नेपाळसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे.

# स्वामीराया नाटकामुळे साऱ्यांनाच स्वामी भक्तीची ओढ निर्माण होईल

## नगरसेवक महेश इंगळे



**अक्कलकोट : (स. गांवकरी)**

स्वामीराया नाटकामुळे श्री स्वामी समर्थ महाराजांच्या अवतार कार्याची महिमा आणि भक्तांना आलेली प्रचिती घराघरात पोहोचेल. असे उपक्रम समाजाला अध्यात्माकडे नेणारे आहेत. या नाटकाच्या माध्यमातून साऱ्याच भाविकांना स्वामी भक्तीची ओढ निर्माण होईल असे प्रतिपादन येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन, भाजपा नेते तथा विद्यमान नगरसेवक महेश इंगळे यांनी केले.

नुकतच सांगली येथील विष्णुदास भावे नाट्य विद्या मंदिर येथे 'स्वामीराया' या मराठी नाटकाचा भक्ती प्रयोग सादर झाला. या भक्ती प्रयोग नाटकाचे उद्‌घाटन नगरसेवक महेश कल्याणराव इंगळे मालक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व स्वामींची आरती करुन करण्यात आले. यावेळी महेश इंगळे बोलत होते. नाट्यसेवा पाहून पुढे बोलताना चेअरमन महेश इंगळे म्हणाले की या नाटकातील कलाकारांनी स्वामी सेवेचे पात्र साकारुन आपल्या कलेला न्याय दिला आहे. प्रपंच आणि परमार्थ याची सांगड कशी घालावी याची शिकवण स्वामींनी भक्तांना दिली आहे आणि स्वामींचे हेच जीवनकार्य या नाटकाच्या माध्यमातून दर्शविण्याचे कार्य या कलाकरांनी केले आहे. आपल्याला सर्व कलाकारांचे अगदी मनापासून कौतुक वाटते कारण सर्व कलाकारांचे जीवन या नाटकातील पात्रामुळे धन्य झाले आहे. या सर्वांवर स्वामी कृपा कायम रहावी या करीता या नाटकाचे औचित्य साधून या गुणी कलाकारांचा आज येथे अक्कलकोट वटवृक्ष निवासी स्वामींचे कृपावस्त्र देऊन सत्कार केला आहे आणि

आणि कार्यक्रमाचे आयोजक हडदरे बंधू व सर्व कलाकारांच्या पुढील वाटचालीस तसेच स्वामीराया या नाटकाच्या पुढील नाट्य प्रयोगांसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

तत्पूर्वी या प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून उपस्थित असलेले भाजपा प्रदेश उपाध्यक्ष मा.शेखर इनामदार,मा.आमदार गणेश काका गाडगीळ, मा.दिनकर तात्या पाटील, ऑल इंडिया फार्मसी कौन्सिलचे डायरेक्टर मा.विजय पाटील, प्रसिद्ध न्यूरो सर्जन डॉ.रविंद्र पाटील, कार्यक्रमाचे आयोजक सुशील हडदरे बंधू व मान्यवरांचा चेअरमन महेश इंगळे यांनी स्वामींचे कृपावस्त्र,प्रसाद देऊन सत्कार केला.




आळेफाटा : ओम चैतन्य फाउंडेशन संचलित श्री. जे. आर. गुंजाळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, आळेफाटा येथे रक्षाबंधनाचा सण उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. रक्षाबंधनानिमित्त विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना प्रेम, आपुलकी आणि बंधुभावाचे प्रतीक असलेल्या राख्या बांधल्या. विद्यार्थ्यांनीही बहिणींच्या संरक्षणाची, आदराची व सदैव साथ देण्याची भावना व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या आकर्षक राख्यांमधून सर्जनशीलतेचे दर्शन घडविले.यावेळी सौ. प्रियंका देवगिरे यांनी विद्यार्थ्यांना रक्षाबंधनाचे सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व सांगत मार्गदर्शन केले. कु. श्रीजा सूडके हिने विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वृषाली भुजबळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. काकड यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन सौ. सपना मुंढे व सौ. सरिशा भागवत यांनी केले.

## थोडक्यात बातम्या...



### उच्चदाब टॉवरवर चढलेल्या व्यक्तीला सुखरूप खाली उतरवले

सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूर शहरातील खमितकर अपार्टमेंट, शेटे वस्ती रोड, मुरारजी पेठ परिसरात एमएसईबीच्या उच्चदाब वीज टॉवरवर चढलेल्या व्यक्तीला अखेर सुखरूप खाली उतरवण्यात यश आले. या घटनेत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसून, प्रशासनाने सुटकेचा नि:श्वास सोडला. सकाळी सुमारे १० वाजल्यापासून सदर व्यक्ती उच्चदाब वीज टॉवरवर चढून बसली होती. त्यामुळे परिसरात खळबळ उडाली असून, त्याला पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. सुमारे ४००० व्होल्ट क्षमतेची ही उच्चदाबाची वीजवाहिनी असून, या लाईनला 'हॉटलाईन' असेही संबोधले जाते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित वीजवाहिनी बंद करण्यात आली होती. प्राथमिक माहितीनुसार, सदर व्यक्ती कर्नाटकातील असून ती मनोरुग्ण असल्याचे समोर आले आहे. त्याने टॉवरवर चढण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी, रुग्णवाहिका तसेच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. अथक प्रयत्नांनंतर सदर व्यक्तीला सुरक्षितपणे खाली उतरवण्यात आले.



### खिर्डी येथे हिंदू-मुस्लिम एकतेचे दर्शन

रावेर (स. गांवकरी) : रावेर तालुक्यातील खिर्डी येथे ईद-उल-मिलादुन्नबीचा सण अत्यंत शांततेत, उत्साहात आणि हिंदू-मुस्लिम सामाजिक एकोप्याचे दर्शन घडवत साजरा करण्यात आला. सालाबादाप्रमाणे यावर्षीही गावातून अत्यंत शिस्तबद्ध व शांततापूर्ण मार्गाने भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीचे ठिकठिकाणी ग्रामस्थांतर्फे जलोशात स्वागत करण्यात आले. यावेळी हिंदू व मुस्लिम बांधवांनी परस्परांना फुले देऊन शुभेच्छा दिल्या आणि जातीय सलोखा जपल्याचे उत्तम उदाहरण सादर केले. याप्रसंगी मिरवणुकीच्या मार्गावर जागोजागी सरबत, चहा, नाश्ता आणि विविध गोड खाद्यपदार्थांचे वाटप करण्यात आले. ग्रामस्थांच्या या उत्स्फूर्त सहभागामुळे खिर्डी गावात बंधुभाव आणि सर्वधर्मसमभावाचे सुंदर चित्र पाहायला मिळाले असून, हा सोहळा सर्वत्र कौतुकाचा विषय ठरला आहे. सदरहून मिरवणुकीत खिर्डी खुर्द व खिर्डी बुद्रुक या दोन्ही गावात नेहमीप्रमाणे ठरलेल्या मार्गाने काढण्यात आली.या वेळेस समस्त मुस्लिम बांधवांकडून गावाचे माजी पोलिस पाटील प्रदीप पाटील, सरपंच राहुल फलाक,माजी सरपंच निळकंठ बढे, विलास पाटील, दुर्गादास बोंडे, पोलिस पाटील रितेश चौधरी,गुणवंत पाटील,अनिल चौधरी,प्रवीण शेलोडे,प्रवीण धुंडले, कांतिलाल गाढे, या प्रसंगी मस्जिद मुतवल्ली अस्लम शेख,खिर्डी खुर्द ग्राम पंचायत सदस्य अलताफ बेग,झाकीर पिंजारी,याकूब बेग,तुकड्डू बेग,शेख सलमान,अब्दुल पिंजारी,नईम बेग,शेख कय्युम,जाबीर बेग, रफिक बेग,शेख फारूक, शेख नईम,हाजी वहिद पिंजारी,हाजी महेबूब बेग, शेख शब्बीर,शेख जाबीर, शेख इम्रान, अकिल बेग, निजाम पिंजारी, सुलतान मण्यार, आसिफ मिर्जा,रिजवान खान,शेख इद्रीस, साजीद बेग, शेख फरीद,शेख फारुक,साजीद खान,शाहरुख बेग,आसिफ बेग, यांच्यासह शेकडो मुस्लीम बांधव उपस्थित होते.

### अखंड हरिनाम सप्ताहास भक्तीमय वातावरणात प्रारंभ



रावेर (स. गांवकरी) : राज्याचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री आमदार एकनाथराव खडसे (नाथाभाऊ) यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त (अमृत महोत्सव) श्रीक्षेत्र कोथळी येथे 'अमृत महोत्सव अखंड हरिनाम सप्ताह, संगीत श्री संत मुक्ताई चरित्र तथा संगीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचा' आज बुधवार, दिनांक २६ ऑगस्ट २०२६ रोजी अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात प्रारंभ झाला. हा सोहळा २६ ऑगस्ट ते ०२ सप्टेंबर २०२६ या कालावधीत श्री संत मुक्ताई जुन्या मंदिराच्या सानिध्यात पार पडत आहे. सप्ताहाच्या पहिल्या दिवशी आज सकाळी ठीक ८.३० वाजता श्री संत मुक्ताई जुने मंदिर, कोथळी येथून भव्य ग्रंथ दिंडी मिरवणूक निघाली. ही दिंडी वाजत-गाजत श्री सोमेश्वर मंदिर (कार्यक्रम स्थळ) पर्यंत पोहोचली. मिरवणुकीनंतर दीपप्रज्वलन करण्यात आले असून, त्यानंतर श्रीमद्भागवत कथा व प्रवचनास अधिकृत प्रारंभ झाला आहे. या पहिल्या दिवशी ह.भ.प. रमेश महाराज आडविहिरकर (प्रवचनकार) आणि ह.भ.प. बाळूजी पाडोळे महाराज (कीर्तनकार) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

# 'त्या' बिबट्याच्या मृत्यूचे गूढ कायम

- बिबट्याच्या हल्ल्यात मृत झालेले कुत्र्याचे व जखमी झालेलं कुत्र्याचं पंचनामा अपेक्षित होतं काय



**तामसा : (स. गांवकरी)**

हदगाव तालुक्यातील कृष्णापूर येथील गजरा गवताच्या शेतात वन विभागाच्या रेस्क्यू ऑपरेशननंतर बिबट्या सापडला, मात्र तो मृत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्याने वन विभागाची तारांबळ उडाली. बिबट्याचा मृत्यू कशामुळे झाला? हे गूढ अद्यापही कायम असल्याने वन्यजीवांच्या संरक्षणाची जबाबदारी असलेल्या यंत्रणेच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बिबट्या मृत्यू प्रकरणी संबंधित वनपाल, वनरक्षक यांची चौकशी करुन उदासीनतेबद्दल कठोर कारवाई करण्याची मागणी वन्यप्राणी प्रेमीतून केली जात आहे.

हदगाव वन परिक्षेत्रांर्गत येणाऱ्या लोहा वन परिमंडळातील कृष्णापूर येथील दत्ता आनंदराव पवार यांच्या शेतात बिबट्या असल्याची माहिती मिळाल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी किशन खंदारे यांनी ग्रामस्थांच्या मदतीने बिबट्याला पकडण्याची मोहीम राबवली. बिबट्या सापडला, मात्र तो मृत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्याने सगळ्यांनाच धक्का बसला. बिबट्या मेला कसा? हे काही स्पष्ट होत नव्हते. हदगाव येथे शवविच्छेदन झाले. परंतु बिबट्याचा मृत्यू नेमका कशामुळे झाला? हा प्रश्न अद्यापही अनुत्तरित आहे. बिबट्या जखमी होता का? त्याचा नैसर्गिक मृत्यू झाला की, अन्य कोणते कारण आहे? रेस्क्यूदरम्यान त्याच्या प्रकृतीबद्दल वन विभागाला नेमकी काय माहिती होती? या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. वन्यजीवांच्या संरक्षणाची जबाबदारी असलेल्या यंत्रणेने या घटनेतील प्रत्येक बाब पारदर्शकपणे तपासली का? शवविच्छेदन अहवालात मृत्यूचे नेमके कारण काय समोर येते? बिबट्याचा मृत्यू नैसर्गिक की संशयास्पद? या प्रश्नाचे उत्तर मिळेपर्यंत या घटनेभोवतीचे गूढ कायम राहणार असून संबंधित वनपाल, वनरक्षकाची चौकशी करुन त्यांचेवर कारवाई करण्याची मागणी पुढे येत आहे.

उल्लेखनीय म्हणजे मागील पंधरवड्यात त्याच भागातील कोंढुर शिवारात बिबट्याने कुत्र्यावर हल्ला केल्याचे सांगण्यात आले होते. त्यावेळी वन विभागाने बिबट्याचा शोध घेण्यासाठी ट्रॅप कॅमेरे बसवले होते का? त्या मागावर पाळत ठेवली होती का? तसे केले असते आणि तेंव्हापासून शोध मोहीम सुरु ठेवली असती तर कदाचित कृष्णापूरचा प्रकार टाळला असता. परंतु याचे वन विभागाला काहीही घेणेदेणे राहिले नसल्याने बिबट्याचा मृत्यू झाल्याचे आरोप नागरिकांतून होत असून बिबट्याच्या मृत्यूमुळे वन विभागाच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# जळगांव नगरीमध्ये आदिवासी कोळी जमातीचा एल्गार!

- जळगावात राघोजी भांगरे संघर्ष समितीचा 'खानदेश स्तरीय नवनियुक्त पदाधिकारी सत्कार सोहळा संपन्न
- जय आदिवासी, जय राघोजीच्या घोषणांनी जळगावचा पद्मालय विश्रामगृह परिसर दुमदुमला

**रावेर : (स. गांवकरी)**

न्याय-हक्क लढ्यासाठी एकजुटीचा ठाम संकल्प आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे प्रणीत संघर्ष समिती (महाराष्ट्र राज्य) च्या वतीने आदिवासी टोकरे कोळी, ढोर कोळी, मल्हार कोळी व महादेव कोळी जमातीच्या न्याय आणि हक्क लढ्यासाठी जळगाव येथील पद्मालय शासकीय विश्रामगृह येथे दिनांक २६ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित खान्देश स्तरीय नवनियुक्त पदाधिकारी सत्कार सोहळा' अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. कार्यक्रमादरम्यान 'जय आदिवासी, जय राघोजी' च्या खणखणीत घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. या खानदेश स्तरीय मेळाव्यास जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील नवनियुक्त अध्यक्ष, संघटक, तालुका अध्यक्ष, सर्व पदाधिकारी आणि जमात बांधवांनी प्रचंड संख्येने हजेरी लावली. जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी व न्याय-हक्कासाठी सर्व संघटनांनी आणि बांधवांनी एकत्र येत लढा उभारण्याचा ठाम संकल्प या वेळी करण्यात आला.

# माझे गावं आरोग्य संपन्न गाव या अंतर्गत

### प्राथमिक उपकेंद्र मोरव्हाल येथे जागतिक डास दिवस साजरा गपिमासे पैदास केंद्र उभारले!




**रावेर : (स. गांवकरी)**

रावेर तालुक्यातील आदिवाशी भागात तसेच , तांडे , पाडे , इत्यादी भागात रावेर येथिल आरोग्य अधिकारी डॉ.अमोल भंगाळे व लोहारा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ कीर्ती भामरे मॅडम डॉ.रिजवान शेख सर ,यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य सहाय्यक श्री महेमुद तडवी, श्री डि.के.नमायते आरोग्य निरिक्षक यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र लोहारा येथून माझे गाव आरोग्य संपन्न होण्यासाठी गपिमासे पैदास केंद्र कशा पद्तीने तयार करावे याबाबत आरोग्य सेवक योगेश कापडणे यांना व गावकऱ्यांना मार्गदर्शन केले. समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.चेतन चिमणकर यांनी डास दिवसाचा इतिहास सांगितला दरवर्षी २० ऑगस्ट रोजी १८९७ मध्ये सर रोनाल्ड रॉस यांनी मादी ॲनोफिलीस डास मानवांमध्ये मलेरिया पसरवतो. या ऐतिहासिक शोधाच्या स्मरणार्थ आणि डासांमुळे होणाऱ्या आजारांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जात असल्याचा ईतिहास सांगितला. डासांमुळे मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया, झिका ,आणि पिवळा ताप , यांसारखे प्राणघातक आजार होतात.

# जल जीवन मिशनची कामे तीन वर्षांपासून रखडली

### पेसा आदिवासी ग्रामपंचायतीच्या पाणीप्रश्नाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष, १७ सप्टेंबरपासून उपोषणाचा इशारा

**किनवट : (स. गांवकरी)**



ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला शुद्ध व नियमित नळाचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देत राबविण्यात येत असलेल्या जल जीवन मिशन योजनेच्या अंमलबजावणीवर धामनधरी येथेच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये मंजूर झालेली विविध कामे अद्याप पूर्ण झालेली नसून, काही ठिकाणी सुरू असलेली कामे अत्यंत संथगतीने सुरू आहेत. त्यातच झालेल्या कामांचा दर्जाही समाधानकारक नसल्याने पाणीपुरवठा योजनेची अवस्था दयनीय झाल्याचा आरोप ग्रामपंचायतीने केला आहे.

मौजे धामनधरी, ता. किनवट येथील ग्रामपंचायतीचे सरपंच परसराम भीमा आत्राम यांनी या संपूर्ण प्रकाराविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून, जिल्हा परिषद पाणीपुरवठा उपविभाग, किनवटच्या उपअभियंत्यांकडे लेखी निवेदन सादर केले आहे. या निवेदनातून त्यांनी जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर झालेली कामे तातडीने पूर्ण करण्याबरोबरच कामांच्या गुणवत्तेची स्वतंत्र तांत्रिक तपासणी करण्याची मागणी केली आहे. विशेष म्हणजे धामनधरी ही पेसा कायद्याच्या कक्षेत येणारी आदिवासी ग्रामपंचायत असल्याने गावातील विकासकामे, ग्रामस्थांच्या मूलभूत गरजा आणि स्थानिक ग्रामसभेच्या अपेक्षांना विशेष महत्त्व आहे. मात्र पिण्याच्या पाण्यासारख्या जीवनावश्यक प्रश्नासाठी मंजूर झालेली कामे वर्षानुवर्षे रखडणे ही बाब प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित करणारी असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये धामनधरी गावासाठी पाणीपुरवठा विषयक कामांना मंजुरी देण्यात आली. शासनाच्या योजनेनुसार संबंधित कामे वेळेत पूर्ण होऊन गावातील नागरिकांना घरपोच नळाद्वारे पाणी मिळणे अपेक्षित होते. मात्र मंजुरीनंतर बराच कालावधी उलटूनही कामे पूर्णत्वास गेलेली नाहीत. काही कामे सुरू असली तरी त्यांचा वेग अत्यंत कमी असल्याचा आरोप ग्रामपंचायतीने केला आहे. त्यामुळे शासनाची महत्त्वाकांक्षी योजना प्रत्यक्षात कधी पूर्ण होणार आणि गावकऱ्यांना तिचा पूर्ण लाभ कधी मिळणार, असा सवाल उपस्थित झाला आहे. ग्रामपंचायतीच्या म्हणण्यानुसार, आतापर्यंत झालेल्या काही कामांची सद्यस्थिती अत्यंत खराब आहे. काम पूर्ण झाल्यानंतर अल्पावधीतच त्यामध्ये त्रुटी निर्माण होत असतील, तर कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर शंका निर्माण होतात. त्यामुळे केवळ कागदोपत्री काम पूर्ण दाखविण्याऐवजी प्रत्यक्ष स्थळावर कामाची गुणवत्ता तपासणे गरजेचे असल्याचे सरपंच आत्राम यांनी निवेदनात नमूद केले आहे. पाइपलाइन, जलवाहिनी, जोडणी, बांधकाम तसेच इतर संबंधित कामांमध्ये वापरण्यात आलेले साहित्य आणि कामाची प्रत्यक्ष गुणवत्ता यांची तांत्रिक तपासणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

जल जीवन मिशनच्या माध्यमातून ग्रामीण जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी शासन मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद करते. मात्र निधी मंजूर होऊनही कामे वेळेत पूर्ण होत नसतील, तर शासनाच्या खर्चाचा अपेक्षित परिणाम साध्य होत नाही. धामनधरीतील परिस्थिती याच प्रश्नाकडे लक्ष वेधणारी आहे.

# डॉ. अजित साधना दिलीप लोखंडे यांनी मिळविली डॉक्टरेट

**सोलापूर : (स. गांवकरी)**



अचलेर येथील सर्व सामान्य कुटुंबात जन्मलेल्या डॉ.अजित साधना दिलीप लोखंडे याने अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ येथून डॉक्टरेट मिळवून गगन भरारी घेतली आहे. प्रतिकुल परिस्थिती वर मात करत आणि वडिलांना आलेल्या दुर्धर आजाराचा सामना करीत अजित ने कृषी पदवी चे शिक्षण घेत राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाकडे सोयाबीन या पिकांवर बियाणावर त्यांनी प्रोजेक्ट सादर केला होता. या प्रोजेक्ट ला विद्यापीठाने मान्यता देऊन त्यांना इव्हालूशन ऑफ ग्रीन सिंथेसाईजड नॅनो पार्टीकल्स, अगेन्सेट सीड - बॉर्न पॅथोजन्स ऑफ सोयाबीन या त्यांच्या प्रोजेक्ट ला मान्यता देऊन लोखंडे यांना डॉक्टरेट पदवी बहाल केले आहे. सन २०१६ ते २०२० या कालखंडात बी.एस.सी.कृषी "दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय संभाजीनगर"येथून पूर्ण केले.२०२० ते २०२३ साली एम.एस.सी.कृषी"वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी"येथून पूर्ण केली.मुळातच हुशार बुद्धिमत्ता असलेल्या अजितने कृषीचे शिक्षण कुठेही खंड न पडू देता पूर्ण केले.अन् आणि त्याच वेळी त्याने या क्षेत्रातील डॉक्टरेट मिळवायची हे मनाशी ठाम केलं. सन २०२३ ते २०२६ काळात महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथून सिनियर सायंटिस्ट डॉ.एस.आर. झांजरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली"इव्हॅल्युएशन ऑफ,ग्रीन सिंथेसाइज्ड न्यानोपर्टिकल्स अगेन्स्ट सीड-बॉर्न पॅथोजन्स ऑफ सोयाबीन"हे टायटल ठेवून पी. एच.डी.डॉक्टरेट पूर्ण केली. या संघर्षमय प्रवासात त्याची आई साधनाबाई लोखंडे, वडील दिवंगत दिलीप लोखंडे,मोठा बंधू यशवंत लोखंडे, नातेवाईक, प्रामाणिक मित्रपरिवार,आणि प्राथमिक शाळेत पडलेल पाऊल ते आज संपादन केलेली डॉक्टरेट या काळातील सर्वच गुरुजन यांचे अनमोल मार्गदर्शन व सहकार्य मिळत राहिले असे त्याने सदर प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

“PhD करणे म्हणजे”तीन वर्षांचा अथक संघर्ष, असंख्य अडचणी, कठीण परिस्थिती,अनेक आव्हाने,जागून काढलेल्या रात्री,अपयश, निराशा,त्याग आणि स्वतःला सतत सावरत पुढे जाण्याची जिद्द आहे. हा प्रवास अजिबात सोपा नव्हता. अनेक वेळा काही क्षण असेही आले,जेव्हा सगळं सोडून द्यावं असं वाटलं.पण प्रत्येक वेळी स्वतःला सावरलं आणि पुन्हा नव्या ताकदीने सुरुवात केली. असे डॉ अजित लोखंडे यांनी सुयश मीडिया ग्रुप च्या टीम शी बोलताना सांगितले. प्रत्येक अडचणीने मला काहीतरी शिकवले ,प्रत्येक अपयशाने मला मजबूत केले आणि प्रत्येक कठीण दिवसाने मला माझ्या ध्येयाच्या आणखी जवळ नेले.

आज मिळालेली PhD माझ्यासाठी फक्त एक पदवी नाही; ती माझ्या मेहनतीची, संयमाची,संघर्षाची आणि हार न मानण्याच्या जिद्दीची पावती आहे. डॉ अजित लोखंडे यांनी मिळविलेल्या या यशामुळे सर्वत्र त्याचे कौतुक होत असून त्याच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत...

जिद्द,चिकाटी,कठोर परिश्रम आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा यांच्या बळावर कोणतेही यश प्राप्त करता येते.हे लोहारा तालुक्यातील अचलेर येथील सर्वसामान्य कुटुंबातील युवक अजित साधना दिलीप लोखंडे याने सिद्ध करून दाखवले आहे.

अत्यंत सर्वसामान्य आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या कुटुंबात वाढलेल्या अजितचे प्राथमिक शिक्षण अचलेरच्या जिल्हा परिषद स्पेशल शाळेत, माध्यमिक शिक्षण विद्या विकास हायस्कूल येथे,उच्च माध्यमिक शिक्षण नळदुर्ग येथून पूर्ण केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्वाचे



### ब्रह्मकुमारी सेंटरमध्ये रक्षाबंधनाचा आध्यात्मिक संदेश

आळेफाटा (स. गांवकरी) : रक्षाबंधन हा केवळ बहीण-भावाच्या नात्याचा सण नसून आत्म्याचे परमात्म्याशी नाते जोडण्याचा पवित्र सण आहे, असा आध्यात्मिक संदेश आळेफाटा येथील ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने देण्यात आला. रक्षाबंधनाच्या पावन पर्वाचे औचित्य साधून आळेफाटा ब्रह्मकुमारी सेंटरच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी जुन्नर तालुक्याचे आमदार शरददादा सोनवणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी सेंटर संचालिका ब्रह्मकुमारी स्नेहल दीदी यांच्या हस्ते आमदार शरददादा सोनवणे यांना ईश्वरीय संदेश देत पवित्र राखी बांधण्यात आली. यावेळी सर्व ब्राह्मण परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी रक्षाबंधनाचे आध्यात्मिक रहस्य उपस्थितांना समजावून सांगण्यात आले. स्नेहा दीदी म्हणाल्या की, "राखी हा केवळ धागा नाही तर एक पवित्र बंधन आहे. स्वयं शिव परमात्मा या सृष्टीवर अवतरित होऊन आपल्या सर्व आत्मारूपी मुलांना रक्षणाचे वचन देत असतो. त्या रक्षणासाठी आपण स्वतःला पवित्रता, सत्यता आणि ईश्वरीय नियम-मर्यादांमध्ये बांधून घेणे, याचे प्रतीक म्हणजे हा रक्षाबंधनाचा धागा आहे. "आजच्या काळात प्रत्येक स्त्री-पुरुषाला आपले रक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे. मोबाईलचे व्यसन, वाईट सवयी, काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार आणि समाजातील घातक प्रवृत्तींपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी आत्मस्मृती जागृत करणे गरजेचे आहे. मी एक पवित्र आत्मा आहे आणि मी परमात्म्याचे मूल आहे, ही स्मृती जागृत करून ईश्वराशी नाते जोडणे हाच खरा रक्षाबंधनाचा अर्थ आहे. म्हणूनच ब्रह्मकुमारी विद्यालयात दरवर्षी हा सण आध्यात्मिक स्वरूपात साजरा केला जातो," असे प्रतिपादन त्यांनी केले.यावेळी आमदार शरददादा सोनवणे यांनीही ब्रह्मकुमारी परिवाराचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगत सर्वांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास आळेफाटा परिसरातील ब्रह्मकुमारी सेवाधारी बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आदिवासी विकास विभागाने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गदा

शिवनेरी (स. गांवकरी) : आदिवासी विकास विभाग दि. ५ ऑगस्ट २६ व दि. १४ ऑगस्ट २६ रोजी शासकीय आदिवासी वस्तीगृहांसाठी जारी केलेल्या सुधारित नियमावलीतील अनेक त्रुटी आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या अधिकारावर गदा आणणाऱ्या आहेत त्या तात्काळ रद्द व्हाव्यात यासाठी स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया पुणे जिल्हा समिती अध्यक्ष संस्कृती गोडे व सचिव अक्षय घोडे यांनी मंत्री महोदय अन्न व औषध प्रशासन नरहारी झिरवळ यांना निवेदन किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी आदिवासी सभागृह येथे दि. २६ बुधवार रोजी दिले आहे. या निवेदनात म्हटले आहे की , आदिवासी विद्यार्थी पालक व विद्यार्थी संघटनेच्या प्रतिनिधींना विचारात घेऊन दि. ११ / ११ / २०११ रोजी चा शासन निर्णय बदल मान्य करून महागाई निर्देशांकानुसार डीबीटी मध्ये वाढ करण्यात यावी .अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना वस्तीगृहात प्रवेश देण्यात यावा. विद्यार्थ्यांना विमा संरक्षण तसेच थकीत शिष्यवृत्ती व डीबीटीच्या रकमा कोणताही विलंब न करता तात्काळ वितरित करावी. विद्यार्थिनींच्या आरोग्य तपासणीच्या नावाखाली मासिक पाळी नोंदवही यासारख्या गोपनीयतेचा भंग करणाऱ्या तरतुदी रद्द कराव्यात. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सर्व सुविधा , व्यायाम शाळा , दिव्यांगांसाठी व नियमित मोफत आरोग्य तपासणी उपलब्ध करून द्यावी.

### एसटी बस स्थानक येथे खाजगी वाहतुक व दारू पिणाऱ्यांची गर्दी

शिवनेरी (स. गांवकरी) : आळेफाटा एसटी बस स्थानक येथे सकाळपासून ते सायंकाळ पर्यंत खाजगी वाहतूक व दारू पिणाऱ्यांची गर्दी सातत्याने मोठ्या प्रमाणात असल्यामुळे वाहतूक नियंत्रक यांना शारीरिक व मानसिक संतुलन बिघडून आरोग्यावर परिणाम सातत्याने होत असल्याने संकटात आहे. येथील वाहतूक नियंत्रणकक्ष अधिकारी यांनी याबाबत संबंधित एसटी डेपो वरिष्ठ अधिकारी यांना वारंवार लेखी व तोंडी सांगितले आहे . याबाबत वरिष्ठ अधिकारी काय निर्णय घेतात याकडे भाविकांचे पर्यटकांचे व तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे . वाहतूक नियंत्रक कक्षा अधिकारी यांना आळेफाटा बस स्थानकातील दारू पिणाऱ्यांना वारंवार सूचना करून बस स्थानकातून बाहेर जात नाही . यामुळे वाहतूक नियंत्रण कक्ष अधिकारी यांना बस स्थानकात आवारात येऊन दारू पिणाऱ्यांना रस्त्याच्या बाहेर काढावे लागत आहे. दारू पिणारे यांनी बसस्थानकात झोपणे , सातत्याने बसून राहणे, आपसात भांडण करणे -- आरडाओरडा त्यांनी असल्यामुळे महिला भगिनी , विद्यार्थ्यांना , रुग्ण , ज्येष्ठ नागरिक, पर्यटक व स्थानिक नागरिकांना एसटीची वाट पाहण्यासाठी रस्त्यावर टाटकळत उभे लावावे लागत आहे.

# कळवण प्रकल्प कार्यालयावर आदिवासी संघटनांचा धडक मोर्चा

## आश्रमशाळेतील सुविधांसह सेंटर किचनच्या प्रश्नावर संताप



कळवण : (स. गांवकरी)

आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा,सुरक्षित वातावरण आणि पौष्टिक आहार मिळावा,तसेच विविध प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवावेत,या मागण्यांसाठी आदिवासी संघटनांच्या वतीने कळवण प्रकल्प कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन सहाय्यक प्रकल्प अधिकारी कांबळे साहेब यांनी स्वीकारले. मोर्चादरम्यान आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या मूलभूत सुविधांचा प्रश्न आंदोलकांनी आक्रमकपणे मांडला. आश्रमशाळांमध्ये बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे अनेक ठिकाणी बंद अथवा नादुरुस्त असल्याचा आरोप संघटनांनी केला. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणाअत्यंत महत्त्वाची असल्याने बंद कॅमेरे तातडीने दुरुस्त करून आवश्यक त्या ठिकाणी कार्यक्षम सीसीटीव्ही बसवावेत,अशी मागणी करण्यात आली.विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवरआश्रमशाळा व वसतिगृहांमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी वास्तव्यास असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था,स्वच्छ परिसर आणि जबाबदार प्रशासन आवश्यक असल्याचे आंदोलकांनी सांगितले.विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत कोणत्याही प्रकारची हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही,असा इशाराही यावेळी देण्यात आला. सेंटर किचनच्या अन्नाच्या गुणवत्तेवर सवालआश्रमशाळांमधील सेंटर किचनमधून विद्यार्थ्यांना खराब अथवा निकृष्ट दर्जाचे अन्न मिळत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या भोजनाची गुणवत्ता, स्वच्छता आणि पौष्टिकता यांची नियमित तपासणी करण्याची मागणी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित बाब असल्याने भोजनाच्या गुणवत्तेबाबत प्रशासनाने गांभीर्याने लक्ष घालावे,अशी मागणी करण्यात आली.शाळांमधील अस्वच्छतेचा मुद्दाही गाजलाआश्रमशाळांच्या परिसरात अस्वच्छता असल्याचा आरोप करत स्वच्छतागृहे,पिण्याचे पाणी,परिसराची स्वच्छता आणि विद्यार्थ्यांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. आदिवासी विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांप्रमाणेच सुरक्षित,स्वच्छ आणि दर्जेदार शैक्षणिक वातावरण मिळणे हा त्यांचा हक्क आहे, अशी भूमिका संघटनांनी मांडली. मोर्चादरम्यान प्रशासनाने केवळ कागदोपत्री आश्वासने न देता प्रत्यक्ष शाळांमध्ये पाहणी करून समस्यांचे निराकरण करावे,अशी मागणीही करण्यात आली.विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्यास भविष्यात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा संघटनांकडून देण्यात आला.प्रशासनाकडून सकारात्मक आश्वासन आंदोलकांचे निवेदन स्वीकारताना सहाय्यक प्रकल्प अधिकारी कांबळे यांनी आंदोलकांनी मांडलेल्या प्रश्नांबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल, असे सांगितले.संबंधित मुद्दे लवकरात लवकर शासन दरबारी मांडून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन प्रशासनाच्या वतीने देण्यात आले.प्रशासनाकडून मिळालेल्या आश्वासनानंतर आंदोलकांनी सदर आंदोलन स्थगित केले. मात्र,आता आश्वासनांची अंमलबजावणी प्रत्यक्षात कधी होते, याकडे आदिवासी संघटना आणि पालकांचे लक्ष लागले आहे.प्रमुख मागण्या : आश्रमशाळांमधील बंद व नादुरुस्त सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने दुरुस्त करावेत.विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही व्यवस्था सक्षम करावी.वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात.सेंटर किचनमधील भोजनाची गुणवत्ता व स्वच्छता नियमित तपासावी.खराब अथवा निकृष्ट अन्नाबाबत तक्रारी असल्यास तातडीने चौकशीकरावी. आश्रमशाळांमध्ये स्वच्छता, पिण्याचे पाणी व इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यातआदिवासी विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्यद्यावे.प्रशासनाने आश्रमशाळांची प्रत्यक्ष पाहणी करून प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवावेत यावेळी आंदोलकांनी पोलीस प्रशासनाचे व प्रकल्प अधिकारी देखील आभार मानले सांगितले ही लढाई तुमची आमची नाही तर शासनाची आणि आमची आहे.

## कै. हौसाबाई बागड यांचे निधन

संगमनेर : (स. गांवकरी)



अकोले तालुक्यातील विठे येथिल हल्ली संगमनेर तालुक्यातील रायते-वाघापूर रोड परिसरातील कै. गं. भा. हौसाबाई दगडू बागड यांचे राहत्या घरी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. प्रवरातीरावर त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या निधनाने बागड परिवारासह नातेवाईक, आप्तेष्ट व पंचक्रोशीत शोककळा पसरली आहे. अत्यंत प्रेमळ, मायाळू आणि कुटुंबवत्सल स्वभावाच्या हौसाबाई बागड यांनी आपल्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला मायेची ऊब व आधार दिला. त्यांच्या जाण्याने कुटुंबाने मायेची सावली गमावल्याची भावना व्यक्त होत आहे. भारती नालकर यांच्या त्या मातोश्री होत त्यांच्या अंत्यविधी समय राजकीय सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्व हौसाबाई बागड या कुटुंबातील ज्येष्ठ व प्रेमळ व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होत्या. लहान-थोरांशी आपुलकीने वागणे, कुटुंबातील सदस्यांना प्रेमाने जोडून ठेवणे आणि अडचणीच्या काळात सर्वांना धीर देणे, हा त्यांच्या स्वभावाचा विशेष गुण होता. त्यांच्या आठवणी कुटुंबीयांच्या मनात कायमस्वरूपी जिवंत राहतील. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नसल्याची भावना शोकाकुल परिवाराने व्यक्त केली आहे. कै. हौसाबाई बागड यांचा दशक्रिया विधी सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८ वाजता हनुमान मंदिर, मौजे रायते-वाघापूर रोड, ता. संगमनेर येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी प.पू. श्री. समाधान महाराज सुकेणेकर (वडगावलांडगा) यांची प्रवचनसेवा होणार आहे. या प्रसंगी नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार व परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहून दिवंगत हौसाबाई बागड यांना श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन समस्त बागड परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## टेंभा आश्रमशाळेतील २१ विद्यार्थिनींच्या विनयभंग प्रकरणाला गंभीर वळण; अधीक्षिकेवर चौकशी समितीचा ठपका!

शहापूर : (स. गांवकरी)

शहापूर तालुक्यातील टेंभा येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील २१ अल्पवयीन विद्यार्थिनींच्या विनयभंगाच्या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे. विद्यार्थिनींच्या तक्रारी वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत न पोहोचवल्याने संबंधित कर्मचाऱ्यावर वेळीच कारवाई झाली नसल्याचे चौकशी समितीच्या अहवालातून समोर आले आहे. याप्रकरणी आश्रमशाळेच्या अधीक्षिका गौरी सारक्ते यांना जबाबदार धरत समितीने त्यांच्यावर गंभीर ठपका ठेवला आहे. दरम्यान, विनयभंगाच्या आरोपातील चतुर्थ श्रेणी कर्मचारी गणपत गवळी याला प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे यांनी निलंबित केले आहे.

चौकशी समितीत सहाय्यक प्रकल्प अधिकारी, कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी आणि मुख्याध्यापिका यांचा समावेश होता.




चौकशीत विद्यार्थिनींनी गणपत गवळी हा झाडू मारताना खांद्यावर हात ठेवत असल्याचे, पाठीवर मारत असल्याचे तसेच आजारी असल्याचे सांगितल्यानंतर कपाळ व मानेवर हात लावत असल्याचे नमूद केले आहे. विशेष म्हणजे, गवळीविरुद्ध अघई आश्रमशाळेत २६ फेब्रुवारी २०२४ रोजीही अशाच स्वरूपाची घटना घडल्याचे समोर आले आहे. त्यामुळे त्याच्याविरोधात त्यावेळी कोणती कारवाई झाली आणि त्याला पुन्हा आश्रमशाळेत काम कसे मिळाले, याची सखोल चौकशी करण्याची मागणी पालकांकडून होत आहे. समितीने गवळीविरोधात कडक शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस केली आहे.

दरम्यान, टेंभा आश्रमशाळेत दहा सीसीटीव्ही कॅमेरे असल्याची माहिती असून ते कार्यरत होते की नाही, तसेच संबंधित घटनांचे चित्रण तपासण्यात आले का, याचा स्पष्ट उल्लेख चौकशी अहवालात नसल्याने आश्रमशाळेच्या सुरक्षा व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

तपासणी अहवालात विद्यार्थ्यांच्या निवासाची अपुरी व्यवस्था असल्याचे तसेच भोजनगृह, संगणक कक्ष, डिजिटल वर्गखोली आणि स्वतंत्र ग्रंथालय यांसारख्या सुविधांचा अभाव असल्याचेही नमूद आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि मूलभूत सुविधांचा प्रश्न ऐरणीवर आला असून, तक्रारी दडपून ठेवणाऱ्या अधीक्षिकेविरोधात प्रशासन कोणती कारवाई करणार, याकडे पालकांचे लक्ष लागले आहे.

## भिवंडी तालुक्यात एफ. एफ एस. ॲपद्वारे खत विक्री सुरळीत सुरू

### शेतकऱ्यांना घरबसल्या खत बुकिंगची सुविधा; क्यू. आर कोड दाखवून कृषी सेवा केंद्रातून खरेदी

भिवंडी : (स. गांवकरी)

केंद्र शासनाच्या Framework for Fertilizer Sale( एफ. एफ एस) ॲपद्वारे भिवंडी तालुक्यात आजपासून खत विक्रीची प्रक्रिया सुरळीतपणे सुरू झाली आहे. या नव्या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या आवश्यक खताचे बुकिंग करता येणार असून, बुकिंगनंतर मिळणारा क्यू आर

कोड निवडलेल्या कृषी सेवा केंद्रावर दाखवून खत खरेदी करता येणार आहे. खत विक्री आणि वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार खत उपलब्ध करून देणे तसेच संपूर्ण वितरण व्यवस्थेचे प्रभावी व्यवस्थापन करणे, हा एफ. एफ .एस प्रणालीचा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे खत खरेदीसाठी शेतकऱ्यांचा अनावश्यक वेळ आणि त्रास कमी होण्यास मदत होणार आहे.एफ. एफ .एस . प्रणालीची



अंमलबजावणी सुरळीत व्हावी यासाठी गुण नियंत्रण निरीक्षक विवेक दोंदे यांनी तालुक्यातील विविध कृषी सेवा केंद्रांना प्रत्यक्ष भेटी देऊन केंद्र चालक तसेच शेतकऱ्यांना ॲपच्या वापराबाबत आणि

क्यू आर कोडद्वारे खत खरेदी करण्याच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. प्रणाली सुरू असताना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी त्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून आवश्यक दक्षता घेतली. दरम्यान, एफ. एफ .एस . प्रणाली सुरू करण्यापूर्वी कृषी सेवा केंद्र चालकांसह कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात आले आहे. ग्रामस्तरावरही कृषी विभागामार्फत या प्रणालीबाबत जनजागृती आणि प्रसिद्धी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना अडचण आल्यास तातडीने मार्गदर्शन मिळावे यासाठी संबंधित अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांकही उपलब्ध करून देण्यात आले आहेत. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रामेश्वर पाचे तसेच कृषी विकास अधिकारी मुनीर बाचोटीकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम अधिकारी महेश बनकर आणि जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक बालाजी शिंदे यांनीएफ. एफ .एस . प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक प्रशिक्षण व मार्गदर्शन केले.या प्रणालीमुळे भिवंडी तालुक्यात शेतकऱ्यांना सुलभ, पारदर्शक आणि व्यवस्थित खत वितरण व्यवस्था उपलब्ध होणार आहे. खत खरेदी करताना शेतकऱ्यांना कोणताही अनावश्यक त्रास होऊ नये, यासाठी कृषी विभागाकडून संपूर्ण प्रक्रियेवर सातत्याने देखरेख ठेवण्यात येत आहे.

## राजगुरुनगरमध्ये ईद-ए-मिलाद उत्साहात साजरी

राजगुरुनगर : (स. गांवकरी)

इस्लाम धर्माचे संस्थापक प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांची जयंती अर्थात ईद-ए-मिलाद राजगुरुनगर येथे आज मोठ्या उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. यानिमित्त शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. तसेच लहान मुलांचे धार्मिक कार्यक्रम, शालेय साहित्य वाटप, मिठाई व सरबत वाटप आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पैगंबर जयंतीनिमित्त राजगुरुनगर येथील उत्तर मशिदीपासून मिरवणुकीला सुरुवात झाली. बाजारपेठ मार्गे ही मिरवणूक मोमिन आळी येथे पोहोचून सांगता झाली. मिरवणुकीत शहर व परिसरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विशेषतः लहान चिमुकल्यांचा उत्साह लक्षवेधी ठरला. मिरवणुकीमध्ये प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांनी मानवजातीला दिलेल्या प्रेम, बंधुभाव, शांतता, दया आणि मानवतेच्या संदेशांचे फलक प्रमुख आकर्षण ठरले. ईद-ए-मिलादच्या निमित्ताने क्रांतिवीर राजगुरू चौकातील तरुणांच्या वतीने नागरिकांसाठी सरबत वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी विविध ठिकाणी मिठाई वाटप करून नागरिकांना ईद-ए-मिलादच्या शुभेच्छा देण्यात आल्या. सांगता समारंभावेळी येथील मशिदीचे मौलाना अली अजगर, मौलाना रजा, मौलाना मुस्तकीम, हाफिज मुफस्सिर, हाफिज आदिल रजा आणि मौलाना गौसुलवरा यांनी उपस्थित मुस्लिम बांधवांना प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांची शिकवण, त्यांचे मानवतावादी संदेश आणि आदर्श आचरण याविषयी मार्गदर्शन केले.

# नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे तीन दिवसीय 'कुंभ भक्ती संगम'ची तयारी पूर्ण

## आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन : प्रवेश विनामूल्य, नाशिककरांसह भाविकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

### आयुक्त शेखर सिंह यांची माहिती

नाशिक : (स. गांवकरी)

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे नाशिक शहरात आयोजित कुंभ भक्ती संगमात शुक्रवार २८ ऑगस्टपासून भक्ती, संगीत आणि विविध भारतीय सांस्कृतिक परंपरांचा अनोखा अनुभव घेता येणार आहे. 'कुंभ भक्ती संगम' या तीन दिवसीय महोत्सवाची तयारी पूर्ण झाली असून २८ ते ३० ऑगस्टदरम्यान ठक्कर डोम येथे हा महोत्सव होईल. या महोत्सवाला प्रवेश विनामूल्य असून, तिकीट अथवा प्रवेशिका आवश्यक नसल्याने नाशिककर, भाविक, विद्यार्थी आणि सांस्कृतिक रसिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी आज पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केले.

या महोत्सवाचे २८ ऑगस्ट रोजी दुपारी साडेचार वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन होईल. उद्घाटनानंतर सायंकाळी ५.३० ते ७ या वेळेत अमृताश्रम स्वामी महाराज यांचे कीर्तन होणार असून, रात्री ८ ते १० या वेळेत राहुल देशपांडे 'अभंगवारी' सादर करतील. २९ ऑगस्ट हा दिवस 'भक्ती संमेलन' आणि विविध भक्ति



कार्यक्रमांच्या सादरीकरणांनी समृद्ध असेल. सकाळी १० ते १२ आणि दुपारी २ ते ४ या वेळेत दोन सत्रांमध्ये भक्ती संमेलन होईल.

पहिल्या सत्राचा विषय 'सिंहस्थ महाकुंभमेळा : भारतीय संत आणि समरसता' असून पराग महाराज चातुर्मासे हे सत्र समन्वयक असतील. या सत्रात शिवाजी महाराज मोरे, डॉ. वीरुपाक्ष शिवाचार्य महास्वामी, महंत श्रीमानस शास्त्री, सुदर्शन महाराज कपाटे, सुप्रिया साठे आणि प्रमोद महाराज जगताप सहभागी होतील.

दुसऱ्या सत्राचा विषय 'सिंहस्थ महाकुंभमेळा : राष्ट्रीयदृष्ट्या संतपरंपरेचा सहभाग आणि समन्वय' असून, डॉ. सदानंद मोरे हे सत्र समन्वयक असतील. श्री राणा महाराज वासकर, डॉ. द्वाराचार्य, महामंडलेश्वर रामकृष्णदास महाराज लहवितकर, जनार्दन हरिजी महाराज, रामकृष्ण महाराज वीर, मंदार बुवा रामदासी आणि महंत श्री. चिरडे बाबा यांचा या सत्रात सहभाग असेल. भक्ती संमेलनानंतर सायंकाळी ५ ते ७ या वेळेत डॉ. चारुदत्त गोविंदस्वामी आफळे यांचे कीर्तन, तर रात्री ८ ते १० या वेळेत कु. मैथिली ठाकूर यांचा भजनाचा कार्यक्रम होईल. महोत्सवाच्या ३० ऑगस्टच्या अंतिम दिवशी देशाच्या विविध भागांतील भक्तिपरंपरांचा विशेष अनुभव घेता येणार आहे. दुपारी ३ ते ८ या वेळेत श्री दरबार साहिब, अमृतसर येथील भाई मनिंदर सिंह हजुरी रागी यांचे गुरबाणी शबद कीर्तन होईल. सायंकाळी ४ ते ५ या वेळेत मणिपूरच्या नट संकीर्तन महाजेग्याचे सादरीकरण होईल. सायंकाळी ५ ते ७ या वेळेत निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या कीर्तनाने महोत्सवाची सांगता होईल.

महोत्सवासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी वाहतूक, पार्किंग आणि गर्दी व्यवस्थापनाचे नियोजन संबंधित यंत्रणांच्या समन्वयाने करण्यात आले आहे. नागरिकांनी वाहनांसाठी निश्चित केलेल्या पार्किंग ठिकाणीच वाहने उभी करावीत आणि वाहतूक पोलिस तसेच कार्यक्रमस्थळी नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सूचनांचे पालन करावे. सायंकाळच्या कार्यक्रमांना रसिकांची मोठी उपस्थिती अपेक्षित असल्याने नागरिकांनी कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी पुरेसा वेळ ठेवून ठक्कर डोम येथे पोहोचावे, असे आवाहन आयुक्त श्री. सिंह यांनी केले.

आयुक्त श्री. सिंह म्हणाले, की 'कुंभ भक्ती संगम' हा नाशिककरांसाठी आणि देशभरातून येणाऱ्या भाविकांसाठी भक्ती, संगीत आणि विविध भारतीय परंपरांचा अनुभव घेण्याची एक चांगली संधी आहे. या कार्यक्रमासाठी कोणतेही प्रवेशशुल्क नाही. त्यामुळे नाशिककरांनी आपल्या कुटुंबीयांसह आणि मित्रपरिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून या तीन दिवसांचा आनंद घ्यावा." शबद कीर्तनाच्या वेळी उपस्थित भाविकांनी अध्यात्मिक भाव जपण्यासाठी शिर झाकून ठेवावे, अशी विनंती करण्यात आली आहे. तसेच कार्यक्रमाचे पावित्र्य, परिसरातील स्वच्छता आणि शिस्त कायम राहावी, यासाठी गुटखा, पान, बिडी, सिगारेट तसेच तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन कार्यक्रमस्थळी करू नये, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

स्थळ : ठक्कर डोम, नाशिक

कालावधी : २८ ते ३० ऑगस्ट २०२६

प्रवेश : विनामूल्य; तिकीट अथवा प्रवेशिका आवश्यक नाही

## थोडक्यात पण महत्वाचे



### एन.के.टी. ठाणावाला ट्रस्टतर्फे गरजू महिलांना मोफत साडी वाटप!

■ मुंब्रा-कौसा परिसरातील १०० ते १५० महिलांना लाभ; २० ते २५ वर्षांपासून सेवाभावी उपक्रम सुरू!

मुंब्रा (स. गांवकरी) : रक्षाबंधन पर्वानिमित्त एन.के.टी. ठाणावाला ट्रस्टच्या वतीने मुंब्रा-कौसा परिसरातील गरजू महिलांसाठी मोफत साडी वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजसेवक तथा मुंब्रादेवी सेवा मंडळाचे अध्यक्ष कांतिलाल वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या उपक्रमाचा विविध धर्मांतील सुमारे १०० ते १५० गरजू महिलांनी लाभ घेतला. एन.के.टी. ठाणावाला ट्रस्टच्या माध्यमातून गेल्या २० ते २५ वर्षांपासून रक्षाबंधनाच्या निमित्ताने हा सेवाभावी उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. यंदाही मोठ्या संख्येने महिलांनी सहभागी होत मोफत साड्या स्वीकारल्या. लाभार्थी महिलांनी ट्रस्टचे आभार मानत कांतिलाल वाघमारे यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी निसारभाई बेग, जयकार सावंत, फातमा भाभी, विजय साळुंखे, संगीता वाघमारे, सलीमभाई काजी, एरफान शेख, प्रीती पाटील, रेशमा ताई साळुंखे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी सहकार्य केले. रक्षाबंधनानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे समाजातील सद्भावना, बंधुभाव आणि गरजू महिलांना मदतीची भावना अधिक दृढ झाली, असे मुंब्रादेवी सेवा मंडळाच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले.



### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी घेतले श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन

शिर्डी (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. ना. श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी गुरुवारी शिर्डी येथे श्री साईबाबांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर (भा.प्र.से.) यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा सत्कार केला. यावेळी संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेत देशाच्या व राज्याच्या प्रगतीसह सर्वसामान्य नागरिकांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

### 'ईद-ए-मिलाद' निमित्त आयोजित महाआरोग्य शिबिराला उत्फूर्त प्रतिसाद



पुणे (स. गांवकरी) : 'ईद-ए-मिलाद'च्या निमित्ताने राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने 'जश्ने ईद-ए मिलादुन्नबी' कार्यक्रम, तसेच महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कॅम्पमधील एमजी रोड परिसरातील सी. टी. पंडोल अँड सन्स दुकानाशेजारी आयोजित शिबिराला नागरीकांना उस्फूर्त प्रतिसाद दिला. यामध्ये जवळपास १२०० जणांनी विविध तपासण्या करुन आवश्यक उपचार घेतले. यावेळी एच. व्ही. देसाई रुग्णालय, डी. वाय. पाटील रुग्णालय, ससून रुग्णालय, कॅन्टोनमेंट रुग्णालय अशा नामांकित रुग्णालयातील डॉक्टर्स व त्यांच्या टिमने नागरिकांच्या तपासण्या केल्या. यामध्ये कान-नाक-घसा, डोळे, दात, रक्तदाब, रक्तातील साखर, बोनमॅरो इतक्या तपासण्या करण्यात आल्या. शिबिराचे उद्घाटन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार सुनिल कांबळे, माजी महापौर प्रशांत जगताप, राष्ट्रवादी महिला कॉंग्रेस प्रदेश अध्यक्ष वैशाली ताई नागवडे, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस प्रदेश अध्यक्ष निखिल ठाकरे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस अध्यक्ष चिन्मय गाडे, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष व नगरसेवक राकेश कामठे, काँग्रेस माजी विद्यार्थी अध्यक्ष आमिर शेख, नगरसेवक निलेश अल्हाट, माजी नगरसेवक हनीफ शेख, माजी नगरसेवक सुरेखा कवडे, मुन्नोवर कुरेशी, जावेद खान, इलियास शेख, आसिफ खोकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## कुणबी प्रमाणपत्रांच्या पडताळणी प्रक्रियेत सुसूत्रता आणा : ना. विखे पाटील

छत्रपती संभाजीनगर :(स. गांवकरी)



कुणबी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रक्रियेत अधिक सुसूत्रता आणून ती सुलभ, पारदर्शक व गतिमान करण्याच्या सूचना जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. विद्यार्थ्यांच्या प्रकरणांवर प्राधान्याने कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीबाबत तसेच इतर संलग्न बाबींवरील शिफारशींवर करावयाच्या कार्यवाहीबाबत स्मार्ट सिटी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, परभणी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, लातूर जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्यासह आठही जिल्ह्यांतील जिल्हा जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष, सदस्य व सदस्य सचिव उपस्थित होते. दूरदृश्यप्रणालीद्वारे उपविभागीय अधिकारी व संबंधित अधिकारी सहभागी झाले.

डॉ. विखे पाटील यांनी सांगितले की, कुणबी जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत उपलब्ध नोंदी व कागदपत्रांच्या आधारे संबंधित व्यक्तीची वंशावळ तसेच सादर केलेल्या पुराव्यांची सुसंगती स्पष्टपणे तपासावी. महसुली कागदपत्रे, शैक्षणिक पुरावे तसेच इतर उपलब्ध अभिलेखांच्या आधारे वंशावळ निश्चित करण्याची कार्यवाही सुसूत्रपणे करावी. नागरिकांकडून नियमानुसार आवश्यक तीच कागदपत्रे मागवून प्रक्रिया सुलभ ठेवावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

वंशावळ निश्चित करताना मोडी लिपीतील नोंदी, जुन्या अभिलेखांमधील नोंदी, आडनाव नसलेल्या अभिलेखांबाबत तसेच स्थलांतरामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा बैठकीत आढावा घेण्यात आला. मोडी लिपीतील नोंदींचे तज्ज्ञांकडून भाषांतर करून घेण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

इतर जिल्ह्यांमध्ये किंवा शेजारील गावांमध्ये संबंधित नोंदी उपलब्ध असल्यास तेथील अभिलेखांचा संदर्भ घेऊन वंशावळ व नातेसंबंधाची खातरजमा करण्याची कार्यपद्धती स्पष्ट ठेवावी, असे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रक्रियेत अधिक समन्वय ठेवण्याबाबतही त्यांनी सूचना दिल्या. उपविभागीय अधिकाऱ्यांकडून तपासण्यात आलेली संबंधित कागदपत्रे जात वैधता समितीला उपलब्ध करून देत दोन्ही प्रक्रियांमध्ये अधिक समन्वय साधावा. ऑनलाइन प्रक्रियेचा प्रभावी वापर करून नागरिकांना वेळेत सेवा मिळेल, यासाठी कार्यपद्धती अधिक सुलभ करावी. विद्यार्थ्यांसाठी विशेष शिबिरांच्या माध्यमातून जात वैधता प्रमाणपत्राची कार्यवाही सुलभ करण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. बैठकीत विविध प्रकरणांच्या कार्यवाहीचाही आढावा घेण्यात आला. जुन्या अभिलेखांतील नोंदी, त्यांचे भाषांतर तसेच उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे वंशावळ निश्चित करण्याच्या प्रक्रियेबाबत अधिकाऱ्यांनी माहिती दिली.

आवश्यकतेनुसार मूळ अभिलेख मागवून त्याची पडताळणी करून तसेच तज्ज्ञांकडून भाषांतराची खातरजमा करून नियमानुसार प्रकरणांचा निर्णय घेण्यात येत असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रक्रियेची स्पष्ट माहिती तसेच आवश्यक कागदपत्रांची यादी सहज उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही डॉ. विखे पाटील यांनी दिल्या.

## पुणे ऑन पेडल्स सायकल रॅलीचे आयोजन

पुणे : (स. गांवकरी)



संसदीय स्थायी समितीच्या (विज्ञान आणि तंत्रज्ञान, पर्यावरण, वने व हवामान बदल) अध्यक्षा, राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या पुढाकारातून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दर वर्षी "पुणे ऑन पेडल्स" ही सायकल रॅली आयोजित केली जाते. यावर्षी सर्वांच्या सोयीसाठी हा उपक्रम 13 सप्टेंबर 2026 रविवार सकाळी 6.00 वाजता संपन्न होणार आहे. प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी सांगितले की, सायकल वापरण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम गेल्या सहा वर्षांपासून आयोजित केला जात आहे. सायकलचे शहर अशी पुण्याची ओळख आहे. सायकल वापरणे आरोग्यासाठी लाभदायक आहे. यंदाच्या सायकल रॅलीतही सहा हजारांहून अधिक सायकलस्वारांनी सहभागी होतील अशी अपेक्षा आहे. त्या पुढे म्हणाल्या, "ही रॅली केवळ सायकल चालविण्याचा कार्यक्रम नसून सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन आणि आरोग्यजागृतीचा संदेश देणारा उपक्रम आहे. नागरिक, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सायकलप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या चळवळीला बळ द्यावे." या कार्यक्रमास अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तरी आपण जास्तीत जास्त संख्येने आपल्या विद्यार्थ्यांना सायकल रॅली व फॅमेली वॉकेथॉन साठी नोंदणी करावयास सांगावे व आपली संख्या कळवावी ही विनंती. सहभागींनी स्वतः ची सायकल व पाण्याची बाटली सोबत घेऊन यावी. सायकल नसणाऱ्या विद्यार्थ्यांना व पालकांना तसेच शिक्षकांना 'चालण्याच्या उपक्रमात' (वॉकेथॉन मध्ये) सहभागी होता येईल.

## आस्ताने येथे ९० फूट खोल विहिरीत पडलेल्या १७ वर्षीय मुलाचा मृतदेह अग्निशमन दलाने शर्तीचे प्रयत्नातून बाहेर काढला

मालेगाव : (स. गांवकरी)





मालेगाव तालुक्यातील आस्ताने येथे ९० फूट खोल व पाण्याने तुडुंब भरलेल्या विहिरीत १७ वर्षीय मुलगा पडल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी (दि. २५ ऑगस्ट) दुपारी घडली. घटनेची माहिती मिळताच मालेगाव अग्निशमन दलाचे बचाव पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत जवानांनी शोधकार्य सुरू करून अवघ्या अर्ध्या तासात मुलाचा मृतदेह विहिरीबाहेर काढण्यात यशमिळवले. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी सुमारे १.३५ वाजता श्री. योगेश बिचकुले यांनी भ्रमणध्वनीवरून मालेगाव मुख्य अग्निशमन केंद्राशी संपर्क साधून आस्ताने येथील श्री. सखाराम पांडुरंग उशिरे यांच्या गट क्रमांक १४७ मधील विहिरीत गणेश झुलाल बिचकुले (वय १७) हा मुलगा पडल्याची माहिती दिली.घटनेची माहिती मिळताच मालेगाव मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशमन दलाचे बचाव पथक तातडीने घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी पोहोचल्यानंतर जवानांसमोर मोठे आव्हान होते. संबंधित विहीर साधारण ९० फूट खोल असून ती पाण्याने पूर्णपणे भरलेली होती. अशा धोकादायक परिस्थितीत जवानांनी कोणतीही वेळ न दवडता शोधकार्य सुरू केले.पाण्याची खोली, विहिरीची रचना आणि प्रतिकूल परिस्थिती यामुळे बचावकार्य अत्यंत कठीण होते. मात्र अग्निशमन दलाच्या जवानांनी कौशल्य, धैर्य आणि तत्परतेने शोधमोहीम राबवली. अखेर अवघ्या अर्ध्या तासाच्या अथक प्रयत्नांनंतर गणेश बिचकुले यांचा मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात जवानांना यश आले.मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी गावचे पोलीस पाटील श्री. शेखर इंगळे व कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आला. या दुर्दैवी घटनेने आस्ताने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.या बचावकार्यात मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. मोहन बैरागी, शकील अहमद मोहम्मद शाबीर, किरण सूर्यवंशी तसेच वाहनचालक श्री. भूषण ठाकरे यांनी परिश्रम घेतले.अत्यंत कठीण परिस्थितीत अवघ्या अर्ध्या तासात शोधकार्य पूर्ण करून मृतदेह बाहेर काढणाऱ्या मालेगाव अग्निशमन दलाच्या तत्परतेचे परिसरातून कौतुक होत आहे.

## यशासाठी कठोर मेहनत, सातत्य आणि संघर्षाला संधींची जोड हवी

*माधुरी मिसाळ यांचे प्रतिपादन; ब्रिक ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचा स्थापना दिवस व पदवी प्रदान समारंभ उत्साहात*

पुणे : (स. गांवकरी)




"आयुष्यात कष्ट केल्याशिवाय संधी मिळत नाही. मिळालेली संधी साधण्यासाठी आपली क्षमता सिद्ध करणे आवश्यक आहे. जीवनातील संघर्ष आणि कष्टांना सामोरे जाताना कुटुंब आपल्या पाठीशी उभे असते. त्यामुळे सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची कला आत्मसात करा. समोरच्याला आदर देत देशाच्या प्रगतीत योगदान देण्याचा प्रयत्न करा," असे प्रतिपादन राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी केले. भविष्यात तरुणपिढीची भूमिका महत्वाची असून, भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी तरुण वास्तुरचनाकारांनी योगदान द्यावे, असेही त्यांनी नमूद केले. सतिश मिसाळ एज्युकेशनल फाऊंडेशनच्या ब्रिक ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचा १३ वा स्थापना दिवस आणि पदवी प्रदान समारंभात माधुरी मिसाळ बोलत होत्या. उंड्री येथील महाविद्यालयात आयोजित समारंभावेळी नगरसेविका मानसी देशपांडे, ऑलकार्गो ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष शशीकिरण शेट्टी, अहमदाबाद येथील आर्किटेक्ट स्नेहल शाह, प्राचार्या डॉ. पूर्वा केसकर, उपप्राचार्य आर्कि. मनाली देशमुख, जयदीप चक्रवर्ती, मयुरेश शिरोळकर, स्वप्निल शेठ, व्हीके ग्रुपच्या संचालिका आर्कि. अपूर्वा कुलकर्णी, महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. वैदेही लावंड, डॉ. श्रद्धा मांजरेकर, आर्कि. नलिनी नाईक निंबाळकर यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माधुरी मिसाळ म्हणाल्या, "शिक्षणाच्या क्षेत्रात मोठे परिवर्तन होत आहे. या नव्या बदलांना समजून घेत विद्यार्थ्यांनी आधुनिक कौशल्ये विकसित केली पाहिजेत. आपल्या कार्यातून भारताची जगभरातील प्रतिमा उंचावण्यासाठी योगदान द्यावे. तरुणांना योग्य दिशा दाखविण्याचे कामही आधीच्या पिढीने करावे. पदवी मिळणे हा एक टप्पा आहे. प्रत्यक्ष कामाच्या क्षेत्रात तुम्ही आता पदार्पण करीत असून, आपल्या स्वतःच्या प्रगतीसोबतच आई-वडिलांचे, आपल्या संस्थेचे व गुरुजनांचे नाव उंचावणारी कामगिरी करा. आजची पदवी हा प्रवासाचा शेवट नसून, एका नव्या अध्यायाची सुरुवात आहे. आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा उपयोग समाजासाठी करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करा. " शशीकिरण शेट्टी म्हणाले, "शिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या विकासासाठी झाला पाहिजे. केवळ पदवीपेक्षा शिक्षणाचा प्रत्यक्ष जीवनात आणि उद्योगक्षेत्रात उपयोग करता येणे गरजेचे आहे.

## एथरने कोनार्कच्या मेटल बॉडीची पहिली झलक दिली

पुणे : (स. गांवकरी)

■ २९ ऑगस्टला होणार लॉन्च

एथर एनर्जीने आपल्या आगामी इलेक्ट्रिक स्कूटर कोनार्कची पहिली झलक दिली आहे. कंपनीच्या नव्या ईएल प्लॅटफॉर्मवर तयार होणाऱ्या या स्कूटरचे अनावरण 29 ऑगस्ट रोजी होणार असून, त्यातील मेटल बॉडी हा एक खास डिझाइन एलिमेंट म्हणून समोर आला आहे. एथरचे सीईओ आणि सहसंस्थापक तरुण मेहता यांनी 'X'वर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये स्कूटरच्या मेटल बॉडीचा क्लोज-अप दाखवला आहे. "टक टक, कोण?" या कॅप्शनसह दिलेल्या टीझरमध्ये नॉकचा आवाज वापरून मेटल कन्स्ट्रक्शनकडे लक्ष वेधले गेले आहे. कोनार्क हा एथरच्या ईएल प्लॅटफॉर्मवर तयार होणारा पहिला प्रॉडक्शन स्कूटर असेल. एथर कम्युनिटी डे 2026 मध्ये हा प्लॅटफॉर्म सादर करण्यात आला होता. नव्या स्कूटरच्या कुटुंबासाठी हा प्लॅटफॉर्म बेस म्हणून विकसित करण्यात आला आहे, ज्यामुळे एथरला इलेक्ट्रिक टू-व्हीलर मार्केटमध्ये अधिक व्यापक आणि सहज उपलब्ध सेगमेंटमध्ये प्रवेश करता येईल. कोनार्कच्या माध्यमातून एथर आपला उत्पादन पोर्टफोलिओ 450 आणि रिज्ता फॅमिलीपलीकडे विस्तारत आहे. ही स्कूटर कंपनीच्या पुढील प्रॉडक्ट डेव्हलपमेंट फेजचा भाग असून, एथरचा डिझाइन, इंजिनिअरिंग, सॉफ्टवेअर आणि दैनंदिन वापरातील सोयीसुविधा यांचा दृष्टिकोन अधिक व्यापक ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. कोनार्कचे अनावरण 29 ऑगस्ट 2026 रोजी बेंगळुरूमध्ये होणाऱ्या एथर कम्युनिटी डे कार्यक्रमात केले जाणार आहे. या कार्यक्रमात ईएल प्लॅटफॉर्मवरील पहिला प्रॉडक्शन लॉन्च म्हणून त्याची नोंद होईल.

## साहित्य, संस्कृतीच्या वारशाने सहकाराची चळवळ समृद्ध बनवू : उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार

लोणी : (स. गांवकरी)



प्रवरानगर हे सहकार चळवळीचे प्रेरणास्थान आहे. ग्राम विकासाचा आदर्श मॉडेल म्हणून प्रवरा मॉडेल हे देशात ओळखलं जाते. सामान्य माणसाला विकसित करण्याचे काम सहकार महर्षी विठ्ठलराव विखे पाटील यांनी सहकार चळवळीच्या माध्यमातून केले. सहकार चळवळीला साहित्य व संस्कृतीच्या माध्यमातून समृद्ध बनवू असे प्रतिपादन राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांनी केले.

प्रवरानगर येथे धनंजय गाडगीळ सभागृहात आयोजित विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जयंतीनिमित्त जीवनगौरव पुरस्काराच्या वितरण कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

यावेळी राज्याचे जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील.माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के-पाटील, आ. मोनिका राजळे, आ. काशिनाथ दाते, आ. आशुतोष काळे, आ. विठ्ठलराव लंघे, आ. संग्राम जगताप, आ. अमोल खताळ, आ. प्राजक्त तनपुरे, माजी आमदार लहू कानडे, चंद्रशेखर कदम, जिल्हा बँकेचे माजी चेअरमन चंद्रशेखर घुले, प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ.राजेंद्र विखे-पाटील, चेअरमन डॉ. सुजय विखे-पाटील, सौ. शालिनीताई विखे-पाटील, ध्रुव विखे-पाटील, अविनाश आदिक, सौ. अनुराधा नागवडे, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांची उपस्थिती होती. प्रवरानगर हे साखर उत्पादनाशिवाय शिक्षण रोजगार आणि ग्रामविकासाचे उत्तम मॉडेल असून येथे सामान्य माणसाला विकसित करण्याचे काम विठ्ठलराव विखे पाटील यांनी पाहिलेल स्वप्न पूर्ण होत आहे .तोच वारसा सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात पुढे चालवला. जीवनगौरव पुरस्कार प्राप्त असणारे उत्तम कांबळे यांनी लिखाणातून दिशा देण्याचे काम केले आहे प्रतिभावंतांचा सन्मान प्रवरा नगरने केलेला आहे. सहकाराची ताकद मजबूत करण्यासाठी साहित्य संस्कृतीचा वारसा जपत समाजाला समृद्ध बनवण्याचे काम करू असे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले. सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या १२६ व्या जयंती दिनानिमित्त राज्यस्तरीय साहित्य, कलागौरव आणि प्रबोधन पुरस्कारांचे वितरण राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रस्ताविकामध्ये विठ्ठलराव विखे पाटील यांच्या नावाने देण्यात येणाऱ्या पुरस्काराची अखंड परंपरा सुरू असून आज राज्यभर शेतकरी दिन साजरा होत आहे हा त्यांच्या जयंतीनिमित्त आनंदाचे आणि गौरवाची बाब आहे. पुरस्काराचे हे ३६वे वर्ष असून ही परंपरा सुरू आहे. असे सांगितले. विठ्ठलराव विखे पाटील जीवनगौरव पुरस्कार प्राप्त साहित्यिक उत्तम कांबळे यांनी पुरस्काराच्या बाबत मनोगत व्यक्त करताना सांगितले की, प्रवराच्या नदीकाठाने साखर कारखान्याबरोबर नवा माणूस तयार केला.

समाज, साहित्य संस्कृतीला बळ देणाऱ्या पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या नावाने पुरस्कार मला प्राप्त झाला याबद्दल आनंद होत असून नैतिकतेवर राजकारणाचा पाया इथल्या मातीत आहे. साहित्यिकांच्या मागे समाज हितासाठी लिहिणाऱ्या लेखकांना पाठबळ अशा पुरस्कारातून मिळत असते.

हा पुरस्कार समाजातील शोषित व्यक्तीला आवाज आणि चेहरा देण्यासाठी केलेल्या लिखाणाचा गौरव असल्याचे त्यांनी सांगितले. मला लेखक म्हणून समाजाने जे स्वीकारलं या पुरस्कारांची ऊर्जा म्हणून उपयोग होईल तसेच विठ्ठलराव विखे पाटील यांचा कार्य आणि वारसा समाजासमोर येण्यासाठी यावर चित्रपट आणि तसेच त्यांच्या कार्याचा गौरव ग्रंथ निर्माण करण्याची अपेक्षा यावेळी त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोपात विश्वास पाटील म्हणाले की, प्रवरानगर गुणग्राहकतेच महत्वपूर्ण ठिकाण असून अहिल्यानगर जिल्हा ऐतिहासिक दृष्ट्या महत्वपूर्ण आहे. मराठी भाषा जाणीवपूर्वक शिकणे हे एक तंत्र आहे .मातृभाषेच्या माध्यमातून सुसंस्कृत आणि अधिक सर्वगुण संपन्न भावी पिढी निर्माण होत असते. मराठी ग्रंथालय आणि शाळा टिकल्या तर मराठी भाषा आपण वाचवू शकतो, सर्वांनी एकत्र येऊन याबाबत काम करणे आवश्यक असल्याचेही आवाहन विश्वास पाटील यांनी केले. या वर्षी पुरस्कार निवड समितीने 'पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील साहित्य जीवनगौरव पुरस्कार' उत्तम कांबळे याशिवाय 'राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार' संहिता राजन विशेष साहित्य पुरस्कार' सुरेंद्र दरेकर , राज्यस्तरीय कलागौरव पुरस्कार' तमाशा कलेतील सेवेबद्दल मालती इनामदार , नाट्यसेवा मधील पुरस्कार' सचिन शिंदे समाजप्रबोधन साठी मराठी अभ्यास परिषद (पुणे) या संस्थेस,तर जिल्हा साहित्य पुरस्कार' निवृत्ती जोरी ,संगमनेर आणि प्रोत्साहनपर साहित्य पुरस्कार' संजय गोर्डे यांना देऊन सन्मानित करण्यात आले.

मान्यवरांच्या हस्ते 'लढत' इतर अन्य पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सुजय विखे पाटील यांनी केले.

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २५५ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार दि. २८ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## नेपाळमध्ये अडकलेल्या नागरिकांच्या सुटकेसाठी महाराष्ट्र सरकार सक्रिय

मुंबई (समर्थ गांवकरी)

नेपाळमध्ये निर्माण झालेल्या भीषण पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर तेथे अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून समन्वयाने प्रयत्न सुरू आहेत. सातारा, महाबळेश्वर आणि पुणे परिसरातील काही नागरिक नेपाळमध्ये अडकले असून, त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना सुरक्षितपणे महाराष्ट्रात परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

शिंदे यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने नेपाळला मदतीचा हात पुढे केला आहे. महाराष्ट्र सरकार, राज्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि शिवसेनेची आपत्ती व्यवस्थापन टीमही या परिस्थितीत सक्रिय असून, नेपाळमधील शिवसेना कार्यकर्त्यांच्या माध्यमातून अडकलेल्या नागरिकांशी संपर्क साधून मदत पोहोचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान, परिवहन विभागाच्या मराठी भाषा प्रशिक्षण अभियानाचेही शिंदे यांनी कौतुक केले. या अभियानातून सुमारे १ लाख ६० हजार अमराठी नागरिकांनी मराठी भाषा शिकली, तर मुंबईतील सुमारे १५ ते २० हजार ऑटोरिक्षा आणि टॅक्सी चालक-मालकांना प्रमाणपत्रे देण्यात आली. अन्य भाषिकांमध्ये व्यवहारातील मराठी शिकण्याची गोडी निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.

# रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी शिकण्यासाठी एक वर्षाची मुदत, सर्व प्रकारची कारवाई थांबवली

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रात रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा शिकणे बंधनकारक करण्यात आले असले, तरी विविध वयोगटातील चालकांना इतक्या अल्प कालावधीत भाषा आत्मसात करणे कठीण जात असल्याचा मुद्दा समोर आला होता. या पार्श्वभूमीवर, चालकांच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी केलेल्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करत राज्य सरकारने रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा शिकण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सह्याद्री अतिथीगृहावर आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही घोषणा केली.

विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी हाजी आराफात यांच्या माध्यमातून आपली भेट घेतल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात मराठी असो किंवा अन्य भाषिक, प्रत्येकाने मराठी शिकलेच पाहिजे या भूमिकेला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. यापूर्वीही चालकांनी यासाठी केलेले प्रयत्न कौतुकास्पद असून भविष्यातही हे प्रयत्न असेच सुरू राहणार आहेत. मात्र, वेगवेगळ्या वयोगटातील चालकांना अवघ्या काही दिवसांत किंवा कमी कालावधीत मराठी शिकणे व्यावहारिकदृष्ट्या शक्य नसल्याने त्यांना आणखी काही कालावधी देण्याची विनंती संघटनांनी केली होती.



या मागणीची दखल घेत सरकारने चालकांना एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला असून, या मुदतीत त्यांच्यावर कोणतीही दंडात्मक वा कायदेशीर कारवाई केली जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. या कालावधीत विविध माध्यमातून विशेष वर्ग सुरू केले जातील तसेच आवश्यक शैक्षणिक साहित्य तयार करून ऑटो रिक्षा आणि टॅक्सीचालकांना सुलभ पद्धतीने मराठी भाषा शिकवली जाईल. जे चालक स्वतःहून पुढे येऊन मराठी शिकण्याची तयारी दर्शवत आहेत, त्यांना प्रशासनाकडून आवश्यक तो वेळ आणि सहकार्य देणे गरजेचे असल्यानेच हा निर्णय घेण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

## दूधगंगा पतसंस्थेची शंभर कोटींकडे यशस्वी वाटचाल; शनिवारी वार्षिक सर्वसाधारण सभा!

अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले (प्रतिनिधी) : अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील अग्रगण्य संस्था म्हणून ओळख असलेल्या दूधगंगा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेने शंभर कोटी रुपयांच्या ठेवींच्या दिशेने यशस्वी वाटचाल केली आहे. सहकार महर्षी स्वर्गीय विठ्ठलराव शंकरराव चासकर यांनी स्थापन केलेल्या या संस्थेची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महाराजा लॉन्स, कोल्हार-घोटी रोड येथे आयोजित करण्यात आली आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन चासकर यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा होणार असून, अशी माहिती संस्थेचे मुख्य व्यवस्थापक नवनाथ भोर यांनी दिली.

संस्थेचे कार्यक्षेत्र अकोले तालुका असून अकोले, राजूर, शेंडी, कोतूळ, ब्राह्मणवाडा, धुमाळवाडी रोड, समशेरपूर, खिरविरे, कुंभेफळ तसेच विस्तार कक्ष मेंहदुरी येथे शाखा कार्यरत आहेत. ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेचे भागभांडवल ६६ लाख ३२ हजार ४०० रुपये, राखीव व इतर निधी १ कोटी २४ लाख ३१ हजार ३ रुपये, तर सभासदांच्या ठेवी ७६ कोटी ६४ लाख ४७ हजार ८१४ रुपये आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत ठेवींमध्ये २८ टक्के वाढ झाली आहे. संस्थेची गुंतवणूक १४ कोटी ७० लाख ११ हजार ३५५ रुपये असून, सभासदांना वितरित केलेले कर्ज ५१ कोटी ४७ लाख ७२ हजार ५९६ रुपये आहे. कर्जवाटपातही ४२.४९ टक्के वाढ झाली आहे. अहवाल वर्षात संस्थेला ११ लाख ७४ हजार ७२१ रुपयांचा नफा झाला आहे. संस्थेचा कर्ज-ठेव प्रमाणांक ६५.४० टक्के असून, थकीत कर्जदार सभासदांची संख्या १०१ आहे. थकीत कर्जाच्या वसुलीसाठी संस्थेकडून सातत्याने प्रयत्न सुरू असून, कर्जदारांनी वेळेवर कर्जाचे हप्ते भरून आपले खाते नियमित ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

संस्थेने संगणकीकरण व मध्यवर्ती बँकिंग प्रणाली विकसित केली असून, २०१३-१४ पासून सर्व शाखांना त्याचा लाभ मिळत आहे. कोणत्याही शाखेतून व्यवहार करण्याबरोबरच तातडीने रक्कम वर्ग करण्याची सुविधा


डॉ. नितीन विठ्ठलराव चासकर


श्री. चंद्रकांत गंगाधर नाईकवाडी


श्री. नवनाथ तुकाराम भोर




उपलब्ध आहे. तसेच धनादेशाऐवजी दूरध्वनीद्वारे पैसे भरणे, तात्काळ निधी हस्तांतरण व राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरणासारख्या सुविधा संस्थेत सुरू आहेत. शेतकरी व ग्राहकांच्या सोयीसाठी वीजबिल भरणा केंद्रे, लॉकर व सुरक्षित लॉकर सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. संस्थेने भारत सरकार मान्यताप्राप्त संस्थेकडून कामकाज, सेवा व्यवस्थापन व नियंत्रण निकषांचे परीक्षण करून गुणवत्ता मानांकन प्राप्त केले आहे. दहा शाखांमध्ये ३७ प्रशिक्षित व अनुभवी कर्मचारी आणि १३ दैनिक ठेव प्रतिनिधी कार्यरत आहेत. संस्थेने सभासद व कर्जदारांसाठी अपघात विमा योजनाही राबविल्या आहेत. यावर्षी संस्थेला लेखापरीक्षणात 'ब' वर्ग प्राप्त झाला आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उपाध्यक्ष चंद्रकांत नाईकवाडी, दिलीपराव भांगरे, प्रकाश कोटकर, हेमलता चासकर, कमलेश गांधी, बालाजी येलमामे, साहेबराव नवले, योगेश देशमुख, सुनीता नवले, वैशाली धुमाळ, किरण लहरे, आकाश शिंदे, डॉ. एकनाथ ढोणनार, कचरू सहाने, त्रिंबक आवारी, दिनकर नाईकवाडी, चंद्रकला नाईकवाडी व मुख्य व्यवस्थापक नवनाथ भोर यांनी केले आहे.

## महिला आर्थिक सक्षमीकरणास प्राधान्य; 'उमेद'मुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळणार

### कृषी अवजार बँक, कृषी निविष्ठा केंद्रांसह महिलांच्या हातात शेतीची यंत्रे

मुंबई (समर्थ गांवकरी)

ग्रामीण महिलांना केवळ बचत गटांपुरते मर्यादित न ठेवता त्यांना शेती, व्यवसाय आणि उद्योजकतेच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रभावी प्रयत्न राज्य शासन विविध माध्यमातून करत आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात 'उमेद'च्या माध्यमातून सक्षणीकरणाचे हे काम ग्रामीण भागात यशस्वीपणे व्यापक स्वरुपात सुरू आहे. आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर, कृषी निविष्ठांची उपलब्धता आणि विविध व्यवसायांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना शाश्वत उत्पन्नाचे साधन मिळत असून, त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला नवी दिशा मिळत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

'उमेद' अभियानांतर्गत कृषी अवजार बँक आणि कृषी निविष्ठा केंद्र हे दोन महत्त्वाचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. अल्पभूधारक महिला शेतकऱ्यांना महागडी कृषी यंत्रे स्वतः खरेदी न करता भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणे, हा कृषी अवजार बँकेचा प्रमुख उद्देश आहे.

४०८ कृषी अवजार बँकांची उभारणी

वर्ष २०२४-२५ आणि २०२५-२६ या कालावधीत राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील ३५१ तालुक्यांत ४०८ कृषी अवजार बँका स्थापन करण्यात आल्या आहेत. त्याचा सुमारे ४० हजार ८०० महिला शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ झाला आहे. या अवजार बँकांमध्ये विविध कृषिपूरक अवजारांसह ट्रॅक्टरचीही सुविधा उपलब्ध आहे. महिला स्वयंसहाय्यता समूह, ग्राम संघ, प्रभाग संघ तसेच महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून या अवजार बँकांचे व्यवस्थापन केले जाते. त्यामुळे या सुविधा केवळ यंत्रसामग्री उपलब्ध करून देणाऱ्या केंद्रांपुरत्या मर्यादित न राहता समुदायाच्या मालकीच्या आणि व्यवस्थापनाखालील कृषी सेवा केंद्रे म्हणून विकसित होत आहेत.

शेतीचा खर्च कमी; उत्पादकतेला हातभार

महागडी कृषी यंत्रे खरेदी करण्याची गरज नसल्याने महिला शेतकऱ्यांचा भांडवली खर्च कमी होत आहे. पेरणी, आंतरमशागत आणि कापणीसारखी कामे आधुनिक यंत्रांच्या साहाय्याने वेळेत पूर्ण होत असल्याने शेतीतील कार्यक्षमता वाढण्यास मदत होत आहे. त्याचबरोबर अवजारे भाड्याने देण्याच्या माध्यमातून समुदाय आधारित संस्थांना नियमित उत्पन्नाचा स्रोत मिळत आहे. अवजार बँकांच्या व्यवस्थापन, देखभाल आणि वाहतुकीमुळे स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधीही निर्माण होत आहेत. त्यामुळे एका उपक्रमातून महिला शेतकरी, बचत गट आणि स्थानिक ग्रामीण अर्थव्यवस्था अशा अनेक घटकांना लाभ मिळत आहे.५४ महिला उत्पादक कंपन्यांकडून कृषी निविष्ठांचा पुरवठा

कृषी निविष्ठांच्या क्षेत्रातही 'उमेद'च्या माध्यमातून महिलांना नवी संधी उपलब्ध झाली आहे. राज्यातील ५४ महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांकडे बियाणे व खत विक्रीसाठी आवश्यक परवाने उपलब्ध आहेत. या माध्यमातून सुमारे ५४ हजार महिला सभासदांना सेवा दिली जात आहे. महिला शेतकरी उत्पादक कंपन्या आपल्या सभासदांची मागणी एकत्रित करून मोठ्या प्रमाणावर बियाणे, खते आणि इतर कृषी निविष्ठांची खरेदी करतात. सामूहिक खरेदीमुळे दर्जेदार निविष्ठा वेळेत आणि योग्य दरात उपलब्ध करून देण्यास मदत होत आहे. परिणामी शेतकऱ्यांचा निविष्ठांवरील खर्च आणि बाजारपेठेवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दिशेनेही या उपक्रमाची वाटचाल सुरू आहे.

रेशन दुकानापासून वीट निर्मितीपर्यंत

'उमेद' अभियानाने महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला कृषी क्षेत्रापुरते मर्यादित न ठेवता विविध व्यवसायांपर्यंत विस्तार दिला आहे. राज्यात स्वयं-सहाय्यता समूहांच्या माध्यमातून रेशन दुकाने, सिमेंट एजन्सी, वीट निर्मिती, केरोसीन एजन्सी आणि टाईल्स निर्मिती यांसारखे व्यवसायही महिलांकडून चालविले जात आहेत.

## जनलक्ष्मी पतसंस्थेच्या ठेवी ३०० कोटींच्या उंबरठ्यावर; २७ वी वार्षिक सभा ६ सप्टेंबरला!




अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यासह परिसरातील सहकार क्षेत्रात विश्वासार्हता निर्माण करणाऱ्या जनलक्ष्मी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महाराजा लॉन्स, अकोले येथे आयोजित करण्यात आली आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भाऊपाटील भिमाजी नवले यांनी सभासद, हितचिंतक तसेच पत्रकारांनी या सभेस उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

दि. ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेचे वसूल भागभांडवल ३ कोटी १ लाख रुपये, निधी ४० कोटी ८० लाख रुपये, ठेवी २५७ कोटी ९४ लाख रुपये, गुंतवणूक ८५ कोटी ११ लाख रुपये आणि येणे कर्ज २०८ कोटी ८४ लाख रुपये आहे. संस्थेची मालमत्ता १ कोटी ६० लाख रुपये असून संस्थेला १ कोटी १२ लाख रुपयांचा नफा झाला आहे. संस्थेचे खेळते भांडवल ३०४ कोटी ५१ लाख रुपये असून वार्षिक उलाढाल २९६१ कोटी २४ लाख रुपये झाली आहे. संस्थेचा निव्वळ अनुत्पादक कर्जाचा दर शून्य टक्के असून भांडवल पर्याप्तता प्रमाण २०.२४ टक्के आहे. संस्थेला 'अ' वर्ग लेखापरीक्षण श्रेणी प्राप्त झाली आहे.

संस्थेने आर्थिक वर्षानंतरही सातत्याने प्रगतीची वाटचाल कायम ठेवली आहे. दि. १७ ऑगस्ट २०२६ अखेर संस्थेच्या ठेवी २७७ कोटी २ लाख रुपयांवर पोहोचल्या असून एकत्रित गुंतवणूक १३१ कोटी रुपये झाली आहे. यामध्ये गुंतवणूक १२६ कोटी १३ लाख रुपये, बँक चालू खात्यातील शिल्लक ४ कोटी ४ लाख रुपये आणि रोख शिल्लक ८३ लाख रुपये आहे. संस्थेचे कर्ज १९६ कोटी ४९ लाख रुपये असून वार्षिक उलाढाल ३००० कोटी रुपयांवर पोहोचली आहे. निव्वळ अनुत्पादक कर्जाचे प्रमाण शून्य टक्के असल्याने संस्थेच्या आर्थिक शिस्तीचे आणि सक्षम व्यवस्थापनाचे दर्शन घडते. ठेवी ३०० कोटींचा टप्पा गाठण्याच्या दिशेने संस्थेची वेगाने वाटचाल सुरू आहे.

सभासद व ग्राहकांना आधुनिक बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्यावरही संस्थेने भर दिला आहे. संस्थेच्या विविध शाखांमध्ये भ्रमणध्वनी बँकिंग, तात्काळ निधी हस्तांतरण, राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरण, सुरक्षित ठेव पेटी, वीज बिल भरणा केंद्र आदी सुविधा कार्यरत आहेत. तसेच संस्थेच्या संकेतांकाच्या माध्यमातून खात्यावर थेट देयके स्वीकारण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सर्व आधुनिक सुविधांचा सभासदांनी व ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे उपाध्यक्ष अशोक भळगट यांनी केले आहे. जनलक्ष्मी पतसंस्थेच्या अकोले, कोतुळ, राजूर, संगमनेर, लिंगदेव, देवठाण, समशेरपूर, कळस बुद्रुक तसेच इतर शाखांमधून सभासद व ग्राहकांना सेवा दिली जात आहे. संस्थेच्या प्रगतीत सभासद, ठेवीदार, कर्जदार आणि ग्राहकांचे मोलाचे योगदान असल्याचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भाऊपाटील नवले यांनी सांगितले. ठेवी ३०० कोटींचा टप्पा पार करण्याच्या दिशेने होत

असलेली वाटचाल ही सभासदांच्या विश्वासाचे प्रतीक असल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेच्या आर्थिक प्रगतीसह मागील वर्षातील कामकाजाचा आढावा, संस्थेच्या आर्थिक स्थितीविषयी माहिती आणि आगामी काळातील नियोजनावर चर्चा होणार आहे. सभासदांनी संस्थेच्या भविष्यातील वाटचालीसाठी आपले मार्गदर्शन व सहकार्य कायम ठेवावे आणि रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी होणाऱ्या वार्षिक सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संचालक रोहिदास जाधव, अक्षय नवले, केशव बोडके, तुषार सुरपुरीया, प्रविण वाकचौरे, धनंजय बुरके, चारुदत्त पापळ, रविंद्र घाटकर, साहिल मेहता, डॉ. विष्णू बुळे, कारभारी दराडे, अनिता वाळुंज, सोनाली आवारी, अधिवक्ता बी. जी. वैद्य, अधिवक्ता पुष्पलता चौधरी तसेच कार्यकारी संचालक आत्माराम रंधे यांनी केले आहे.

## संक्षिप्त

### पिंपळवंडी पीडित कुटुंबाच्या मदतीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

पुणे (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथील पीडित कुटुंबियांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांनी आज निवासस्थानी जाऊन भेट घेत सांत्वन केले. दरम्यान घटनेच्या दिवशी पोलीस अधिक्षकांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून दोषीवर कठोरात कठोर कारवाई करण्याचे तात्काळ आदेश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने आर्थिक मदत कुटुंबाला देण्यात आली असून,पीडितेच्या भावंडांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी घेण्याचा निर्णय घेतल्याचे सुनेत्रा पवार यांनी सांगितले. तसेच पीडित कुटुंबाच्या मागणीनुसार 'शबरी आदिवासी घरकुल योजने'अंतर्गत घर उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच महिला व बाल विकास विभागाच्या 'मनोधैर्य योजने'अंतर्गत १० लाख रुपयांची मदत आज त्यांच्या खात्यावर जमा करण्यात येणार असल्याचे देखील सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी सांगितले.

### मंत्री नितेश राणे यांच्या माध्यमातून ९ आणि ११ सप्टेंबरला धावणार 'मोदी एक्सप्रेस'

मुंबई (समर्थ गांवकरी)

गणेशोत्सवाच्या काळात कोकणवासीयांना आपल्या गावी पोहोचता यावे, यासाठी सिंधुदुर्गचे पालकमंत्री तथा मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांच्या माध्यमातून दरवर्षीप्रमाणे यंदाही 'मोदी एक्सप्रेस' ही विशेष रेल्वे सोडण्यात येणार आहे. मागील चौदा वर्षांपासून अविरत सुरू असलेल्या या उपक्रमामुळे मुंबईत राहणाऱ्या चाकरमान्यांचा गावी जाण्याचा प्रवास अधिक सुकर होणार असून, येत्या ९ आणि ११ सप्टेंबरला दादर रेल्वे स्थानकातून ही गाडी कोकणाकडे मार्गस्थ होईल.

### सण-उत्सवांच्या काळात साखरेची झळ!

#### स्विगी, झेप्टो, ब्लिंकिटसह डी-मार्टमध्ये साखर खरेदीवर निर्बंध

मुंबई (समर्थ गांवकरी)

येत्या सणासुदीच्या दिवसांत प्रत्येक घरात विविध प्रकारचे गोडधोड पदार्थ आणि पारंपारिक मिठाया बनवण्यासाठी साखरेची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढते. मात्र, यंदा सण सुरू होण्याआधीच सर्वसामान्यांच्या खिशाला मोठा फटका बसण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. एका बाजूला खुल्या बाजारात साखरेच्या किमतींमध्ये कमालीची वाढ झाली आहे, तर दुसऱ्या बाजूला किरकोळ व्यापाऱ्यांनी आणि मोठ्या सुपरमार्केट्सनी ग्राहकांच्या साखरेच्या खरेदीवर मर्यादा लादल्या आहेत. त्यामुळे जास्त पैसे मोजूनही ग्राहकांना हवी तेवढी साखर खरेदी करता येत नसल्याने यंदाचा सण-उत्सवाचा काळ सर्वसामान्यांच्या बजेटचे गणित पुरते बिघडवणारा ठरणार आहे.

### गंडक नदीची पाणीपातळी घटली; बिहारवरील पुराचा धोका टळला

नवी दिल्ली/नेपाळ (समर्थ गांवकरी)

नेपाळ आणि बिहारमधील नागरिकांसाठी दिलासादायक बातमी आहे. गंडक म्हणजेच नारायणी नदीची पाणीपातळी वेगाने कमी होत असून, वाल्मिकीनगर गंडक बॅरेज येथे पाण्याचा प्रवाह सुमारे ८१ हजार क्युसेकपर्यंत खाली आला आहे. त्यामुळे बिहार आणि उत्तर प्रदेशच्या सीमावर्ती भागातील पुराचा संभाव्य धोका मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. नेपाळच्या रसुवा जिल्ह्यात यापूर्वी अचानक आलेल्या पाण्याच्या प्रवाहामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. तिबेट सीमेजवळ झालेल्या भूकंपानंतर पर्वत आणि बर्फाचा मोठा भाग नदीत कोसळल्याने नदीचा प्रवाह काही काळ अडवला गेला.

# माळशेज नागरी पतसंस्थेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ६ सप्टेंबरला!

ठाणे (समर्थ गांवकरी)

राज्यातील सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या माळशेज नागरी सहकारी पतसंस्थेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता एन. के. टी. हॉल, खारकर आळी, जिल्हाधिकारी कार्यालयाशेजारी, ठाणे येथे आयोजित करण्यात आली आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. चंद्रकांत महाराज डुंबरे यांच्या नेतृत्वाखाली 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे, उदास विचारे वेच करी' या उक्तीप्रमाणे संस्थेचा कारभार सुरू आहे. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष चंद्रकांत नामदेव डुंबरे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा होणार असल्याची माहिती संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नयना चंद्रकांत डुंबरे यांनी दैनिक समर्थ गांवकरीशी बोलताना दिली.

संस्थेने यंदाच्या आर्थिक वर्षात उल्लेखनीय प्रगती केली असून, संस्थेचे खेळते भांडवल वर्षाच्या सुरुवातीला ७८ कोटी ७८ लाख ६७ हजार ४७० रुपये इतके होते. त्यामध्ये ८ कोटी ९ लाख ६ हजार ४०८ रुपयांची वाढ होऊन वर्षाअखेरीस खेळते भांडवल ८६ कोटी ७९ लाख ६३ हजार ८७९ रुपयांवर पोहोचले आहे. संस्थेने सभासदांना ११ टक्के लाभांश जाहीर केला आहे. संस्थेचे भागभांडवल २ कोटी १६ लाख ३४ हजार ४०० रुपये असून, संस्थेने १८ कोटी ४४ लाख ९२ हजार ६९९ रुपयांची गुंतवणूक केली आहे. ठेवी ४३ कोटी ८८ लाख ७१ हजार ६७७ रुपये इतक्या आहेत. संस्थेने अहवाल वर्षात ६३ लाख १५ हजार २०० रुपयांचा नफा मिळविला असून, मागील वर्षाच्या नफ्यासह त्याची नियमानुसार विभागणी करण्यात आली आहे. राखीव निधी १५ लाख ७९ हजार १५८ रुपये, लाभांशासाठी २३ लाख ६४ हजार ३६२ रुपये, विद्यार्थी गुणगौरवासाठी १ लाख ५० हजार रुपये, इमारत निधीसाठी ५ लाख ३० हजार रुपये, समाजकल्याण निधीसाठी १० हजार रुपये, थकीत कर्जावरील व्याज निधीसाठी ७ लाख ३९ हजार ६०० रुपये, लाभांश समानीकरण निधीसाठी १० हजार रुपये, कर्मचारी कल्याण निधीसाठी १० हजार रुपये आणि थकीत कर्ज निधीसाठी ८ लाख ९८ हजार रुपये अशी तरतूद करण्यात आली आहे.

बँकिंग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अमूलाग्र बदल झाले असून, भारतीय रिझर्व्ह बँक, महाराष्ट्र राज्य सहकार विभाग तसेच संबंधित नियामक मंडळांच्या नियमांनुसार काम करताना अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. बदलत्या वातावरणात आणि वाढत्या स्पर्धेत संस्थेने आपले स्थान टिकवून ठेवण्यासाठी सभासदांनी कर्ज घेतल्यानंतर वेळेवर कर्जफेड करणे आवश्यक आहे. ऐपत असूनही कर्जाचे हप्ते न भरणे अथवा विविध प्रकारे दबाव तंत्राचा वापर करणे ही बाब बँकिंग क्षेत्रासाठी घातक असल्याने सभासदांनी याबाबत गांभीर्याने विचार करावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. संस्थेच्या प्रगतीमध्ये सर्व शाखा समित्यांचे अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांचे मोलाचे योगदान असून, संचालक मंडळाच्या नियमित बैठका, विविध समित्यांच्या सभा तसेच शाखा समित्यांच्या बैठका आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या नियमित ऑनलाइन बैठकीमुळे संस्थेचा कारभार शिस्तबद्ध पद्धतीने सुरू आहे. काही शाखा भाडेतत्त्वावरील जागेत कार्यरत असून, त्या शाखाही संस्थेच्या मालकीच्या जागेत सुरू करण्यासाठी संचालक मंडळ प्रयत्नशील आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात सभासदांच्या पाल्यांमधील इयत्ता पहिली ते सातवी, इयत्ता आठवी ते बारावी, पदवीधर, अभियंता, डॉक्टर, सनदी लेखापाल आणि व्यवस्थापन पदवीधारक विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांना



प्रोत्साहनपर बक्षिसे देण्याचा कार्यक्रम रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे उपाध्यक्ष धनंजय दांगट, गुरुदयालसिंग शेठ धनोत्रा, सचिव अरुण राजदेव, संचालक दिनकर पाचंगे, गंगाराम कुऱ्हाडे, प्रवीण ठोंबरे, श्रीकांत सहाने, अनिल ठोंबरे, सुबोध ठोंबरे, स्नेहल नाथ, विजय कुरकुटे, अविनाश सावंत, रत्ना इंगळे, चैतन्या काळखैर, परशुराम सडाके तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी नयना डुंबरे यांनी केले आहे.

# शिक्षकांच्या रिक्त पदांवरून खा. नीलेश लंके आक्रमक

- **१ सप्टेंबरपासून उपोषण**
- **२,५२५ शिक्षकांची पदे रिक्त असल्याचा दावा**
- **३१ ऑगस्टपर्यंत निर्णय घेण्याची जिल्हा परिषद प्रशासनाला मुदत**

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरावीत, शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा वाढता भार कमी करावा आणि शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान थांबवावे, या मागणीसाठी खासदार नीलेश ज्ञानदेव लंके यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या मागण्यांवर ३१ ऑगस्टपर्यंत ठोस निर्णय व लेखी कृती आराखडा न मिळाल्यास १ सप्टेंबर पासून जिल्हा परिषद आवारात उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



खासदार लंके यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांना दिलेल्या पत्रात जिल्ह्यातील शिक्षकांच्या रिक्त पदांचा प्रश्न गंभीर असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. उपलब्ध अधिकृत आकडेवारीनुसार प्राथमिक व पदवीधर शिक्षक संवर्गातील ४७१, तर माध्यमिक विभागातील २ हजार ५४ पदे अशी एकूण २ हजार ५२५ शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. प्रत्येक शिक्षकामागे २० विद्यार्थी गृहीत धरल्यास सुमारे ५० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर याचा परिणाम होत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. एकीकडे हजारो शिक्षकांची पदे रिक्त असताना कार्यरत शिक्षकांनाच अध्यापनाव्यतिरिक्त विविध अशैक्षणिक कामे करावी लागत असल्याकडे लंके यांनी लक्ष वेधले आहे. बीएलओ ड्युटी व मतदार यादी पुनरिक्षण, जनगणना व विविध शासकीय सर्वेक्षणे, ऑनलाइन पोर्टलवर माहिती भरणे, विद्यार्थ्यांचे आधार कार्ड व बँक खाती, पोषण आहार, एफएसएसएआय नोंदणी, आरोग्यविषयक नोंदी तसेच विविध योजनांचे अहवाल व ऑनलाइन कामे शिक्षकांवर सोपविली जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. शिक्षकांचा अध्यापनाचा वेळ अशा कामांमध्ये खर्च होत असल्यास विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे मिळणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. शिक्षकांचा प्रश्न हा केवळ कर्मचारीविषयक प्रश्न नसून तो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी थेट संबंधित असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शिक्षकांची हजारो पदे रिक्त असताना ती भरण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली, आवश्यक प्रस्ताव व पाठपुरावा वेळेत का करण्यात आला नाही, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीची जबाबदारी कोणाची, तसेच कार्यरत शिक्षकांवर पडलेल्या अतिरिक्त कामाच्या भाराची जबाबदारी कोणाची, असे प्रश्न लंके यांनी उपस्थित केले आहेत. शिक्षकांचा प्रत्यक्ष अध्यापनाचा वेळ आणि अशैक्षणिक कामांसाठी जाणारा वेळ याचा प्रशासनाने आढावा घेतला आहे का, याबाबतही त्यांनी खुलासा मागितला आहे. जिल्ह्यातील सर्व रिक्त शिक्षक पदे तातडीने भरण्यासाठी अंतिम मुदतीसह कालबद्ध कृती आराखडा जाहीर करावा. प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील रिक्त पदांची शाळानिहाय, विषयानिहाय व संवर्गनिहाय अंतिम यादी जाहीर करावी. रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान व कार्यरत शिक्षकांवरील अतिरिक्त भाराचा तालुकानिहाय आढावा घेऊन लेखी खुलासा द्यावा, अशी मागणी लंके यांनी केली आहे. तसेच शिक्षकांना अध्यापनाशी थेट संबंध नसलेल्या अशैक्षणिक कामांपासून मुक्त करावे, अत्यावश्यक शासकीय कामांसाठी पर्यायी प्रशासकीय व्यवस्था निर्माण करावी आणि शिक्षकांची कमतरता असलेल्या शाळांमध्ये तात्पुरती शिक्षक व्यवस्था करून विद्यार्थ्यांचे नुकसान तातडीने थांबवावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

३१ ऑगस्टपर्यंत निर्णय, अन्यथा उपोषण

या प्रश्नावर प्रशासनाने अपेक्षित गांभीर्याने कार्यवाही न केल्याने आंदोलनाचा निर्णय घेतल्याचे खासदार लंके यांनी पत्रात नमूद केले आहे. ३१ ऑगस्टपर्यंत ठोस निर्णय व लेखी कृती आराखडा न मिळाल्यास १ सप्टेंबरपासून जिल्हा परिषद आवारात उपोषण करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.

प्रत्येक विद्यार्थ्याला आवश्यक शिक्षक मिळाला पाहिजे, प्रत्येक शिक्षकाला अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळाला पाहिजे आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस जबाबदार असलेल्या प्रशासनाची उत्तरदायित्व निश्चित झाले पाहिजे, अशी भूमिका खासदार लंके यांनी मांडली आहे.

# मराठी शाळांच्या सुधारणेसाठी धाडसी पावले उचलण्याची गरज : विश्वास पाटील!

लोणी (समर्थ गांवकरी)

मराठी शाळांची स्थिती सुधारण्यासाठी आता ठोस आणि धाडसी पावले उचलण्याची गरज आहे. मराठी शाळा आणि पुस्तके उपलब्ध करून देणारी ग्रंथालये ही मायमराठीची खरी वस्त्रे आहेत. मराठी भाषेचे जतन व संवर्धन करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी केले.

सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या १२६व्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय साहित्य, कलागौरव आणि समाजप्रबोधन पुरस्कारांचे वितरण उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वास पाटील होते. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. यंदाचा 'पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील साहित्य जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांना प्रदान करण्यात आला. तसेच संहिता राजन, सुरेंद्र दरेकर, मालती इनामदार, सचिन शिंदे, मराठी अभ्यास परिषद, निवृत्ती जोरी आणि संजय गोर्डे यांचाही विविध पुरस्कारांनी गौरव करण्यात आला. विश्वास पाटील यांनी मराठी शाळांचे महत्त्व अधोरेखित करत जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये



मोठी क्षमता असून, त्यांना आवश्यक पाठबळ दिल्यास त्या उंच भरारी घेऊ शकतात, असे सांगितले. महाराष्ट्राला समृद्ध करायचे असेल तर मायमराठीकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे लागेल. तुमच्या खांद्यावर झेंडा कोणताही असू द्या, दांडा मात्र मराठीचाच ठेवा, असे आवाहन त्यांनी केले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी साहित्यिक आणि कलाकारांचा सन्मान ही प्रेरणादायी परंपरा असल्याचे सांगितले. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी प्रवरा परिवाराच्या ३६ वर्षांच्या साहित्य पुरस्कारांच्या वाटचालीचा आढावा घेत मराठी साहित्य, कला आणि संस्कृतीची अभिरुची जपण्याचा हा प्रयत्न असल्याचे नमूद केले.

# महाराष्ट्र बालक मंदिरचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश; गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचा सन्मान

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद पुणे आयोजित इयत्ता ४ थी शिष्यवृत्ती परीक्षेत लालटाकी रोडवरील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेने उल्लेखनीय यश संपादन केले. या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सहसचिव मुकेश मुळे व कार्यकारिणी सदस्य अर्जुनराव पोकळे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी माजी मुख्याध्यापक सुरेश शेवाळे, माजी मुख्याध्यापिका सौ. अर्चना गिरी, मुख्याध्यापिका सौ. सुनिता शेवाळे, श्रीमती भारती तांबे, सौ. आशा कराळे, सौ. वैशाली मंगलारम आदी उपस्थित होते.

मुकेश मुळे म्हणाले, संस्थेचे नाव मोठे व उज्ज्वल करण्याचे काम विद्यार्थी आणि शिक्षक करत आहेत. सातत्याने उत्कृष्ट निकालाची परंपरा महाराष्ट्र बालक मंदिर शाळेने यंदाही कायम राखली, ही कौतुकास्पद बाब आहे.

संस्था सातत्याने विद्यार्थ्यांना विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देत आहे. शिष्यवृत्ती परीक्षेतील यशामध्ये विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षक व पालकांचा सिंहाचा वाटा आहे. शिक्षक ज्ञानदानाचे कार्य करीत असून, ही एक प्रकारची ईश्वरसेवाच आहे.

अर्जुनराव पोकळे म्हणाले, प्राथमिक शिक्षण हे आयुष्यात अत्यंत महत्त्वाचे असून ते भावी कारकिर्दीचा पाया आहे. शिक्षण कसे घेतले जाते, याला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

प्राथमिक शिक्षणाचा पाया भक्कम होणे गरजेचे असून, हे काम शिक्षक करत आहेत, ही संस्थेच्या दृष्टीने अत्यंत भूषणावह बाब आहे.

मुख्याध्यापिका सौ. सुनिता शेवाळे यांनी प्रास्ताविकात सांगितले की, शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी नियमित मार्गदर्शन, सराव चाचण्या आणि आवश्यक शैक्षणिक सहकार्य देण्यात आले.

विद्यार्थ्यांनीही शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा योग्य उपयोग करून मेहनत घेतली. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत यांचा महत्त्वाचा वाटा आहे.



शाळेची शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा पुढे नेण्यासाठी यापुढेही प्रयत्न सुरू राहतील, असे त्यांनी नमूद केले.

जिल्हा गुणवत्ता धारक विद्यार्थी शौर्य टकले (२४६), स्वरांजली उगले (२४०), कानिफ घोडके (२३२), स्वानंद दहिफळे (२३०), युवराज ढुबे (२२८), रुद्र ढवळे (२२८), श्लोक कोतकर (२२४), अनन्या कुटे (२२४), सोहम सिनारे (२२२) आणि विराज कोळपे (२२२) या विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविले.या विद्यार्थ्यांना श्रीमती भारती तांबे, सौ. आशा कराळे व सौ. वैशाली मंगलारम यांनी मार्गदर्शन केले.

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**कार्यकारी अभियंता तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचे कार्यालय, अहिल्यानगर**
**पत्ता -सिंचन भवन .अ.नगर छ. संभाजीनगर रोड,अहिल्यानगर**
**ईमेल पत्ता-** minor.irrigation@gmail.com, **दूरध्वनी क्रमांक ०२४१-२३२३९१७**

**ई-निविदा सूचना क्र. ०२ सन २०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अहिल्यानगर हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचकडून अहिल्यानगर जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समिती योजनेअंतर्गत खालील कामांकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेत स्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदे बाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.
निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग,अहिल्यानगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनामध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.
**कामाचे नाव : को.प.बंधारा दुरुस्ती परीटवाडी (काराळीचा डोह)** तालुका - कर्जत , जिल्हा - अहिल्यानगर
निविदांची अंदाजित किंमत रु. ४९.५० लक्ष
ई निविदा उपलब्ध कालावधी - दि. २८/०८/२०२६ ते दि. ०४/०९/२०२६.
ई - निविदा उघडण्याचा दि. ०७/०९/२०२६ (शक्य झाल्यास)
जा.क्र. लेशा-२/२४०३/सन २०२६
जिल्हा जलसंधारण अधिकारी
मृद व जलसंधारण विभाग, अहिल्यानगर
२१/०८/२०२६. **जिमाका/नगर/जाहि/१०१/२०२६**

**कार्यकारी अभियंता**
मृद व जलसंधारण विभाग अहिल्यानगर

# पावसाच्या खंडाच्या कालवधीत पिकाची घ्यावयाची काळजी

पावसाच्या दीर्घ खंडामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. अशा कोरड्या आणि उष्ण हवामानात पिकाची वाढ खुंटते, पाने सुकतात,तेसेच पिकांवर वेगवेगळ्या किडी आणि रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. हुमणी सारख्या घातक किडींचा प्रादुर्भाव वाढतो.ऊस पिकावर पांढरी माशी ,पायरीला यासारख्या किडींचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे आढळून येत आहे. या गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांनी खचून न जाता ऊस, सोयाबीन, तूर, कापूस आणि डाळिंब या प्रमुख पिकांचे पाण्याचे , खतांचे नियोजन आणि कीड नियंत्रण कसे करावे, याविषयी कृषी तज्ज्ञांनी खालीलप्रमाणे महत्त्वपूर्ण सल्ला दिला आहे.

ऊस: पाण्याचे नियोजन काटेकोर करावे त्यासाठी ओलावा मोजणी यंत्राचा वापर करावा.

पाचट जागेवरच कुजवा: उसाच्या खालची वाळलेली पाने (पाचट) न जाळता ती दोन ओळींमधील सरीमध्ये व्यवस्थित पसरावीत. पाचट आच्छादनामुळे (Mulching) जमिनीतील पाण्याचे बाष्पीभवन रोखले जाते आणि ओलावा दीर्घकाळ टिकून राहतो.

मल्चिंग (आच्छादन) करणे: शेतातील काढलेले तण किंवा पिकांचे अवशेष ओळींच्या मध्ये पसरावेत (मल्चिंग करावे). यामुळे जमिनीतील ओलावा जास्त काळ टिकून राहतो.

एक आड एक सरीने पाणी देणे: पाण्याची टंचाई असल्यास, उपलब्ध पाण्यातून सर्व शेत भिजवण्यासाठी एका आड एक सरी पद्धतीने (lternate Furrow Irrigation) पाणी द्यावे. यामुळे पाण्याची ५०% बचत होते.

पिकास पाण्याचा ताण पडत असल्यास म्युरेट ऑफ पोटॅश २% + युरिया २% यांच्या मिश्रणाची दर ३ आठवड्यानी फवारणी करावी.

डीएपी (DP): पिकांची अन्नद्रव्यांची कमतरता भरून काढण्यासाठी २% डीएपी (२०० ग्रॅम प्रति १० लीटर पाणी) ची फवारणी करावी

कोरड्या हवामानात उसावर प्रामुख्याने हुमणी, पांढरी माशी आणि पायरीला या सारख्या किडींचा प्रादुर्भाव वाढतो.

हुमणी अळी (White Grub): पाऊस नसल्यामुळे हुमणी अळी जमिनीच्या वरच्या थरात येऊन उसाची मुळे कुरतडते. यामुळे ऊस वाळू लागतो. जैविक नियंत्रणासाठी 'मेटारायझियम ॲनिपिली + बिव्हेरिया बॅसियाना' ही बुरशी प्रति एकरी २ ते ३ किलो शेणखतात मिसळून उसाच्या मुळापाशी द्यावी किंवा ड्रेंचिंग (आळवणी) करावी. किवा इपिएन ५ किलो प्रती एकर प्रमाणे२०० लिटर पाण्यातून ठिबक सिंचन, पाठ पाण्याद्वारे किवा शेणखतात मिसळून द्यावे किवा फिप्रोनील ४०% + इमिडाक्लोप्रीड ४०% ५०० ग्रॅम १२५० लिटर पाण्यातून प्रती हेक्टरी सोडावे.

खोड किडा (Early Shoot Borer): कडक उन्हामुळे खोड किड्याचा प्रादुर्भाव वाढतो आणि उसाचे पोंगे वाळतात. शेतात हेक्टरी २५ कामगंध सापळे (Pheromone Traps) लावावेत. प्रादुर्भाव जास्त असल्यास 'क्लोअँट्रानिलीप्रोल' (कोराजन) ४ मिली प्रती १० लिटर पाणी फवारणी करावी. उसावरील पांढरी माशी आणि पायरीला चा बंदोबस्त करावा त्यासाठी क्विनॉलफॉस २५% एक १२०० मिली प्रती हेक्टर प्रमाणे फवारणी करावी किवा थायोमीथॉक्झाम२५ डब्ल्यूजी १२५ ग्रॅम ७५० लिटर पाण्यातून फवारणी करावी. कापूस हलकी कोळपणी करणे: जमिनीला भेगा पडू नयेत आणि जमिनीतील ओलावा उडून जाऊ नये म्हणून वरचेवर हलकी कोळपणी (डवरणी) करावी. यामुळे जमिनीच्या भेगा बुजतात व बाष्पीभवन थांबते.

नत्रयुक्त खतांचा वापर टाळणे: पाऊस नसताना जमिनीमध्ये रासायनिक नत्रयुक्त खते (उदा. युरिया) देणे टाळावे, कारण यामुळे पिके सुकू शकतात. संरक्षित सिंचन: ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याची सोय उपलब्ध आहे, त्यांनी ठिबक किंवा तुषार (स्प्रिंकलर) सिंचनाचा वापर करून पिकांना हलके पाणी द्यावे. शक्यतो सकाळी किंवा संध्याकाळी पाणी द्यावे पिकाला ताण सहन करण्याची शक्ती मिळण्यासाठी १% पोटॅशियम नायट्रेट (१३:००:४५) ची फवारणी करावी. पाती व बोंड गळ थांबवणे: पाण्याच्या ताणामुळे होणारी पाती आणि बोंड गळ रोखण्यासाठी 'नॅप्थील सेटिक सिड' (NAA - प्लॅनोफिक्स) ४ मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मॅग्नेशियम आणि बोरॉन: कपाशी लाल पडू नये म्हणून १% मॅग्नेशियम सल्फेट आणि ०.२% बोरॉनची फवारणी फायदेशीर ठरते.

मर रोग (Wilt):नुकसान: रोगट झाडे मुळासकट उपटून शेताबाहेर नेऊन जाळून टाकावीत. झाडाच्या मुळाशी ट्रायकोडर्मा व्हिरीडी (बुरशीनाशक) ५० ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यात मिसळून आळवणी (Drenching) करावी.

पाण्याचा ताण सहन करण्यासाठी: १% पोटॅशियम नायट्रेट (१३:००:४५) (१०० ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यात) किंवा १९:१९:१९ या विद्राव्य खताची फवारणी करावी.

शेंगा भरण्यासाठी: शेंगा भरण्याच्या अवस्थेत ००:५२:३४ (१०० ग्रॅम) सोबत बोरॉन (२० ग्रॅम) प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी केल्यास दाण्यांचा आकार आणि वजन वाढते.

पाने खाणारी अळी (लष्करी अळी / तंबाखूवरील अळी): सुरुवातीला ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी. प्रादुर्भाव जास्त असल्यास इमामेक्टिन बेंझोएट (५ SG) ४ ते ५ ग्रॅम किंवा क्लोएन्ट्रानिलीप्रोल (कोराजन) ३ मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था**
**कृषि विज्ञान केंद्र दहीगाव ने**
**डॉ. कौशिक एस.एस., वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख**
**श्री लाखे माणिक, विषय विशेषज्ञ (पिक संरक्षण)**

**रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल, चांदगाव, ता. श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर.**

**टेंडर नोटीस**

**लेबर कॉन्ट्रॅक्टर व मटेरियल सप्लायर नेमणेबाबत.**

आमच्या विद्यालयाच्या ए.आय लॅबसाठी फर्निचर तयार करणे. या करिता अनुभवी लेबर कॉन्ट्रॅक्टर कडून रेट बंद लिफाफ्यामध्ये न्यू इंग्लिश स्कूल, चांदगाव, ता. श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर येथे देण्यात यावेत. सदर कामाचे कोरे टेंडर फॉर्म विद्यालयाच्या कार्यालयात किंवा ओम साई कन्सल्टंटस् आर्किटेक्टस् इंजिनिअर्स, १/२, गोवर्धन अपार्टमेंट आंबेडकर रोड अहिल्यानगर यांचे कार्यालयात दि. २८/०५/२०२६ ते ०४/०६/२०२६ पर्यंत रु. ५००/- भरून मिळतील व भरलेले टेंडर फॉर्म दि. ०७/०६/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत न्यू इंग्लिश स्कूल, चांदगाव, ता. श्रीगोंदा, जिल्हा-अहिल्यानगर. यांच्या ऑफिसमध्ये स्वीकारण्यात येतील. टेंडर जमा करताना त्यासोबत रु. ३०००/- बयाना रक्कम भरावी लागेल वरील काम पूर्ण करण्याचा कालावधी ३ महिने राहील.
१) फर्निचर कामासाठी लागणारे मटिरीयल उदा. प्लायवूड, फोरमायका, फेव्हीकॉल, बिजगऱ्या, लाकूड, खिळे इत्यादी विद्यालय पुरविणार आहेत.
२) फर्निचर कामासाठी लागणारे मटिरीयल :- उदा. प्लायवूड, फोरमायका, फेव्हीकॉल, बिजगऱ्या, लाकूड, खिळे इत्यादी इत्यादीचे रेट बंद पाकीटामध्ये द्यावेत.
३) कोणतेही टेंडर मंजूर करणे अथवा कारण न देता सर्व टेंडर नाकारणे याबाबत सर्व अधिकार न्यू इंग्लिश स्कूल, चांदगाव, ता. श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर यांनी राखून ठेवले आहेत.

**मुख्याध्यापक**
**न्यू इंग्लिश स्कूल, चांदगाव, ता. श्रीगोंदा, जिल्हा-अहिल्यानगर**
**मोबाईल नंबर - ७५८८०२९५००**

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### पोलीस स्टेशन आवारातील स्टॅम्प व्हेंडर आता सब रजिस्टर कार्यालयात

**नागरिकांची गैरसोय दूर होणार**

**नेवासा (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा पोलीस स्टेशनच्या आवारात अनेक वर्षांपासून कार्यरत असलेले मुद्रांक विक्रेते (स्टॅम्प व्हेंडर) आता दुय्यम निबंधक (सब रजिस्टर) कार्यालयाच्या परिसरात स्थलांतरित करण्यात आले आहेत. दस्त नोंदणीसाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय टाळणे आणि संपूर्ण प्रक्रिया अधिक जलद व सुलभ करणे, या उद्देशाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

याबाबत तहसीलदार सचिन डोंगरे, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे आणि दुय्यम निबंधक गोरख तारगे यांनी चर्चा करून स्थलांतराचा निर्णय अमलात आणला. तहसीलदारांच्या पुढाकारातून ही नवीन व्यवस्था २७ ऑगस्ट २०२६ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे.

यापुढे दस्त नोंदणीसाठी येणाऱ्या नागरिकांना आवश्यक असलेले स्टॅम्प पेपर त्याच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याने वेळ आणि श्रमाची बचत होणार आहे. त्यामुळे नागरिकांसह वकील मंडळींनाही मोठा दिलासा मिळणार आहे.

पोलीस स्टेशनतर्फे निरोप समारंभ

श्रीगोंदा पोलीस स्टेशनच्या आवारात अनेक वर्षे सेवा देणारे मुद्रांक विक्रेते मिलिंद कुलकर्णी, अर्जुन मडके आणि भारत सूर्यवंशी यांचा पोलीस स्टेशनच्या वतीने सन्मान करून भावपूर्ण निरोप देण्यात आला.

### ऊस पिकावरील पायरीला रोगाच्या प्रादुर्भावाची पाहणी

**शेतकऱ्यांना कृषी विभागाचे मार्गदर्शन**



**नेवासा (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यात ऊस पिकावर पायरीला किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्याच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रगतशील शेतकरी वैभव विवेकानंद फडणीस यांच्या शेतातील ऊस पिकाची पाहणी करून शेतकऱ्यांना आवश्यक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी तालुका कृषी अधिकारी श्रीमती क्रांती चौधरी, मंडळ कृषी अधिकारी श्रीमती शीतल आरू, उपकृषी अधिकारी श्री. उगले, सहाय्यक कृषी अधिकारी श्री. किरण घोडके तसेच सहकार महर्षी काष्टी सोसायटीचे मार्गदर्शक मा. कैलास (तात्या) पाचपुते उपस्थित होते.

पाहणीदरम्यान अधिकाऱ्यांनी ऊस पिकावरील पायरीला किडीचा प्रादुर्भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी रोगप्रतिबंधक फवारणी, शिफारस केलेल्या औषधांचा योग्य वापर, शेतातील नियमित निरीक्षण आणि एकात्मिक किड व्यवस्थापनाच्या उपाययोजनांची माहिती दिली. प्रादुर्भाव वाढू नये यासाठी वेळेत उपाययोजना करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी शेतकऱ्यांना सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपकृषी अधिकारी श्री. उगले यांनी प्रास्ताविक केले. सहाय्यक कृषी अधिकारी श्री. किरण घोडके यांनी सूत्रसंचालन करत उपस्थितांचे आभार मानले.

### आधुनिक क्रीडा परिसंस्था उभारण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध; पंतप्रधान नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, २१ व्या शतकासाठी आधुनिक क्रीडा परिसंस्था उभारण्यास केंद्र सरकार पूर्णपणे कटिबद्ध आहे. देशात क्रीडा विद्यापीठांपासून ते आधुनिक प्रशिक्षण केंद्रांपर्यंत एक प्रणाली विकसित केली जात आहे. ही प्रणाली प्रतिभा ओळखण्यापासून ते जागतिक स्तरावर संधी उपलब्ध करून देण्यापर्यंत प्रत्येक स्तरावर साहाय्य करेल. ते म्हणाले की, क्रीडा विज्ञान, सराव, प्रशिक्षण आणि अनुभव यांची देवाणघेवाण करण्यासाठी सरकार इतर देशांसोबत सहकार्य वाढवत आहे. 'खेलो इंडिया संवाद' हे या कामाला किती गांभीर्याने घेतले जात आहे याचे एक उदाहरण आहे. पंतप्रधानांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे 'खेलो इंडिया संवादा'ला संबोधित केले. या कार्यक्रमाचा उद्देश तरुणांना भारताच्या क्रीडा प्रवासाशी जोडणे, त्यांच्या आकांक्षा जाणून घेणे आणि युवा-नेतृत्वाखालील विकसित भारताच्या उभारणीसाठी त्यांच्या कल्पनांचे योगदान मिळवणे हा आहे. आपल्या संबोधनात पंतप्रधानांनी यावर जोर दिला की, 'खेलो इंडिया संवाद' हा केवळ खेळांवर चर्चा करण्याचा कार्यक्रम नाही. खेळाडूंच्या कल्पना आणि आकांक्षांना देशाच्या स्वप्नांशी जोडण्याचे हे एक उत्तम माध्यम आहे. ते म्हणाले, आपण अनेकदा ऐकतो की निरोगी समाजासाठी क्रीडावृत्ती आवश्यक आहे. पण मैदानावर सहभागी झाल्याशिवाय ती विकसित करणे खूप कठीण आहे. खेळ आपल्याला केवळ चॅम्पियनच नाही, तर उत्तम स्पर्धक बनण्यासही शिकवतात. नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले की, लाल किल्ल्यावरून त्यांनी ५ ते १५ वयोगटातील मुलांमधील प्रतिभा ओळखण्यासाठी एका व्यापक प्रतिभा शोध मोहिमेची घोषणा केली होती.

# लाडक्या बहिणींच्या प्रश्नांसाठी शहापुरात हजारो महिलांचा मोर्चा

## बंद श–घधउ सुरू करून प्रलंबित सन्मान निधी तात्काळ देण्याची श्रमजीवी संघटनेची मागणी

**शहापूर (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र आदिवासी, कातकरी व गरीब महिलांचे बंद व प्रलंबित श–घधउ तात्काळ सुरू करून प्रलंबित सन्मान निधी मिळावा, या प्रमुख मागणीसाठी श्रमजीवी संघटनेच्या वतीने आज शहापूर येथे लाडक्या बहिणींचा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाला शहापूर तालुक्यातील हजारो लाडक्या बहिणींची उपस्थिती लाभली.

मोर्चाच्या माध्यमातून शहापूर तालुक्यातील पात्र महिलांच्या विविध समस्या प्रशासनासमोर मांडण्यात आल्या. श–घधउ, आधार–बँक लिंक, बँक खाते, मोबाईल क्रमांक तसेच इतर तांत्रिक अडचणींमुळे अनेक पात्र महिलांना योजनेचा लाभ मिळत नसल्याचा मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला.

शहापूर तालुका हा अनुसूचित क्षेत्र असून तालुक्यातील अनेक आदिवासी व कातकरी महिला दुर्गम वाड्या–वस्त्यांमध्ये राहतात. इंटरनेट, मोबाईल नेटवर्क, डिजिटल सेवा व बँकिंग सुविधांचा अभाव असल्यामुळे श–घधउ प्रक्रिया पूर्ण करताना महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे पात्र असूनही अनेक महिलांचा सन्मान निधी प्रलंबित असल्याचे श्रमजीवी संघटनेने सांगितले.

या पार्श्वभूमीवर शहापूर तालुक्यातील सर्व पात्र महिलांचे बंद व प्रलंबित श–घधउ तात्काळ सुरू करावे, प्रलंबित सन्मान निधी तातडीने वितरित करावा, तसेच दुर्गम वाड्या–वस्त्यांमध्ये विशेष श–घधउ व बँक समस्या निवारण शिबिरे आयोजित करावीत, अशी मागणी करण्यात आली.

तसेच लाडकी बहीण योजनेतील प्रलंबित प्रकरणांसाठी विशेष कालबद्ध मोहीम राबवून प्रत्येक पात्र महिलेला लाभ मिळेपर्यंत प्रशासनाने पाठपुरावा करावा, अशी मागणीही करण्यात आली.

मोर्चाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. मुख्यमंत्री महोदय तसेच महिला व बाल विकास मंत्री मा. ना. सौ. आदिती तटकरे मॅडम यांच्या नावे निवेदन देण्यात आले. सदर निवेदन एकात्मिक महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी तसेच गटविकास अधिकारी, शहापूर यांच्या मार्फत शासनाकडे सादर करण्यात आले. श्रमजीवी संघटनेने स्पष्ट केले की, या मोर्चाचा उद्देश शासनाच्या योजनेला विरोध करणे नसून शासनाने सुरू केलेल्या महत्त्वपूर्ण योजनेचा लाभ प्रत्येक पात्र महिलेला मिळवून देणे, श–घधउ प्रक्रिया सुलभ करणे आणि प्रलंबित सन्मान निधी तातडीने मिळवून देणे हा आहे.

पात्र असूनही केवळ तांत्रिक अडचणींमुळे कोणतीही महिला शासनाच्या



लाभापासून वंचित राहू नये. प्रशासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन शहापूर तालुक्यातील सर्व पात्र महिलांना न्याय द्यावा, अशी मागणी श्रमजीवी संघटनेच्या वतीने करण्यात आली.

मोर्चाला प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती : या मोर्चाला ठाणे जिल्हा सरचिटणीस दशरथ भालके, ठाणे जिल्हा महिला अध्यक्ष जया पारधी, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण चौधरी, ईश्वर बनसोडे, राजेंद्र म्हसकर, तालुका अध्यक्ष मालू हुमणे, तालुका सचिव प्रकाश खोडका, तालुका महिला अध्यक्ष लक्ष्मी वाघ, तालुका उपाध्यक्ष विशाल मुकणे, रुपेश आहिरे, कैलास घाटाल आणि पप्पू वाघ यांच्यासह श्रमजीवी संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व हजारो महिला उपस्थित होत्या.

## स्काऊट सेवा प्रकल्प व डोंगर ट्रेकिंग उपक्रम उत्साहात



**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, श्रीगोंदा येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्काऊट पथकाच्या वतीने सेवा, साहस आणि निसर्गसंवर्धनाचा संदेश देणारा स्काऊट सेवा प्रकल्प व डोंगर ट्रेकिंग उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात २० स्काऊट विद्यार्थी आणि तीन स्काऊट मास्टर यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. उपक्रमाची सुरुवात ढोरजा येथील श्री काशी विश्वेश्वर मंदिर परिसरातून झाली. येथे स्काऊट ध्वजारोहण व तंबू उभारणीनंतर विद्यार्थ्यांनी मंदिर परिसर आणि मंदिराकडे जाणाऱ्या घाटाची स्वच्छता करून श्रमदानातून स्वच्छता सेवा प्रकल्प राबविला. परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश देत विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. यानंतर विद्यार्थ्यांनी डोंगर ट्रेकिंगला प्रारंभ केला. ट्रेकदरम्यान परिसरातील विविध वनस्पती, प्राणी आणि जैवविविधतेची माहिती घेत त्यांनी निसर्गाचा जवळून अनुभव घेतला. गुरुकुल प्रमुख बापू जाधव यांनी डोंगरातील खडकांची रचना आणि त्यामागील भौगोलिक वैशिष्ट्यांची सविस्तर माहिती दिली. डोंगरमाथ्यावर पोहोचल्यानंतर विद्यार्थ्यांनी थंडगार वाऱ्याचा आणि निसर्गरम्य वातावरणाचा मनमुराद आनंद लुटला. यावेळी विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजक व गमतीदार खेळांचेही आयोजन करण्यात आले.

## सौंदाळा येथील रस्त्यात अडथळा ठरलेला टॉवर त्वरित हटवा, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण, भारतीय लहुजी सेनेचा ईशारा

**नेवासा (समर्थ गांवकरी)**

नेवासा तालुक्यातील सौंदाळा येथील शेतकरी शिवाजी रामभाऊ आरगडे यांच्या शेतीमध्ये गट नं. १२०/१ मध्ये जाण्यायेण्याच्या रस्त्यामध्ये असलेल्या पारेशन विद्युत कंपनीचा टॉवर हटवून रस्ता तात्काळ खुला करण्यात यावा अन्यथा दि.१ सप्टेंबर पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असा ईशारा भारतीय लहुजी सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुरेश आढागळे यांनी जिल्हाधिकारी व नेवासा तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे

जिल्हाधिकारी व तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात शेतीमधील रस्त्यावर येणारा टॉवर हटवण्याचा आदेश व्हावा,सदर पारेशान कंपनी विरुद्ध तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी,शेतकऱ्यांना अडचण निर्माण केल्याने व शेतक–यांना त्रास दिल्याने कायदेशीर

गुन्हा दाखल करून सदरचा रस्ता खुला करून देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे

सौंदाळा ता. नेवासा येथील शेतकरी शिवाजी रामभाऊ आरगडे गट नं. १२०/१ मध्ये जाण्यायेण्याच्या रस्त्यात पारेशन विद्युत कंपनीने उभारलेला टॉवर हटवण्यासाठी अनेक वेळ तोंडी व लेखी अर्ज देउन देखील त्या संबधीत आधीकारी व पारेशन कंपनीने कोणतीही दखल घेतली नसल्याने आम्ही भारतीय लहुजी सेना या सामाजिक संघटनेच्या वतीने शेतकरी शिवाजी रामभाऊ आरगडे यांच्या वतीने आमरण उपोषणासाठी बसत असल्याचे निवेदनात स्पष्ट केले आहे

निवेदनाचा सहानुभूती पुर्वक विचार करुन शेतकरी शिवाजी आरगडे यांना



योग्य तो न्याय मिळावा अशी विनंती भारतीय लहुजी सेना या सामाजीक संघटनेच्या वतीने करण्यात आली असून याबाबत कार्यवाही न झाल्यास दिनांक १ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा ईशारा निवेदनात देण्यात आला आहे.

## म्हाळसा खंडोबा बाणाई देवस्थानच्या वतीने पुणतांबा येथील खडगधारी खंडोबा तलवार देवतेचे पूजन

**नेवासा (समर्थ गांवकरी)**

नेवासा बुद्रुक येथील खंडोबा बाणाई देवस्थानच्या वतीने पुणतांबा येथील खडगधारी खंडोबा तलवार देवतेचे पिवळे वस्त्र अर्पण करून येळकोट येळकोट जय मल्हारचा जयघोष करत पूजन करण्यात आले.येथील मंदिरात असलेल्या खंडोबादेवाच्या तलवारीचे महात्म्य पुजारी प्रभाकरबाबा शेंडगे यांनी सांगितले.

यावेळी साडे पाच फूट असलेल्या खंडोबादेवाच्या तलवारीचे पूजन नेवासा बुद्रुक येथील पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई देवस्थान जीर्णोद्धार समितीचे अध्यक्ष

संभाजीराव ठाणगे,राजेंद्र काशीद,प्रसिद्धी प्रमुख पत्रकार सुधीर चव्हाण, सदस्य बालू फसले यांच्या हस्ते करण्यात येऊन खंडोबा देवतेला त्यांच्या सासुरवाडी नेवासा बुद्रुक येथून आणलेले पिवळे वस्त्र अर्पण करण्यात आले.

यावेळी खडगधारी खंडोबा तलवार देवता मंदिराचे पुजारी प्रभाकरबाबा शेंडगे यांच्या हस्ते म्हाळसानगरीतून आलेल्या सर्व सेवेकऱ्यांचा सन्मान करण्यात आला.



खंडोबा देवांनी जेजुरीहुन चंदनापुरीला जातांना ही तलवार पुणतांबा येथे गोदावरीत असलेल्या भिरकुंडामध्ये फेकली ही तलवार शेंडगे घराण्यातील व्यक्तीला सापडली तेव्हा पिढ्यानपिढ्या या तलवार देवतेचे पूजन व जपवणूक शेंडगे घराण्यामार्फत केली जात असल्याचे सांगून या स्थानाची महती सांगितली.यासाठी पुणतांबा येथे खडगधारी खंडोबा तलवार देवतेचे मंदिर ही बांधण्यात आले आहे.

## आरोग्य सेवक महिला पदावरून आरोग्य सहाय्यक महिला पदावर ३० कर्मचाऱ्यांना पदोन्नती

### मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते समुपदेशन व पदोन्नती आदेशांचे वितरण

ठाणे, दि प्रतिनिधी : जिल्हा परिषद, ठाणेच्या आरोग्य विभागातील आरोग्य सेवक महिला पदावर कार्यरत असलेल्या ३० कर्मचाऱ्यांना आरोग्य सहाय्यक महिला या पदावर पदोन्नती देण्यात आली. यानिमित्ताने आज, दि. २७ ऑगस्ट, २०२६ रोजी जिल्हा परिषद, ठाणेच्या सभागृहात



आयोजित कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते पदोन्नती आदेश वितरित करण्यात आले. यावेळी पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांचे समुपदेशन करून त्यांच्या नव्या जबाबदाऱ्या व काम काजाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

आरोग्य विभागामार्फत ग्रामीण भागातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य सेवा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यात आरोग्य सेवक महिला व आरोग्य सहाय्यक महिला यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आरोग्यविषयक विविध योजना, माता व बाल आरोग्य सेवा, लसीकरण, कुटुंब कल्याण, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांबाबत जनजागृती तसेच प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांच्या प्रभावी अंमलबजावणीत या कर्मचाऱ्यांचा थेट सहभाग असतो.

पदोन्नतीसोबत जबाबदारीही वाढते. आरोग्य विभागातील क्षेत्रीय कर्मचारी हे ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहेत.

# नान्नज येथे ग्रामसभा संपन्न; चर्चेनंतर काही महत्त्वाच्या विषयांवर ठराव मंजूर

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

नान्नज येथे ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित ग्रामसभा किरकोळ तक्रारी वगळता संपन्न झाली. ग्रामपंचायत अधिकारी गोरख पवार, प्रशासक श्रीमती प्रभावती मोहोळकर व ग्रामसभेचे अध्यक्ष अतुल मोहोळकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या ग्रामसभेत गावातील विविध विकासकामे, शासकीय योजना, पाणीप्रश्न तसेच एसटी बसस्थानकासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली.

ग्रामसभेच्या सुरुवातीला नान्नज ग्रामस्थांसाठी शासनाच्या विविध विभागांमार्फत उपलब्ध असलेल्या योजनांची माहिती देण्यात आली. तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या विविध योजनांची माहिती रोजगार सेवक हनुमंत पवार यांनी ग्रामस्थांना देण्यात आली. या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, असे ग्रामपंचायत अधिकारी गोरख पवार यांनी सांगितले.

नान्नज गावासाठी एसटी बसस्थानकाची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने जागा उपलब्ध करून देण्याचा विषय ग्रामसभेत मांडण्यात आला. यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी एकमुखी पाठिंबा देत एसटी बसस्थानकासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याचा ठराव मंजूर केला. त्यामुळे भविष्यात नान्नज गावाला स्वतंत्र एसटी बसस्थानक मिळण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

दरम्यान, नान्नज गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असल्याची बाब ग्रामस्थांनी ग्रामसभेत मांडली. गावातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा व्हावा, तसेच पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची पुनश्च सुरुवात करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. नान्नज गावाला किमान तीन ते चार दिवसांच्या अंतराने पाणी उपलब्ध करून देण्याची मागणीही यावेळी संतोष मोहळकर व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली.

गावातील अनधिकृत व अवैध धंद्यांना ग्रामपंचायतीकडून कोणत्याही प्रकारचा परवाना अथवा ठराव देण्यात येऊ नये, अशी मागणीही ग्राम सभेत करण्यात आली. गावातील कायदा व सुव्यवस्था तसेच सामाजिक वातावरण अबाधित राहण्यासाठी अशा प्रकारच्या अनधिकृत व्यवसायांना प्रोत्साहन मिळू नये, अशी भूमिका ग्रामस्थांनी मांडली.

नान्नज गावातील सर्वसामान्य नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा, यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आवश्यक ती माहिती व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येईल, असे ग्रामपंचायत अधिकारी गोरख पवार यांनी सांगितले. घरकुल योजना, गाय–गोठा योजना तसेच इतर विविध शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळवून देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर आवश्यक सहकार्य केले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

रोजगार सेवक हनुमंत पवार यांनी नवीन आलेल्या रोजगार हमी योजनेच्या नियमांचे ग्रामसभेत वाचन करून उपस्थित नागरिकांना त्याबाबत माहिती दिली. रोजगार हमी योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या कामांची व योजनांची माहिती ग्रामस्थांना देण्यात आली. यापुढे शासन स्तरावरून येणाऱ्या विविध योजनांची माहिती ग्रामस्थांना वेळोवेळी देऊन आवश्यक ते सहकार्य केले जाईल, असे हनुमंत पवार यांनी सांगितले.



ग्रामसभेत गावातील विविध विकासकामे, नागरिकांच्या अडचणी, मूलभूत सुविधा आणि शासनाच्या योजनांचा लाभ यावर चर्चा करण्यात आली. किरकोळ तक्रारी व मागण्या वगळता ग्रामसभा शांततेत आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शहाजीराजे भोसले, माजी सरपंच सुनील हजारे, सरपंच श्रीमती प्रभावती मोहोळकर, सामाजिक कार्यकर्ते संतोष मोहोळकर, माजी सरपंच संतोष पवार, माजी उपसरपंच दादाराजे भोसले, अध्यक्ष भरत मोहोळकर, नागनाथ कोळपकर, भाऊसाहेब कोळपकर, उपसरपंच संजय साठे, सतीश साळवे, दिलीप मोहोळकर, इनूस पठाण, फकिरभाई शेख, बलभीम किंबहुने, फारुख कुरेशी, अस्लम शेख, युवा नेते अजय राजपूत, भुजंग दळवी, अमर चाऊस, किशोर साठे, महेश दळवी, विजय साठे, भिवा साठे, आप्पा दळवी यांच्यासह नान्नज येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### घोडेगावात दोन घरांमध्ये घरफोडी; ३५ हजारांची रोकड लंपास

मंचर (समर्थ गांवकरी)

घोडेगाव ता.आंबेगाव येथील यशिका कॉम्प्लेक्समधील दोन घरांचे कडी–कोयंडे व कुलपे तोडून अज्ञात चोरट्याने घरातील कपाटे उचकटून तब्बल ३५ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी यमुना विनायक पानसरे (वय ६९, रा.प्लॅट क्रमांक १०१, यशिका कॉम्प्लेक्स, घोडेगाव) यांनी घोडेगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ ऑगस्ट सकाळी दहा वाजल्यापासून २६ ऑगस्ट रोजी सकाळी सात वाजण्याच्या दरम्यान ही घरफोडी झाली. अज्ञात चोरट्याने पानसरे यांच्या प्लॅटच्या दरवाजाचा कडी–कोयंडा कशाच्या तरी सहाय्याने उचकटून घरात प्रवेश केला.त्यानंतर कपाटाचे बोलून विश्वास संपादन केल्यानंतर हातचलाखीने सैद यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र काढून घेतले.त्यानंतर दोन्ही संशयित मोटारसायकलवरून पसार झाले.चोरीस गेलेल्या मंगळसूत्राची किंमत सुमारे ८० हजार रुपये आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.पुढील तपास मंचर पोलिस करीत आहेत.

**अनोळखी व्यक्तींकडून गुप्त दान, पैशांची देवाणघेवाण किंवा सोन्याच्या दागिन्यांबाबत सांगितल्या जाणाऱ्या आमिषांना बळी पडू नये. नागरिकांनी सतर्क राहून संशयास्पद व्यक्तींची माहिती तातडीने पोलिसांना द्यावी. महादेव वाघमोडे,पोलीस निरीक्षक मंचर पोलीस ठाणे.**

### सूर्यभान तुकाराम गोसावी यांना ‘समाज भूषण’ पुरस्काराने सन्मानित



अकोले (समर्थ गांवकरी)

दशोनाम गोसावी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उन्नतीसाठी दीर्घकाळ उल्लेखनीय कार्य करणारे परखतपूर ता अकोले येथील रहिवाशी श्री. सूर्यभान तुकाराम गोसावी यांना ‘दशोनाम गोसावी समाज भूषण पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आले. दशोनाम गोसावी समाज परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या महाअधिवेशनात हा सन्मान प्रदान करण्यात आला.

गोसावी समाजाच्या उन्नतीसाठी एकता, शिक्षण, संस्कृती, समाजजागृती तसेच समाजाच्या हक्कांसाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला.

श्री. गोसावी यांनी समाजातील युवकांना शिक्षण, रोजगार व व्यवसायासाठी मार्गदर्शन करण्याबरोबरच गरजू व ज्येष्ठ नागरिकांना मदत, शैक्षणिक व वैद्यकीय सहकार्य, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन तसेच समाजातील एकता व बंधुभाव वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

समाजाच्या प्रगतीसाठी आपले आयुष्य समर्पित करून कार्य करणाऱ्या सूर्यभान तुकाराम गोसावी यांच्या या सन्मानाबद्दल विजय गोसावी,बाबासाहेब गोसावी, विशाल गोसावी, दत्तात्रय गिरी, माजी सरपंच राजेंद्र वाकचौरे, अविनाश देशमुख आदींनी अभिनंदन केले आहे.

### पंढरपूरचा विकास आराखडा सर्वांना विश्वासात घेऊनच अंतिम करणार

मुंबई (समर्थ गांवकरी)

पंढरपूरचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा वारकरी, भाविक, स्थानिक नागरिक, व्यापारी, मठाधिपती आणि लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच अंतिम केला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. पुढील ५० वर्षांचा विचार करून भाविकांच्या सुविधा, गर्दीचे नियोजन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या उद्देशाने हा आराखडा तयार केला जात असल्याचे त्यांनी सांगितले.



सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीसांनी हे नमूद केलं. वाढती भाविकसंख्या लक्षात घेता गर्दी व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि डिजिटल साधनांचा वापर केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. भाविकांना सुरक्षित आणि सुरळीत दर्शन व प्रवासाची सुविधा देण्यासाठी एकात्मिक नियोजनावर भर दिला जाणार आहे.

पंढरपूरमधील जुनी मंदिरे आणि मठांचे धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन त्यांना आहे त्याच ठिकाणी ठेवून विकास केला जाईल. कोणतेही मंदिर किंवा मठ स्थलांतरित केले जाणार नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. विकास आराखड्यामुळे बाधित होणाऱ्या दुकानदार, रहिवासी आणि व्यावसायिकांच्या पुनर्वसनाला प्राधान्य दिले जाईल. बाधितांना ‘जागेस जागा’ देण्याचे धोरण असून, ५०० हून अधिक बाधित कुटुंबांसाठी योग्य पर्याय उपलब्ध करून देण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले.

# रक्षाबंधन : धागा मायेचा, नातं विश्वासाचं

## ह.भ.प. श्री. विशाल रघुनाथ गडगे, आळेफाटा

श्रावणाच्या सरींनी धरती हिरवीगार होत असताना मनाच्या अंगणातही आठवणींची पालवी फुटते. नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधनाने सजलेली श्रावण पौर्णिमा ही केवळ सणांची पर्वणी नसून निसर्ग, संस्कृती आणि नात्यांशी असलेले आपले अतूट नाते पुन्हा जागवणारी वेळ आहे. नारळी पौर्णिमा आपल्याला निसर्गाचा आदर, समुद्राबद्दल कृतज्ञता आणि परंपरांचे जतन करण्याचा संदेश देते; तर रक्षाबंधन माणसामाणसांतील प्रेम, विश्वास आणि जबाबदारीची जाणीव करून देते.

बालपणीच्या किरकोळ भांडणांपासून आयुष्याच्या कठीण प्रसंगांत एकमेकांच्या पाठीशी उभे राहण्यापर्यंतचा प्रवास म्हणजे भाऊ–बहिणीचे नाते. या नात्यात मायेची सावली असते, हक्काचा राग असतो आणि शब्दांविना व्यक्त होणारी काळजीही असते. या भावनांना एका नाजूक धाग्यात गुंफणारा दिवस म्हणजे रक्षाबंधन. राखी दिसायला साधा धागा असला, तरी त्यात बहिणीच्या ममत्वाची ऊब आणि भावाच्या जबाबदारीची जाणीव सामावलेली असते.

श्रावण पौर्णिमेला बहिण भावाच्या मनगटावर राखी बांधते, तेव्हा ती केवळ संरक्षणाची अपेक्षा व्यक्त करत नाही; तर ‘तू सुखी राहा, तुझ्या आयुष्यात आनंद नांदो,’ अशी मनापासून प्रार्थना करते. भाऊही भेटवस्तू देण्यापुरता हा सोहळा मर्यादित ठेवत नाही, तर ‘तुझ्या सुख–दुःखात मी सदैव तुझ्या सोबत आहे,’ असा भावबंध स्वीकारतो. म्हणून रक्षाबंधन हा केवळ सण नाही; तो प्रेम, विश्वास, जबाबदारी आणि माणुसकीचा संस्कार आहे.

भारतीय संस्कृतीत रक्षाबंधनाला मोठे सांस्कृतिक अधिष्ठान लाभले आहे. भगवान श्रीकृष्ण आणि द्रौपदीच्या कथेतून संकटाच्या वेळी धावून जाण्याची भावना दिसते. भाऊ–बहिणीच्या नात्याचा विचार करताना संत ज्ञानेश्वर महाराज आणि मुक्ताईचे नाते विशेषत्वाने आठवते. मुक्ताई केवळ ज्ञानदेवांची बहीण नव्हती; ती त्यांच्या जीवनातील मायेची सावली, प्रसंगी मार्गदर्शक आणि आत्मविश्वास देणारी शक्ती होती. ‘ताटी उघडा ज्ञानेश्वरा’ या प्रसंगातून तिच्या भावाच्या अंतर्मनाची जाण आणि त्याच्यावरील आत्मीयता प्रत्ययास येते. त्यामुळे रक्षाबंधनाचा अर्थ केवळ ‘बहिणीचे रक्षण’ एवढाच नसून एकमेकांच्या मनाचे रक्षण, भावनांची जपणूक आणि संकटात खंबीर साथ हा त्याचा व्यापक अर्थ आहे.

बालपणात भाऊ–बहिणीच्या नात्याची श्रीमंती वेगळीच असते. खेळण्यावरून झालेले भांडण, आईकडे केलेली चुगली आणि काही क्षणांत पुन्हा एकत्र खेळणे या छोट्या आठवणी आयुष्यभर मनात राहतात. काळ पुढे सरकतो. शिक्षण, नोकरी, विवाह आणि संसाराच्या जबाबदाऱ्यांमुळे वाटा वेगळ्या होतात. भेटी कमी होतात, अंतर वाढते; मात्र बालपणीचा जिव्हाळा मनाच्या एका कोपऱ्यात कायम जिवंत असतो. म्हणून राखीचा दिवस दूर गेलेल्या नात्यांना पुन्हा जवळ आणण्याची संधी ठरतो.

आजच्या काळात बहिणीचे रक्षण म्हणजे तिच्या स्वातंत्र्यावर पहारा देणे नव्हे, तर तिच्या स्वाभिमानाला बळ देणे होय. तिच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, करिअरच्या वाटेवर साथ देणे, तिच्या निर्णयांचा आदर करणे आणि अन्यायाविरुद्ध ती उभी राहिली तर तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हीच खरी ‘रक्षा’ आहे. त्याचप्रमाणे बहिणीनेही भावाच्या संघर्षाची जाणीव ठेवून त्याला भावनिक आधार देणे, त्याच्या यशात आनंद मानणे आणि अडचणीच्या काळात त्याचा हात धरून उभे राहणे हीच नात्याची खरी ताकद आहे.

सोशल मीडियावरील डिजिटल शुभेच्छांपेक्षा बहिणीला फोन करून ‘कशी आहेस?’ असे विचारणे, प्रत्यक्ष भेटणे, तिच्या मनातले ऐकून घेणे किंवा गरजेच्या वेळी तिच्यासाठी धावून जाणे यातच नात्याचे खरे सौंदर्य आहे. राखी मनगटावर बांधली जाते; पण तिची गाठ मनाशी बांधली गेली पाहिजे. संतपरंपरेने दिलेली ‘हे विश्वचि माझे घर’ ही व्यापक दृष्टीही प्रेम, आपुलकी आणि परस्पर सहजीवनाचीच शिकवण देते.

नारळी पौर्णिमा आपल्याला निसर्गाशी नाते जपण्याची आठवण करून देते, तर रक्षाबंधन माणसामाणसांतील नाते जपण्याची. काळ बदलला, जीवनशैली बदलली, सण साजरा करण्याच्या पद्धती बदलल्या; तरी या सणांमागची मूल्ये बदलता कामा नयेत. निसर्गाचा आदर, परंपरांचे जतन, कुटुंबातील प्रेम आणि माणुसकीची जपणूक हीच आपल्या संस्कृतीची खरी ओळख आहे.

रक्षाबंधनाचा धागा काही दिवसांनी मनगटावरून निघून जाईल; राखीचा धागाही तुटेल. पण त्या धाग्याने बांधलेले प्रेम, विश्वास आणि आपुलकी



तुटता कामा नये. म्हणून या रक्षाबंधनाला केवळ राखी बांधू नका; एखादा जुना अबोला संपवा, दूर गेलेले नाते जवळ आणा, बहिणीच्या स्वप्नांना बळ द्या आणि भावाच्या संघर्षात त्याचा हात धरा.

राखीचा धागा नाजूक असला, तरी त्यात भावनांचे बळ असते. तो मनगटाभोवती बांधला जातो; पण त्याची खरी गाठ दोन हृदयांना जोडते. नाती रक्ताने जन्माला येतात; पण प्रेम, विश्वास, त्याग आणि माणुसकीने ती आयुष्यभर जपावी लागतात. हाच रक्षाबंधनाचा खरा संदेश आहे.

## शाडू माती व गोमयापासून गणेशमूर्तींची स्थापना करा

### विश्व हिंदू परिषदेच्या वतीने पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे आवाहन

अकोले (समर्थ गांवकरी)

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणाचे संरक्षण, जलस्त्रोतांचे संवर्धन आणि धार्मिक परंपरांचे जतन करण्यासाठी नागरिकांनी शाडू माती तसेच गाईच्या शेणापासून (गोमयापासून) तयार केलेल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची स्थापना करावी, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

विश्व हिंदू परिषदेचे पश्चिम महाराष्ट्र गोरक्षण प्रमुख संतोष खामकर यांनी गणेशभक्तांना हे आवाहन केले. गणेशमूर्तींच्या विसर्जनामुळे नदी, तलाव व अन्य जलस्त्रोतांचे प्रदूषण होऊ नये, तसेच पर्यावरणाचा समतोल अबाधित राहावा, यासाठी पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा वापर वाढविणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

शाडू माती आणि गोमयापासून तयार केलेल्या गणेशमूर्ती पर्यावरणपूरक असून, पारंपरिक श्रद्धा आणि पर्यावरण संवर्धन यांचा सुंदर समन्वय साधता येतो. त्यामुळे गणेशभक्तांनी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती व पर्यावरणाला हानिकारक सजावटीचे साहित्य टाळून नैसर्गिक साहित्याचा वापर करावा, असे खामकर यांनी नमूद केले.

## भगवान श्री जिव्हेश्वर जयंतीनिमित्त चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

- चित्रकलेमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास – विक्रम पाठक
- २७५ विद्यार्थ्यांचा सहभाग

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

स्वकुळसाळी समाजाचे आराध्य दैवत भगवान श्री जिव्हेश्वर यांच्या जयंती निमित्त कल्याण रोड येथील संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेत चित्रकला स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या.या स्पर्धेत जवळजवळ २७५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.



या कार्यक्रमासाठी स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, खजिनदार गजेंद्र सोनवणे, उत्सव समिती प्रमुख निरज चांगटे,महेश कांबळे,शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना भामरे,स्पर्धा प्रमुख बबनभाई शेख,राजेंद्र गर्जे,सुशीलकुमार आंधळे,चंदा कार्ले,वैशाली केदारे,अनिता जपकर,राणी पवार आदी उपस्थित होते.

यावेळी विक्रम पाठक म्हणाले, चित्रकला स्पर्धेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. चित्र काढताना आपण बारकाईने बघायला शिकतो. रंग, आकार, निसर्ग यांचे निरीक्षण वाढते आणि मन एकाग्र होते. चित्रकला आपल्याला कल्पनाशील बनवते. एक कोरा कागद आणि रंगांच्या सहाय्याने आपण नवीन विश्व निर्माण करू शकतो. चित्रकलेमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास होतो.

## कार्यक्षेत्र हेच खरे तीर्थक्षेत्र हीच जिव्हेश्वरांची शिकवण : आ.संग्राम जगताप

**दिल्लीगेट पटांगण येथे भगवान श्री जिव्हेश्वर मंदिर येथे महाप्रसादाचे वाटप,गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव**



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

भगवान श्री जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव अहिल्यानगर शहरात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. कार्यक्षेत्र हेच खरे तीर्थक्षेत्र समजून प्रत्येकाने कार्य करावे,अशी शिकवण भगवान श्री जिव्हेश्वरांनी दिली आहे.या कार्यक्रमात समाजातील गुणवंत विद्यार्थी व विविध स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.ही कौतुकास्पद बाब आहे.

सण–उत्सवातून समाजातील लोक एकत्र येतात.भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक व समाजोपयोगी उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत.ते समाजासाठी दिशादर्शक आहेत.असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले. दिल्लीगेट पटांगण येथे भगवान श्री जिव्हेश्वर मंदिराच्या वतीने भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव निमित्त गुणवंत विद्यार्थ्यांना आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते भगवान श्री जिव्हेश्वरांची महाआरती करण्यात आली.महाआरती नंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी प्रमुख उपस्थितीत भाजप नेते भैया गंधे,माजी महापौर भगवान फुलसौंदर, नगरसेविका आशाताई डागवाले,नगरसेवक अविनाश घुले,श्री विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते,अशोक कानडे,बाबासाहेब सानप, पै.मनोज लोंढे,ज्ञानेश्वर काळे,मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संजय सागावकर, स्वकुळ हित संवर्धक मंडळाचे अध्यक्ष विक्रम पाठक,सचिव विजय मानकर,जितेंद्र लांडगे,गजेंद्र सोनवणे,उत्सव समितीचे प्रमुख निरज चांगटे,सचिन मडके,चंद्रकांत मानकर,प्रशांत मडके,योगेश भागवत,संजय दळवी,स्वकुळ साळी महिला मंचच्या अध्यक्षा छाया साळी,वनिता पाटेकर, सुरेखा शेकटकर, वनिता मानकर,शैला मानकर,शितल सागावकर, कल्याणी पावले, अनिता मानकर,लता सागावकर, अनिता सवई, पुजा सवई, विशाखा मानकर, विद्या मानकर,सुनीता मानकर, सोनाली पावले,सोनाली दळवी,माधुरी मानकर आदींसह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते. यावेळी उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले, मोठ्या उत्साहाने दरवर्षी भगवान जिव्हेश्वर मंडळाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.भगवान श्री जिव्हेश्वर हे साक्षात महादेवाचे अवतार आहेत.सनातन हिंदू धर्मामध्ये सांगितल्याप्रमाणे आपल्या जीवनात संत आणि गुरूंना अनन्यसाधारण महत्त्व आहे.भगवान श्री जिव्हेश्वरांनी निष्काम कर्मयोग सांगितलेला आहे.आजच्या नवीन पिढीमध्ये भगवान श्री जिव्हेश्वर यांचे विचार रुजविण्याची गरज आहे.

# अश्विनाथ गड हे सामाजिक एकतेचे प्रतीक : मंत्री बाळासाहेब थोरात

**लाखो भाविकांच्या उपस्थितीमध्ये अश्विनाथ गडावर यात्रा**
**हिंदू – मुस्लिम बांधव एकत्र पद्धतीने यात्रा साजरी करतात**
**मानाच्या काठीचे लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते निमोन येथे पूजन**

संगमनेर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्याच्या सरहद्दीवर असणाऱ्या पारेगाव बुद्रुक येथील अश्विनाथगडावर परिसरातील लाखो भाविकांच्या उपस्थितीमध्ये पारंपारिक पद्धतीने मोठ्या उत्साहात आणि आनंदात यात्रा संपन्न झाली असून अश्विनीनाथ गड हा सामाजिक एकतेचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा.महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

निमोण येथे अश्विनाथ गडावर जाणाऱ्या मानाच्या काठीचे पूजन मा.महसूलमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. यावेळी आर्किटेक्ट बी.आर.चकोर, सोमनाथ धोंडीबा घुगे, ज्ञानेश्वर धोंडीबा घुगे, ड.ज्ञानेश्वर सांगळे, चंद्रकांत घुगे, साहेबराव दादा मंडलिक, अनिल घुगे, गोरख घुगे, डी.एम घुगे, भानुदास कांडेकर, सुरेश सांगळे, पंढरी घुगे, शरद घुगे, बाळू घुगे, मधुकर नागरे, किसन घुगे, अण्णा कांडेकर,बाळासाहेब घुगे यांच्यासह युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ढोल ताशांच्या गजरात पारंपारिक पद्धतीने भव्य मिरवणूक संपन्न झाली.

अश्विनाथ डोंगर हा पारेगाव बुद्रुक,चिंचोली गुरव,पिंपळे,निमोण, देवकवठे,सिन्नर तालुक्यातील नि–हाळे,घोटेवाडी, कहांडळवाडी या सर्व गावांच्या मध्यवर्ती असलेल्या आणि अत्यंत पारंपारिक यात्रा उत्सव साजरा होणारा आश्विनाथ गड हा भाविकांचे मोठे श्रद्धास्थान आहे. वर्षभर येथे नागरिकांची मोठी गर्दी राहत असून हिंदू – मुस्लिम बांधवांचे एकत्र असलेले हे मंदिर हे राज्यभराचे वैशिष्ट्य आहे. दर गुरुवारी मोठ्या प्रमाणात हिंदू व मुस्लिम बांधव येथे एकत्र येतात तर श्रावणातील तिसऱ्या गुरुवारी ही भव्य जत्रा भरते. उत्तर महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव या यात्रेसाठी येतात तर नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातून हिंदू बांधवही मोठ्या संख्येने एकत्र या ठिकाणी येत असतात. मुस्लिम आणि हिंदू एकत्र पद्धतीने यात्रा साजरा करण्याचा हा पारंपारिक योग अनेक वर्षांचा या ठिकाणी आहे. चिंचोली गुरव व पारेगाव बुद्रुकचे ग्रामस्थ देवाचा गाडा या ठिकाणी काढतात. बैलगाडीने गाडा ओढत सर्व यात्रेमध्ये मानाने मिरवला जातो रथ ज्यावेळेस येतो त्यावेळेसचा उत्साहाचे वातावरण हे या यात्रेचे मोठे वैशिष्ट्य असते.

यावेळी बोलताना माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, भारत हा विविध संस्कृती, जाती,पंथ,धर्म यांनी बनलेला आहे.विविधतेतून एकता हे आपल्या देशाचे वैशिष्ट्य आहे. नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्याच्या सीमेवर असणाऱ्या या तीर्थक्षेत्राचे मोठे वैशिष्ट्य आहे. हिंदू व मुस्लिम बांधवासह सर्व धर्मीय बांधव या ठिकाणी एकत्र येतात पुजा करतात. धार्मिक भावनेने आनंदाने ही यात्रा साजरी करतात. एकमेकांप्रती आदर सहिष्णुता आणि एकात्मता असलेले हे सामाजिक एकतेचे मोठे प्रतीक आहे. निमोन येथे काठीचे होणारे स्वागत आणि प्रस्थान हे आनंददायी असते.

या मंदिर व परिसराच्या सुशोभीकरणासाठी सातत्याने निधी दिला असून या माध्यमातून हे आता मोठे धार्मिक व पर्यटन स्थळ झाले आहे हजारो भाविकांची उपस्थिती हे या यात्रेचे वैशिष्ट्य असल्याचेही



ते म्हणाले.

तर आर्किटेक बी.आर.चकोर म्हणाले की,लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी अश्विनाथ गडाच्या विकासासाठी सातत्याने निधी दिला आहे.याचबरोबर सिन्नर तालुक्याचे आमदार माणिकराव कोकाटे यांनीही या परिसराच्या विकासासाठी सातत्याने निधी देऊन या परिसराचे सुशोभीकरण केले आहे. त्यामुळे हे दोन्ही जिल्ह्यांचे मोठे धार्मिक आणि पर्यटनाचे क्षेत्र ठरले आहे. सर्वांची उपस्थिती हेच मोठे वैशिष्ट्य असल्याचे ते म्हणाले.

निमोन येथे झालेल्या मानाच्या काठीच्या मिरवणुकीच्या वेळी गावांमधून युवकांनी पारंपारिक वाद्यात गुलालाची उधळण करत भव्य मिरवणूक काढली. यावेळी तरुणांची उपस्थिती व जल्लोष मोठा होता.

अहिल्यानगर,नाशिक जिल्ह्यातून हिंदू व मुस्लिम बांधवांची मोठी उपस्थिती होती. तरुणांची महिलांची उपस्थिती आणि धार्मिक वातावरणात,घोषणा व पारंपारिक सांस्कृतिक पद्धतीने ही यात्रा मोठ्या आनंदाने संपन्न होते.